# पुण्यातील एक ऑगस्ट
# जयप्रकाश पाठिंबा मोर्चातील
# काही घोषणा

भ्रष्ट शासन सावधान
जाग उठा है हिंदुस्थान !

हम क्या चाहते है ?
इन्किलाब ! इन्किलाब !

हम भारत की नारी है
फूल नही चिनगारी है !

जनता की बार बार पुकार
दूर करो मॅहंगाई-भ्रष्टाचार !

लोक व्यवस्था जाग रही है
भ्रष्ट व्यवस्था काँप रही है !

फाशी द्या, फाशी द्या !
वशिलेबाजांना फाशी द्या
काळाबाजारवाल्यांना फाशी द्या
स्मगलर्सना फाशी द्या
भेसळबाजांना फाशी द्या
नादान राज्यकर्त्यांना फाशी द्या !




माणूस

शनिवार
३ ऑगस्ट १९७४
एक रुपया


रॉकेलच्या रांगेत झीट आलीय?
मग 'गॅस'वर ठेवा!


साहेब, काळा पैसा
ओळखायला नोटाच
काळ्या रंगात
छापून घेऊ या!


जी. एं. ना पांच हजार नको असतील अन् अॅकॅडमीही पाच हजार परत घेत नसेल तर आमच्या 'माया काजळ'च्या उत्पादनासाठी आम्हालाच द्यावेत!
[स्थापना १९७२.]
माया काजळ
केवळ आम्ही साधे आचारी आहोत म्हणून लाखो शिव्या खाव्यात, पण आपण मात्र भ्रष्टाचारी म्हणून लाखो रुपये खावेत असेच ना?
भिक्कार स्वयंपाक केलाय. चालता हो!

# साप्ताहिक माणूस

| संपादक | साहाय्यक | शनिवार | वर्ष : चौदावे |
| --- | --- | --- | --- |
| श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर | ३ ऑगस्ट | अंक : दहावा |
| | सौ. निर्मला पुरंदरे | १९७४ | किंमत : एक रुपया |


# एक ऑगस्ट कार्यक्रम चार प्रतिक्रिया

प्रा. देवदत्त दाभोलकर : श्री. एस्. एम्. जोशी : श्री. नरुभाऊ लिमये : प्रा. ग. प्र. प्रधान

**श्री. श्री. ग. माजगावकर यांसी–**
**स. न. वि. वि.**

१ ऑगस्टच्या 'जयप्रकाश समर्थन'च्या कार्यक्रमाच्या संदर्भात काल आपण मला अगत्यपूर्वक भेटावयास आलात व माझ्या मनातील अस्वस्थता अधिकच वाढली. माझे विचार मी 'माणूस'मधून मोकळेपणाने मांडावयास हरकत नाही असेही आपण सौजन्याने सुचविले. माझी भूमिका एखादे पत्रक काढून स्पष्ट करावी अशीही निकड माझ्या मनाला वाटत होती. मी तसे तुम्हाला म्हटलेही. परतु त्याला अहकाराचा वास येईल असे माझे मलाच वाटले. आपला हा अंक १ ऑगस्टलाच विक्रीसाठी बाहेर पडत आहे हेही मला आता विचार करता इष्ट वाटते. त्यामुळे आता या माझ्या लेखनाने माझ्या मनातील गोंधळ स्पष्ट होण्यासच कदाचित काही मदत झाली तर होईल. इतराच्या गोंधळात कार्यक्रमाच्या आधी त्यामुळे भर पडण्याचे कारण नाही.

जयप्रकाशजीच्या विषयी माझ्या मनात नितांत आदर आहे हे सागण्याची आवश्यकता नसावी. त्याना आज या भूमिकेपर्यंत यावे लागावे यातच भारताच्या आजच्या दुर्गतीची सर्व वेदना साकार झालेली आहे. हितसबधी गट सोडले तर आज सर्वच जनतेच्या मनात याविषयीची सहवेदना आहे. उपोषणाचा कार्यक्रम हे या सहवेदनेचे एक प्रतीक आहे. परंतु एकतर त्या दिवशीची इतर नित्य कर्तव्ये बाजूला टाकून कार्यक्रमात सहभागी होणे मला उचित वाटत नाही व या कार्यक्रमाच्या एकूण रूपरेखेविषयी माझ्या मनात तसा विश्वास नसल्यामुळेही या सार्वजनिक कार्यक्रमात मी सामील होणे युक्त ठरणार नाही. यातील दुसरा भाग माझ्या दृष्टीने अधिक महत्त्वाचा आहे. परंतु मनोमन सहभाव म्हणून मी त्यादिवशी सार्वजनिक कार्यक्रमात सहभागी न होता उपोषण करणार आहे. आपल्याला कदाचित हे हास्यास्पद वाटेल. परंतु माझी भावना ही प्रतिक्रिया सहन करू शकेल.

कार्यक्रमाच्या रूपरेखेविषयी माझ्या मनात तसा विश्वास नसल्याचा निर्देश वर केला आहे; त्याचे अधिक स्पष्टीकरण आवश्यक आहे. या कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या स्नेहीजनांच्या प्रामाणिकपणाविषयी माझ्या मनात यत्किंचितदेखील शका नाही, परतु शांततामय शिस्तबद्धरीतीने हा कार्यक्रम पार पाडण्याच्या या कार्यकर्त्यांच्या कर्तृत्वाविषयी मात्र माझ्या मनात शका आहे असे मी म्हटले तर आपण त्याचा राग मानणार नाही अशी आशा आहे. यामुळे एकतर कार्यक्रम अगदीच मर्यादित स्वरुपाचा, प्रतिकात्मक राहून शांततेने पार पडेल किंवा संयोजकांच्या कल्पनेच्या बाहेर जाऊन कोणी त्यात सख्यात्मक उठाव देण्याचा प्रयत्न केला तर तो संयोजकाच्या हातातून जाईल अशी मला भीती वाटते. या दृष्टीने दक्षता घेण्याचा आपण प्रयत्न करीत आहात व त्यात आपल्याला यश येईल अशी आशा मी बाळगून आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना यावेळी कसे आवाहन केले जाते, त्याच्या सहभागाला कशी शिस्त लावली जाते, यावर हे बरेचसे अवलबून राहाणार आहे. ज्या विद्यार्थ्यांना मनापासून शिस्तबद्ध रीतीने या कार्यक्रमात सहभागी व्हावयाचे असेल त्याना अवश्य तशी मुभा असावी परंतु ज्यांना यामागील भूमिका मान्य नसेल किंवा भूमिका मान्य असून कार्यक्रमाचा तपशील मान्य नसेल त्यांना त्यांच्या व्यवहारात कोणताही अडथळा आणला जाऊ नये ही भूमिका घेणे युक्त होईल असे याबाबत माझे व्यक्तिगत मत आहे. सर्व दिनभराचा आपात कार्यक्रम शांततेने व शिस्तबद्ध रीतीने पार पडला तर–आणि तरच हा कार्यक्रम यशस्वी झाला असे म्हणता येईल.

या कार्यक्रमाविषयी माझ्या मनात असणारी अडचण ही

आणखीही थोडी वेगळी आहे अशा कार्यक्रमाचे यश हे त्या कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या व्यक्तीच्या व्यक्तिगत चारित्र्याबद्दल लोकांच्या मनात जो आदर वसत असेल त्या आदराच्या प्रमाणावर अवलंबून असते. या दृष्टीने या कार्यक्रमात सहभागी असणाऱ्याचे चारित्र्य समाजमान्य असणे व या कार्यकर्त्यांचा व्यक्तिगत वा पक्षीय राजकीय स्वार्थ या सहभागाच्या मागे दडलेला नाही असा विश्वास जनतेला वाटणे ही अशा कार्यक्रमाच्या यशस्वितेची एक अपरिहार्य अटच असते. या कार्यक्रमाचे शत्रूही ही गोष्ट ओळखून असतात. जयप्रकाशजींची भूमिका आपल्याला जाचक होत आहे असे दिसून येताच त्यांच्याही चारित्र्यहननाचा प्रयत्न केला जातो यामागील रहस्य हेच आहे आज आपल्या कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या लोकांच्याकडे आपण या दोन कसोटयातून पाहिले तर काही नावानंतर आपणही कमीअधिक प्रमाणात साशक रहाल असे मला वाटते. सर्वसामान्य आदोलनात अशी सरमिसळ चालू शकते. नैतिक अधिष्ठानावर उभे राहू पाहाणाऱ्या आदोलनाला ही सरमिसळ केवळ कमकुवतच करते असे नसून शेवटी घातकच ठरते

या अस्वस्थतेला प्रभावी क्रियात्मक रूप, समाजाला अधिक अडचणीत न आणता, कसे देता येईल हे मला तरी सुचत नाही. याची निश्चित कल्पना आज कोणालाच नाही हे आपल्यालाही मान्य आहे. आपण म्हणालात त्याप्रमाणे याविषयी नतर तपशिलाने विचार करता येईलही. परतु आपण आज सहज सुचवलेले एकदोन कार्यक्रम तत्त्व व व्यवहार या दोन्ही दृष्टीने मला तसे रुचले नाहीत. अस्वस्थतेने अगतिक होऊन सत्प्रवृत्त सज्जनही आज गोंधळलेल्या अवस्थेत काही अर्थशून्य किंवा केवळ विचित्र असे आचरण तर करीत नाहीत ना अशी शका येते. यातून समाजाच्या मनावर शेवटी कोणती प्रतिमा उमटणार आहे, का केवळ त्याच्या आजच्या गोंधळलेल्या मानसिक व व्यावहारिक स्थितीत भरच पडणार आहे ? अतिम कार्यक्रमाचा तपशील सागोपाग विचार करून नीट ठरू शकल्यास व त्या कार्यक्रमाला तशाच तोलामोलाचे नैतिक नेतृत्व मिळू शकल्यासच (आणि महाराष्ट्राच्या सदर्भात तर एस्. एम्. खेरीज दुसरे नाव माझ्या नजरेसमोर येत नाही) कदाचित या गोंधळातून पार पडता येईल

आपला १ ऑगस्टचा कार्यक्रम आपल्या मनातील आदर्शाप्रमाणे नीट पार पडेल व नतर आपल्याला या सर्व गोष्टींचा अधिक तपशीलवारपणे विचार करता येईल अशी मला आशा आहे.

आपण हे लेखन प्रसिद्ध करावयाची सिद्धता दाखविली होती या सौजन्याचा मात्र मी अवास्तव फायदा घेऊ इच्छित नाही. आपल्याला ते प्रसिद्ध करणे कोणत्याही कारणाने अनुचित वाटल्यास ते तसेच मागे ठेवावयास माझी अनुमती आहे असे समजावे. कळावे

२६–७–७४ आपला

¤ **देवदत्त दाभोलकर**

**प्रियबधू माजगावकर**

दोन दिवसापूर्वी आपली भेट झाली त्यावेळी मी बाहेरगावी जात असल्यामुळे एक ऑगस्टच्या कार्यक्रमाला उपस्थित राहाणे शक्य होणार नाही असे आपणास समक्ष सागितले होतेच काही कारणामुळे माझा पाटण्यास जाण्याचा कार्यक्रम तहकूब झाला आणि मी पुण्यास परत आलो तर कार्यक्रमात भाग घेईनच. श्रद्धेय अण्णासाहेब सहस्रबुद्धे याच्या नेतृत्वाखाली कार्यक्रम यशस्वीपणे पार पडेल अशी खात्री वाटते.

महाराष्ट्रामध्ये भ्रष्टाचार, महागाई आणि बेकारी याबाबत काय करता येईल याचा आपण विचार करालच. मला ज्या कल्पना सुचतात त्या खाली देत आहे–

१ : प्रचलित शिक्षण पद्धती विद्यार्थ्यांना भविष्यकाळात जो जीवनसघर्ष करावा लागणार आहे त्या दृष्टीने कुचकामी आहे असे पालकाना आणि विद्यार्थ्यांना वाटत असले तरी दुसरी पर्यायी पद्धती दृष्टिपथात नसल्याने आहे त्यालाच चिकटून राहाण्याची त्याची प्रवृत्ती आहे अद्याप पुरेसा भ्रमनिरास झालेला नाही आणि प्रस्थापित पद्धतीतून बाहेर पडून पुरुषार्थी ईर्ष्येने नवे प्रयोग करण्याची हिंमत विद्यार्थ्यांमध्ये अजून आपण निर्माण केलेली नाही. म्हणून कॉलेजावर बहिष्कार घाला असा ठराव करण्यात अर्थ नाही. त्यापेक्षा ज्या तरुणाना आजच्या कुचबणेच्या परिस्थितीतून बाहेर पडून जनजागृतीसाठी काही करावे असे वाटते त्याना निदान एक वर्षभर शिक्षणाचा कार्यक्रम स्थगित करून सामाजिक कार्याला वाहून घेण्यास आवाहन करावे जे तरुण त्यासाठी तयार होतील त्याचे सुमारे एक आठवड्याचे शिबीर घेऊन, त्याच्याशी चर्चा करून ज्याच्या त्याच्या आवडीप्रमाणे त्याना कार्य आखून द्यावे. येते वर्ष सानेगुरुजींच्या अमृत महोत्सवाचे आहे मागे ज्याप्रमाणे त्याचे स्मारक म्हणून एक वर्ष सेवापथकाचे कार्य चालविण्यात आले त्याप्रमाणेच यावर्षी ग्रामीण विभागामध्ये आणि शहरातून भ्रष्टाचार निरोधन, समाजामध्ये अजूनही घर करून बसलेली सामाजिक उच्चनीचतेची भावना दूर करणे, ग्रामीण विभागामध्ये रोजगारहमी योजना राबविण्याचा प्रयत्न करणे असे उपक्रम सुरू करण्याचा प्रयत्न करण्यासारखा आहे.

कलेक्टर कचेऱ्या, मामलेदार कचेऱ्या, सर्कल कचेऱ्या, ब्लॉक ऑफिसे याच्यासमोर तबू ठोकून गोरगरीब लोकाना कागदपत्र मिळविण्यासाठी लाच द्यावी लागणार नाही असा प्रयत्न तरुणाना करता येईल. तबूवर पाटी लावावी की 'ज्याना कामासाठी पैसे द्यावे लागतात त्यांनी तसे देऊ नयेत. आमच्याकडे चौकशी करावी म्हणजे आम्ही त्याचे काम करून देण्याचा प्रयत्न करू' विद्यार्थ्यांनी असे काही केल्यास गोरगरिबाना मदत होऊन भ्रष्टाचाराला आणि लाचलुचपतीला आळा बसवणे शक्य आहे

पुण्याच्या कॉर्पोरेशनची सूत्रे आता विरोधी पक्षीयाच्या हाती आहेत. जे सुशिक्षित तरुण तयार होतील त्याना जकातीच्या नियमाबद्दल प्रशिक्षण देऊन प्रत्येक जकात नाक्यावर दोन दोन विद्यार्थी नियमाने बसवावे. त्याचे काम इतकेच, की जकात नियमानुसार वसूल होते आहे की नाही ते पाहाणे. जे शहरात राहाणारे विद्यार्थी आहेत त्याना हा कार्यक्रम सोयिस्कर पडेल

ग्रामीण भागातून आलेल्या विद्यार्थ्यांना शक्य तर त्याच्या गावीच ठेवावे. त्यांच्याबरोबर एक-दोन बाहेरचे किंवा शहरचे विद्यार्थी द्यावेत. वर्षभर गावामध्ये राहून त्यानी ग्रामीण जनतेला परिस्थिती

समजावून द्यावी. बेकार लोकांना कामधदा मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावे. सामाजिक समतेखाली मुख्यत: सवर्णांच्यामध्ये जागृती करून सार्वजनिक विहिरीवर सर्वांना पाणी भरण्याचे हक्क प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करावा तलाठी, पोलीस अधिकारी याच्याकडून काही अडवणूक होत असेल तर ती वद करावी. सामाजिक जागृती करावयाची तर तरुणानी वडिलधाऱ्या मडळीची मर्जी सपादन करून त्यांना त्या कार्यासाठी प्रवृत्त केले पाहिजे. खऱ्या अर्थाने त्यानी ग्रामसेवक झाले पाहिजे. शक्य तर निरनिराळया लोकाच्याकडे आलटून पालटून भाकर खाण्याचा प्रयत्न करून पाहावा.

हे सर्व करीत असताना पक्षीयभावना ठेवू नये. राज्यकर्त्या आणि अन्य सत्ताधारी पक्षावरोबर सहकार्य करावे. काँग्रेसच्या विचाराचे तरुण असतील त्याना देखील आपल्या कार्यक्रमामध्ये सामील करून घ्यावे. मुख्य हेतू समाजामध्ये आणि विशेषत गोरगरीब समाजामध्ये जागृती निर्माण करण्याचे कार्य करावयाचे आहे.

तरुणानी एक वर्षभर ग्रामीणजीवनाशी एकरूप होऊन जनजागृतीचा प्रयत्न केला तर त्याना खूप शिकता येण्यासारखे आहे. आज देशामध्ये भ्रष्टाचार वाढत असलेला पहावयास आणि अनुभवावयास मिळतो त्याचे मुख्य कारण सामाजिक जाणिवेचा अभाव हे आहे. समाजाबाबत आपले काही कर्तव्य आहे हेच अजून आम्हाला शिकवलेले नाही. सामाजिक कर्तव्याची जाणीव जर आमच्या मनात सदैव जागृत राहिली तर भ्रष्टाचाराची प्रवृत्ती कमी होईल. केवळ वैयक्तिक स्वार्थ साधायचा, श्रीमत व्हायचे, सत्ता मिळविण्याचा भल्याबुऱ्या मार्गांनी प्रयत्न करायचा आणि प्रतिष्ठित म्हणून मिरवायचे असे आजचे आपले जिणे आहे ते बदलायला हवे. शिक्षणाचे हे एक महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. आज त्याकडे दुर्लक्ष होत आहे. विद्यार्जन केल्याने विद्यार्थी समाजोन्मुख व्हायला पाहिजे. समाजविन्मुख होऊन स्वार्थ साधणारा होता कामा नये. ग्रामीण जीवनाशी समरस होऊन विचार करू लागलो तर बेकारी कमी करण्यासाठी काय केले पाहिजे, टचाई दूर कशी होईल, भ्रष्टाचाराला प्रोत्साहन कशामुळे मिळते इत्यादी गोष्टीबद्दल विद्यार्थ्याला आपले विचार बनविता येतील स्वातत्र्यासाठी पूर्वी तरुणानी कित्येक वर्षे तुरुगात घालविली. आता स्वराज्याचे सुराज्य करण्यासाठी काही लोक तरी एखादे वर्ष देण्यास निश्चितच तयार होतील.

२३–७–७४ **एस्. एम्. जोशी**

¤

**श्री संपादक माणूस**

**स. न. वि.**

एक तारखेच्या कार्यक्रमास माझा तत्वत. पाठिबा होता पण उपवास प्रकरणावर माझा विश्वास नसल्याने मी त्यात सहभागी झालो नाही श्री. जयप्रकाश नारायण यानी विहारमध्ये जे आदोलन सुरू केले त्याला तत्वत: पाठिबा मिळाला पाहिजे असे मला वाटते, पण फार मोठा धोका आहे की पाठिंव्यात राजकीय स्वार्थांचा खेळ मोठ्या प्रमाणात होईल. श्री. जयप्रकाशजीनी विहारी आदोलन स्वत. सुरू केलेले नाही. विद्यार्थ्यांनी आदोलन सुरू केले त्याना वाऱ्यावर सोडावयाचे नाही म्हणून ते नेते बनले. भावनाशील स्वभावामुळ सरकारी अत्याचाराने सतापून गेले. ज्या गोळीबाराचा मत्रिमडळ व काँग्रेस आमदार धिक्कार करीत नाहीत त्याना हाकलले पाहिजे अशी पुकार त्यानी केली. त्यातच श्री. जयप्रकाशजी सारख्या नेत्याबद्दल पतप्रधानानी काही उद्गार काढल्यामुळे जेपीना राग येणे स्वाभाविक. काँग्रेसमधील इतर तथाकथित पुरोगामी जे गरळ ओकीत आहेत ते तर गलिच्छतेची सीमा गाठणारे आहे.

.–पण अशा तत्कालिक घटनांचा परिणाम घडत घडत जे आदोलन रूप घेते त्याचे मूळ हेतू आणि सूत्र सुटण्याचा सभव जास्त असतो. माझ्या मते मराठवाडा विद्यार्थी आंदोलन हे त्याचे उत्कृष्ट उदाहरण आहे. विद्यार्थ्यांनी सुरुवात केली भ्रष्टाचाराविरुद्ध आणि आदोलनाचे ओघात विकास मागणी प्रमुख झाली. ज्याच्या भ्रष्टाचाराची नवी माहिती नको असे नेते चळवळीत म्होरकेपणाने वावरले. राजकारणी मडळी अशा वावटळीचा फायदा घेण्यास नेहमीच तयार असतात. जयप्रकाशजीचे आजचे ध्येय विधानसभा सपविणे हे आहे व तेथेच मतलबी राजकारणी त्याचा फायदा घेतील.

खरीखुरी भ्रष्टाचार विरोधी चळवळ कुणीही सुरू केली तर त्याला तनमनधनाने शक्य तेवढी साथ देण्याची अनेकांची इच्छा आहे 'माणूस'मधून जे वेळोवेळी लढे लढविले जातात त्याकडे लोक आत्मीयतेने पहातात. धुळे विभागातील आदिवासी प्रश्न, पूर्वी धान्यस्वावलबनासाठी केलेले प्रचार कार्य, ग्रामायण चळवळ वा कुणा व्यक्तीच्या भ्रष्टाचाराविरूद्ध उचललेली लेखणी मला अभिनदनीय वाटते व म्हणून आपण व आपल्यासारखी तरुण मडळी राजकीय – पक्षीय भावना बाजूस ठेवून जे काम उभाराल त्यात मला रस आहे. सध्या पक्षातीत जीवन व्यतीत करीत असल्याने शक्यतो भाग घेईन.

श्री. पु. ल देशपाडे यानी व्रत निश्चयाची हाक दिली ती खरी महत्त्वाची आहे पुन्हा एकदा लोकमान्याच्या वेळेसारखी चतुसूत्री अगिकारली पाहिजे असे मला वाटते. म्हणून स्वदेशी, खरे राष्ट्रीय शिक्षण, दारूबदी, जेथे जेथे 'श्रीमतीचे निर्लज्ज प्रदर्शन' तेथे तेथे बहिष्कार, निषेध अशा अनेक गोष्टी निश्चित करून नागरिकांना 'व्रती' बनविण्याचे कामास हात घातला पाहिजे. एका मागून एकाने शपथ घेऊन आचार-विचार-उच्चारात ते व्रत आणले पाहिजे. मी त्यातला एक व्रती होऊ इच्छितो. करूया सुरुवात. ज्योतीने ज्योत पेटवूया

एक तारखेस जो कार्यक्रम आखला गेला त्यात अशा व्रतनिश्चयाची इच्छा किती आणि सध्याच्या राजकीय परिस्थितीत सरकारविरोधी वातावरण तापविण्याचा अतिम हेतू मनात धरून आलेले किती असा मला प्रश्न पडला. अन्यथा श्री. जयप्रकाशजीना तत्त्वत पाठिंबा देणारापध्ये मी होतो, अजून आहे. साधना कचेरीत तीन महिन्यापूर्वी जी सभा झाली त्यात मी हजर होतो. त्या पत्रकावर माझी सही आहे काँग्रेस पक्षाची आज दुरवस्था झाली आहे हे मला दिसत असूनही त्या पक्षात असख्य कार्यकर्ते खऱ्या अर्थाने जनसेवा करणारे आहेत. त्याना भ्रष्टाचार नको आहे. शुद्ध राजकारणाची त्याना आस आहे, पण बनाव असा बनला की त्याचे पक्षात काही चालत नाही. त्यातला मी एक धाडसाने बाहेर पडलो एवढेच !

पण म्हणून गाधीटोपी म्हणजे काळाबाजार, कॉंग्रेसप्रेमी म्हणजे भ्रष्टाचारी, मत्री म्हणजे सर्व दुर्गुणाचा पुतळा आणि पतप्रधान म्हणजे सर्व अनिष्टाची पुतळी असा आभास निर्माण करणे अन्यायाचे आहे कोठलीही चळवळ विधायक आणि वैचारिक पातळी सोडून राजकीय प्रागणात उतरली की तेथे हे प्रकार सुरू होतात. पुण्यामध्ये तर कोठलीही चळवळ सर्वपक्षीय म्हणून उभी करावयाची आणि तिला कॉंग्रेस विरोधी स्वरूप द्यावयाचे हा एक ढाचाच बनून गेला आहे. गेल्या वर्षातील महागाई विरोधी आदोलने पहा ! पतप्रधान इदिरा गाधीच्या विद्यापीठ कायक्रमाचे वेळचा अनुभव पहा ! !

म्हणून विनती की भ्रष्टाचार निर्मूलनासाठी जनशक्ती जागृत करून स्वत पासून सुरुवात करून राजकीय क्षेत्रावर दाब आणण्याचा प्रयत्न जरूर करावा. पु. ल. देशपाडे यानी पोटतिडकीने काही गोष्टी नमूद केल्या असे व्रत घेणाराची सघटना, मेळा, दिंडी काढाल तर मी त्यात सहभागी होऊ इच्छितो–अनेक सभ्य नागरिकाना *भेटू, बोलू, साखळीचे दुवे जोडू. यदाचे* पर्जन्यमान पुन्हा दुष्काळाची छाया पसरविणार आहे. राजकीय पक्ष सरकारवर टीका करू पहातील, आपण जनसेवेचे व्रत घेऊ या.

२७–७–७४ **नरुभाऊ लिमये**

¤

९२६ सदाशिव पेठ, पुणे ३०

**प्रिय श्री. प्रभाकर पाध्ये**
**सप्रेम नमस्कार**

जयप्रकाश नारायण यानी सुरू केलेल्या भ्रष्टाचार विरोधी आदोलनास पाठिंबा देण्यासाठी आपण जे प्रयत्न करीत आहात त्याना माझा हार्दिक पाठिंबा आहे या आंदोलनास पाठिंबा देण्यामागची माझी भूमिका मी स्पष्ट करू इच्छितो.

भारत परतत्र असताना आपणा सर्वांना असे वाटत होते की, पारतत्र्यात खितपत पडलेल्या जनतेचा नैतिक अध पात होतो. त्यावेळीही हा नैतिक अध पात पावलोपावली प्रत्ययास येत असे. इग्रज अधिकाऱ्याशी कमालीच्या लाचारीने वागणारा नोकरशाहीतील उच्च अधिकारी वर्ग, इग्रज राज्यकर्त्यांची खुशामत करणारा प्रतिष्ठिताचा वर्ग व आपल्या देशात कर्तृत्व व पुरुषार्थ याना वावच नाही या जाणिवेने किंकर्तव्यमूढ झालेले लक्षावधी नागरिक हे त्या वेळच्या अध.पतित जीवनाचे स्वरूप होते. देशातील बहुसख्य नागरिक हीनगडाने पछाडले होते आणि त्यामुळे स्वदेश, स्वधर्म वा स्वभाषा यांच्याबद्दलची निष्ठा लोप पावलेली होती. ही परिस्थिती बदलावी यासाठी थोर लोकनेते व समाजसुधारक यानी प्रयत्न केले. मात्र या प्रयत्नाना आदोलनाचे स्वरूप लोकमान्य टिळक व महात्मा गाधी या दोन नेत्यानीच दिले

स्वातत्र्योत्तर काळात कर्तृत्व व पुरुषार्थ यासाठी नवी क्षेत्रे प्राप्त झाली आहेत यात शकाच नाही व या विविध क्षेत्रात अनेकांनी पराक्रमही करून दाखविले आहेत. भारतीय जवानाचा पराक्रम, अणुस्फोट घडवून आणणाऱ्या शास्त्रज्ञाचे कर्तृत्व आदि गोष्टी तर आपल्याला सुपरिचित आहेतच परतु त्याचबरोबर अनेक व्यक्तीचे पराक्रम आपल्याला अज्ञात राहिलेले आहेत. कोयना धरणाच्या पलीकडे अलोरे या गावाजवळ कोयनाप्रकल्पाच्या पुढील अवस्थेत सह्याद्री फोडून एक प्रचड बोगदा खणायचा होता. एक परदेशी कत्राटदार व एक नामवत देशी कत्राटदार यानी या कामात हार खाल्ली. परतु तेथील शासकीय इजिनियरानी हे आव्हान स्वीकारले व स्थानिक मजुराच्या साह्याने हे अशक्यप्राय वाटणारे काम करून दाखविले. हे काम चालू असताना अविश्रात श्रम करणारे इजिनियर व कित्येकदा प्राणाचीही पर्वा न करणारे तेथील मजूर याचे अभूतपूर्व कर्तृत्व मी डोळ्यानी पाहिले. त्यावेळी माझे अत करण अभिमानाने भरून आले. हे इतक्या विस्ताराने लिहिण्याचे कारण हे की परिस्थितीत भ्रष्टता नसेल, व कर्तृत्वाचे योग्य चीज होईल असा विश्वास असेल तर आपल्या देशातील नागरिकाच्या सामर्थ्याचा अविष्कार सर्व क्षेत्रात होईल असा माझा विश्वास आहे. शेती, उद्योगधदे, शिक्षण, क्रीडा, दुष्काळाशी झुज इ *वेगवेगळ्या क्षेत्रात व्यक्तिश. कमालीच्या निष्ठेने काम* करणारे अनेक जण आपणा सर्वांना माहीत आहेत. परतु या वैयक्तिक कर्तव्यनिष्ठेचा पराभव होत असून एकूण समाजाला भ्रष्टाचाराने ग्रासले आहे हे नाकबूल करण्यात अर्थ नाही काहीनी या भ्रष्टाचारात हात धुवून घेतले आहेत व बहुसख्य व्यक्ती या भ्रष्टाचारापुढे हतबल झाल्या आहेत. वा मूकपणे या भ्रष्टाचारी प्रवाहाबरोबर पतित म्हणून वाहत जात आहेत. या भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी मोठे प्रयत्न करण्याची जबाबदारी राजकीय पक्षाची आहे. कारण राजसत्तेच्या गैरवापरातूनच भ्रष्टाचारास सुरवात झाली व आर्थिक क्षेत्रातील भ्रष्टाचारावर राजसत्तेचा अकूश रहाण्याऐवजी ही सत्ता त्या भ्रष्टाचारासच पोषक ठरली. या विरुद्ध आम्ही विरोधी पक्षातील कार्यकर्त्यांनी आजवर अनेकदा टीका केली असली, काही समर्थ नेत्यानी भ्रष्टाचाराची प्रकरणे उघडकीस आणली असली तरी भ्रष्टाचारविरोधी आदोलन सुरू करण्यास विरोधी पक्ष अपयशी ठरले हे कबूल केलेच पाहिजे. यामुळे मधूनमधून एखादे वादळ उठले तरी जनमानसात भ्रष्टाचाराविरुद्ध लढण्याची भावना मूळ धरू शकली नाही. जयप्रकाश नारायण याच्या प्रयत्नानी ही कोंडी फुटेल व राजकीय पक्षाचे अनुयायी नसणारे लोकही या भ्रष्टाचार विरोधी आंदोलनात सामील होऊ शकतील अशी परिस्थिती निर्माण होऊ लागली आहे. या आदोलनाची आज केवळ सुरवात झाली आहे. त्या आदोलनास योग्य वेग येण्यासाठी लो. टिळक व महात्मा गाधी ज्या कुशलतेने वातावरण तापवीत असत व आदोलनास आवश्यक ती सघटना उभी करून त्या आदोलनास देशव्यापी स्वरूप देत असत तसे प्रयत्न जयप्रकाश नारायण व त्याना साथ देणारे सर्व सहकारी याना फार मोठ्या प्रमाणावर करावे लागतील. अशा प्रयत्नात प्रचार, सघटना व निश्चित स्वरुपाची कृती याचे फार मोठे महत्त्व असते. आणि जनमानस भारून टाकतील अशा काही व्यक्तीनी या प्रयत्नात पुढाकार घ्यावा लागतो. महाराष्ट्रात या आदोलनास वेग येण्यासाठी विरोधी राजकीय पक्ष व विविध क्षेत्रात पुरोगामी तात्विक भूमिका घेऊन काम करणारी मडळी याच्या एकत्रित प्रयत्नातून या आंदोलनास वेग येईल. मात्र येथील तरुण वर्ग या आदोलनासाठी किती त्याग करावयास तयार आहे व सातत्याने

किती प्रयत्न करणार आहे यावरच या आंदोलनाची यशस्विता अवलंबून आहे.

भ्रष्टाचाराचे स्वरूप आजच्या पेक्षा अधिक स्पष्ट होणे आवश्यक आहे असे मला वाटते पैसे खाणारा, भेसळ करणारा, हा भ्रष्टाचारी आहे, परंतु त्याच बरोबर आपल्या कर्तव्याचे पालन न करणारा हाही भ्रष्टाचारीच आहे हे स्पष्टपणे सांगावे लागेल. शेतकऱ्यांनी विहिरीवर बसविलेले पंप वेळेवर दुरुस्त न करणारा वीज बोर्डातील सेवक, जनतेची कामे वेळेवर न करणारा कर्मचारी, विद्यार्थ्यांच्या मनात अभ्यास करण्याची भावना निर्माण करण्यासाठी करावे लागणारे श्रम न करणारा शिक्षक इ. विविध क्षेत्रातील व्यक्तींच्या हातूनही भ्रष्टाचार चालू आहे हे कठोर आत्मपरीक्षण आपणा सर्वांना मान्य करावे लागेल.

यावर काहीजण असे सुचवतील की मग प्रत्येकाने आपापले कर्तव्य करावे म्हणजे वेगळे आंदोलन करण्याची आवश्यकता नाही. वैयक्तिक कर्तव्य पालनाचे महत्त्व मला मान्य असूनही या विचारसरणीतील मुख्य दोष स्पष्ट करणे आवश्यक वाटते तो दोष हा की समाज भ्रष्ट असेल, तर वैयक्तिक कर्तव्यपालन दुबळे व अपुरे ठरते. एका इंग्रज लेखकाने म्हटले आहे त्याप्रमाणे ' देअर कॅनॉट बी अ मॉरल मॅन इन ॲन इम्मॉरल सोसायटी ' म्हणून संस्थात्मक बदल घडवून आणण्यासाठी निकराचे प्रयत्न केल्याशिवाय वैयक्तिक कर्तव्यपालन हे भ्रष्टाचारविरोधी आंदोलनास गती देऊ शकणार नाही. अशा संस्थात्मक बदलासाठी काही आघाड्यांवर थोडे उत्पातही घडतील पण एकूण वातावरण ढवळून काढण्यासाठी मूलभूत गोष्टींना हात घातल्याशिवाय गत्यंतर नाही. आज शिक्षणक्षेत्रात जी फसवणूक चालली आहे तिच्यामुळे अनेक हुशार विद्यार्थ्यांना उत्तम अभ्यास करावा असे वाटत नाही. परीक्षांतून फार मोठ्या प्रमाणावर कॉपी होते व ज्या पदव्या मिळतात त्यांचा आयुष्यात फारच कमी उपयोग होतो. तरुण पिढीची ही फसवणूक दीर्घ काळ चालू रहाणे म्हणजे राष्ट्र विनाशाकडे नेणे आहे. यामुळे हे क्षेत्र ढवळून निघावे असे मला वाटते. अशा संस्थात्मक बदलासाठी जयप्रकाश नारायण यांनी आंदोलन सुरू केले आहे व या आंदोलनात सामील होणाऱ्या व्यक्तींच्या जीवनात एक नवा आत्मविश्वास निर्माण केला जाणार आहे. स्वातंत्र्य चवळीत भाग घेतलेल्या माझ्या पिढीतील अनेकांना हा अनुभव आला व भ्रष्टाचारविरोधी आंदोलनास देशव्यापी स्वरूप प्राप्त झाले तर त्याच्यात सहभागी होणाऱ्या तरुण पिढीचे जीवन खासच उजळून जाईल.

या आंदोलनाला यश येणार म्हणजे नेमके काय होणार असा प्रश्न अनेकजण विचारतात. राजकीय क्षेत्रात आपण संसदीय लोकशाही स्वीकारली आहे. तिच्या मर्यादा आज स्पष्ट झाल्या असून खरे जनहित साधण्यासाठी लोकप्रतिनिधींची निवड आजच्यापेक्षा वेगळ्या रीतीने होणे आवश्यक आहे. जनतेत काम करणारा खरा कार्यकर्ता गरीब असला तरी निवडून येणे, प्रतिनिधींच्या द्वारा जनतेला राष्ट्रविकासाच्या कामात अधिक सहभाग मिळणे यासाठी नवे प्रयत्न सुरू झाले तर ती आंदोलनाची यशस्विता मानावी लागेल. आर्थिक क्षेत्रात कारखानदार, व्यापारी व वडे बागाइतदार यांनी संघटितरित्या समाजाची लूट चालविली आहे. आणि त्यांच्याशी सामना देणारा संघटित कामगार वर्गही देशातील शेतमजूर व अन्य भूमिहीन आणि संघटित वर्ग यांचे प्रतिनिधित्व करू शकलेला नाही कामगार, सरकारी कर्मचारी आदी संघटित वर्गांची असंघटित श्रमिकांशी एकजूट होण्यास खरी सुरुवात झाली, संघटित कामगार आजच्या मर्यादित स्वार्थ साधून घेण्याच्या भूमिकेतून बाहेर पडला आणि यामुळे आर्थिक विषमतेच्या विरुद्ध खरा लढा सुरू झाला तर हे आंदोलन यशस्वी म्हणता येईल. आपल्या राष्ट्राच्या गरजा लक्षात घेऊन ज्या शिक्षणपद्धतीत आवश्यक ते शिक्षण प्रामाणिकपणे दिले जाईल आणि ते मिळण्यासाठी प्रामाणिकपणे विद्यार्थी अभ्यास करतील अशी शिक्षण पद्धती सुरू करण्याचा प्रयत्नास सुरुवात झाली तर या आंदोलनास यश आले असे मानता येईल. सामाजिक जीवनातील उच्चनीचतेची भावना नष्ट होऊन दलितांना ज्यावेळी आपण खऱ्या अर्थाने सर्व क्षेत्रात बरोबरीच्या नात्याने वागवू त्याचवेळी या आंदोलनास खरे यश आले असे आपण म्हणू शकू. आज भ्रष्टाचारी माणसे समाजात प्रतिष्ठेच्या जागा बळकावून बसली आहेत. अशी भ्रष्ट माणसे जेव्हा पदच्युत होतील, भ्रष्टाचार हा ज्यावेळी तिरस्करणीय मानला जाईल त्यावेळी हे आंदोलन यशाच्या मार्गाने वाटचाल करू लागेल ही सर्व प्रक्रिया सुरू करणे हे आंदोलनाचे पहिले पाऊल आहे.

खंबीरपणे हे पाऊल टाकणे हे आपणा सर्वांचे कर्तव्य आहे.

२७–७–७४ आपला

**ग. प्र. प्रधान**

---

प्रिय माजगावकर....

....फॉरेस्टच्या आणि गावपडित जमिनीसाठी प्रचंड सत्याग्रह सुरू आहेत. विखरण २००, शहाणे ७४, धाद्रे १२५, पिप्री २५, ढेकाटी ३५ असे लोक अटकेत आहेत. त्याशिवाय खळे जमिनीत पेरल्यामुळे अटकेत होते ते निराळेच. एकूण काम जोरात....

पत्र लिहावयाचे मुख्य कारण म्हणजे अंबरसिंग महाराजांचे चरित्र लिहायचे म्हणतोय. महाराजांच्या जास्त संपर्कात आलेले म्हणजे आपणच आहात. तेव्हा महाराजांच्या संबंधात ज्या काही आपल्या आठवणी असतील त्या आपण महत्त्वाचे काम समजून पाठवून देणे....

२५–७–७४ प्रकाश सामंत, शहादे

# सोलकढी

## □ कुलगुरुमाउली आणि तिची ७२७ लेकरे

मुंबई विद्यापीठाला बाकी काहीही नावे तुम्ही ठेवू शकाल; पण त्याला विद्यार्थ्यांच्या हिताची पर्वा नाही, असा दोषारोप मात्र तुम्हाला करता येणार नाही. अहो, या सेवापरायण विद्यापीठातला प्रत्येक लहानसहान घटक विद्यार्थ्यांच्या भल्यासाठी अखंड झटत असतो. सुदैवाने विद्यार्थ्यांनासुद्धा ही हितबुद्धी समजते. त्यामुळे जगभरच्या इतर उठवळ विद्यार्थ्यांप्रमाणे मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना आपल्या यथोचित कर्तव्याचा विसर नाही कधी पडत. ते मुकाट्याने महाविद्यालयात येतात; मुकाट्याने व्याख्याने ऐकतात; मुकाट्याने अभ्यास करतात; मुकाट्याने परीक्षांना बसतात; मुकाट्याने उत्तीर्ण होतात; मुकाट्याने अनुत्तीर्ण होतात; पुन्हा मुकाट्याने आपली पात्रता वाढविण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करतात.

अशी ही सरपटणारी मुकाटमुले या वर्षी एका प्रश्नपत्रिकेवरून बिथरून गेली तेव्हा काहीतरी बऱ्यापैकी गंमत उडणार बरे का, असे मी माझ्या मराठी मनाला सांगून ठेवले. आणि तसेच झाले. या वर्षी, शास्त्रशाखा—प्रथम वर्षाची पदार्थ विज्ञानाची प्रश्नपत्रिका सोडविताना बिचाऱ्या मुलांची पार धांदल झाली. प्रश्नपत्रिकेतले पदार्थविज्ञान त्यांना अज्ञात होते. नेमलेला अभ्यासक्रम, त्यातला महत्त्वाचा भाग, संभाव्य प्रश्न आणि त्यांची (संभाव्य) उत्तरे इत्यादी विषयात शास्त्रशाखेचा विद्यार्थी मोत्याचा दाणा असतो. पण ओल्ड-अॅरनॉल्डच्या गोलंदाजीने भारतीय फलंदाजांचे जे केले तेच या प्रश्नपत्रिकेने आमच्या विद्यार्थ्यांचे करून टाकले. परीक्षा संपली. पदार्थविज्ञानामुळे आपला सबंध परीक्षेत ढंढंण्णा होणार, एक मोलाचे वर्ष फुकट जाणार, हे बहुतेक विद्यार्थ्यांना कळून चुकले. काहींनी आपल्या स्वतःच्या मनाची आणि काहींनी स्वतःच्या व पालकांच्या मनाची तयारी केली. प्रश्नपत्रिकेतल्या प्रश्नांची ओळख पटली नसल्यामुळे ते नेमलेल्या अभ्यासक्रमाबाहेरचे असले पाहिजेत, असे विद्यार्थ्यांनी ठरवून टाकले.

विद्यार्थ्यांमध्ये काही चलबिचल आहे हे कनवाळू परीक्षकांनी ध्यानात घेतले. त्यामुळे उत्तरपत्रिका तपासताना त्यांनी गुण सढळ हातांनी वाटले. काठावर नापास होणाऱ्या विद्यार्थ्याला त्यांनी काठावर पास केले! तरीपण खोल पाण्यात राहिलेले विद्यार्थी संख्येने काही कमी नव्हते. त्यांनी जिवाच्या कराराने आकांत मांडला. एका फोफशा विद्यार्थी-संघटनेला या गटंगळ्या विद्यार्थ्यांचा पुळका आला. तिने कुलगुरुमाउलीचे दार ठोठावले.माउली का कधी आपल्या लेलरांना अव्हेरते? माउलीने दार उघडले. भेकणाऱ्या लेकरांना आत घेतले. (दार पुन्हा लावून टाकले.) माउलीने लेकरांचे खारट अश्रू पुसले. माउलीचा प्रेमपान्हा पिऊन लेकरे शांत झाली, सुखावली. आपली भळभळणारी वेदना त्यांनी माउलीला सांगितली. त्यांना वेदनामुक्त करण्यासाठी माउलीने पदर बांधला.

कुलगुरूंनी तात्काळ चौकशी केली. प्रश्नपत्रिका काढणाऱ्या परीक्षक मंडळाने ठामपणे असे सांगितले की, विचारलेले प्रश्न अभ्यासक्रमाला धरूनच आहेत; लेकरांना ते सोडवता आले नसतील तर बिचारी लेकरेच त्याला जबाबदार आहेत. हे एक फेंगटच झाले. चूक परीक्षकमंडळाची असणार असाच कुलगुरूंना वहीम होता. पण परीक्षकमंडळ भलतेच चट्टकचन्ने निघाले. आपली चूक नसताना, कुलगुरूंसाठी, चूक आपलीच आहे असे कबूल करण्याइतपत धैर्य मंडळाने दाखविले नाही. (थूः तुमच्या जिनगानीवर) अशा परिस्थितीत, आता काय करायचे, असा प्रश्न तुम्हाआम्हाला पडला असता. माउलीला असा प्रश्न पडत नसतो.माउलीची लेकरे न चुकणारी असतात. प्रश्नपत्रिका अभ्यासक्रमाला धरून असली तरी फार म्हणजे फार्फारच अवघड होती; या प्रश्नपत्रिकेत ज्या विद्यार्थ्याला वीस गुण मिळाले त्याला नेहमीच्या, अनवघड प्रश्नपत्रिकेत तेहेतीस गुण जरूर मिळाले असते; तेव्हा हे तेरा गुण विद्यापीठाने त्याला दिल्यास तो अनुत्तीर्णांचा उत्तीर्ण होऊन साखर वाटेल; त्यामुळे सगळे कसे गोडगोड गोडगोड होऊन जाईल; असा प्रेमळ तोडगा कुलगुरुमाउलीने काढला.

या प्रेमळपणाचा लाभ सातशेसत्तावीस लेकरांना मिळाला. त्यांच्या घरी कुलगुरुमाउलीची आरती दणक्यात चालू आहे.

अवघड प्रश्नपत्रिका काढणारे परीक्षकमंडळ या प्रकरणी दोषी आहे, त्याला कठोर शासन झालेच पाहिजे, हे सर्वांना मान्य व्हावे. तसे झाले नाही तर दरवर्षी प्रश्नपत्रिका अवघड निघतील आणि मग कुलगुरुमाउलीला अक्षरशः आपल्या पदरचे गुण देऊन लेकरांवर कृपाप्रसाद करावा लागेल. त्यालाही तशी फारशी हरकत आहे असे नाही. फक्त पदर पुरेसा मोठा काढला म्हणजे झाले. त्यामुळे बाकीचे अंग उघडे पडले तर डोळे घट्ट मिटून घ्यावेत.

— अनंतराव



# टनाकांपुढील आव्हाने निवडणूक निकालांना हादरा

वा. दा. रानडे

जपानच्या डाएटचे (पार्लमेंटचे) वरिष्ठ सभागृहासाठी गेल्या महिन्यात झालेल्या निवडणुकात पतप्रधान टनाका याच्या सत्तारूढ लिबरल डेमोक्रॅटिक पक्षास जे अपयश मिळाले त्यामुळे जपानच्या अतर्गत राजकारणात अस्थिरता निर्माण झाली आहे. वरिष्ठ सभागृहात लिबरल डेमोक्रॅटिक पक्षाने आपले बहुमत गमावले. गेल्या सत्तावीस वर्षातील त्याची ही सर्वात मोठी पिछेहाट आहे आपले नेतृत्व व सत्ता टिकविण्यासाठी पतप्रधान टनाका यांना आता आर्थिक धोरणात मोठे बदल करावे लागतील आणि पक्षातील व पक्षाबाहेरील विरोधी गटाशी तडजोड करावी लागेल. त्यांच्या नेतृत्वाला लागलीच धोका निर्माण झाला आहे असे नाही पण पुढच्यावर्षी पक्षाच्या अध्यक्षपदाची निवडणूक आहे त्यावेळी पक्षातील त्याचे विरोधक त्याच्या नेतृत्वाला आव्हान देण्याची शक्यता आहे. पाश्चात्याना अनुकूल परराष्ट्रधोरण, चलनवाढ, बड्या उद्योगपतीशी सधान आणि पक्षातील गटबाजी यामुळे टनाकाची लोकप्रियता झपाट्याने घसरली. निवडणुकीत आपल्या पक्षाचा विजय व्हावा म्हणून बड्या उद्योगपतीचा पाठिंबा मिळवून त्यांनी अफाट खर्च केला होता. आम्ही बहुमत गमावल्यावर कम्युनिस्टाच्या हाती सत्ता जाईल. ते देशाची सारी आर्थिक घडी बदलून टाकतील तेव्हा आम्हाला पाठिंबा द्या अशी मागणी त्यांनी बड्या उद्योगपतीकडे केली होती. बड्या कपन्यानी लिबरल डेमोक्रॅटिक पक्षासाठी कोटघवधी येनचा निवडणूक निधी उभारला. टनाकाच्या पक्षाच्या सर्व उमेदवाराना नुसता पाठिंबा देऊन कपन्या थाबल्या नाहीत तर अनेक उमेदवाराना त्यानी 'दत्तक' घेतले म्हणजेच त्याच्या विजयाची संपूर्ण जबाबदारी घेतली. आपल्या कारखान्यातील कामगारानी या उमेदवारानाच मत द्यावे यासाठी त्यानी दडपण आणले, त्याना नाना प्रलोभने दाखविली. ही सर्व तयारी लक्षात घेता टनाकांचा पक्ष निश्चित मोठे यश मिळविणार असे मानले जात होते. पण निवडणूक निकालांनी त्यांना धक्का दिला. पैशाने मते विकत घेता येत नाहीत हे मतदारानी दाखवून दिले.

जपानमध्ये समाजवादी, कम्युनिस्ट, कोमेटो (बौद्धाचा स्वच्छ सरकार पक्ष) आणि लोकशाही समाजवादी हे चार प्रमुख विरोधी पक्ष आहेत. निवडणुकीत टनाकांच्या पक्षाचा पराभव घडवून आणावा अशी या सर्वांचीच इच्छा होती, पण मतभेद, एकमेकांबद्दलचा अविश्वास यामुळे त्याची संयुक्त आघाडी होऊ शकली नाही. काही थोडे मतदारसघ सोडता इतर मतदारसघात त्याचा निवडणूक समझोता झाला नाही. कामगाराचा पाठिंबा मिळविण्यासाठी त्याना तीस टक्के पगारवाढ सरकारने दिली तरीही कामगाराचा पाठिंबा टनाकाचा पक्ष मिळवू शकला नाही

वरिष्ठ सभागृहाच्या एकूण २५२ सभासदात टनाकाच्या पक्षाला पूर्वी १३४ जागा होत्या त्या आठने कमी झाल्या. काही अपक्ष सभासदाचा पाठिंबा मिळवून टनाका आपली सत्ता टिकवू शकतील. पण हा पाठिंबा भरवशाचा नाही. सरकार पाडण्यासाठी सर्व विरोधी पक्षानी एकजूट केली तर अपक्ष सभासद त्याच्याकडेही झुकण्याची शक्यता आहे.

लिबरल डेमोक्रॅटिक पक्षाच्या अपयशाचा सर्वात जास्त फायदा कम्युनिस्टाना मिळाला. कम्युनिस्टानी नऊ जागा अधिक मिळविल्या व त्याचे पक्षबळ ११ वरून २० वर गेले. समाजवादी पक्षाच्या जागा तीनने वाढून ६२ झाल्या. लौकर सार्वत्रिक निवडणुका घेणे सरकारला भाग पाडण्यासाठी विरोधी पक्षानी सयुक्त आघाडी करावी असे आवाहन समाजवादी पक्षाचे अध्यक्ष टोमोमी नरीवा यानी केले आहे. विरोधी पक्षाची एकजूट होऊन अपक्ष सभासदाचाही पाठिंबा ते मिळवू शकले तर सरकारला ते पेचात आणू शकतात. जपानच्या सध्याच्या घटनेप्रमाणे वरिष्ठ सभागृहात एखादे सरकारी बिल फेटाळले गेले तर ते फेरविचारासाठी कनिष्ठ सभागृहाकडे पाठविले जाते आणि कनिष्ठ सभागृहात ते दोन तृतियांश बहुमताने पास झाले तरच त्याला कायदा म्हणून मान्यता मिळते. टनाकाच्या पक्षाचे कनिष्ठ सभागृहात बहुमत असले तरी दोन तृतियाश बहुमत नाही. एकूण ४३१ सभासदात त्याच्या पक्षाचे २७९ सभासद आहेत. म्हणजे दोन तृतियाश बहुमताला ५९ सभासद कमी पडतात. याचा अर्थ काही अपक्ष सभासदांचा पाठिंबा मिळाला तरीही सत्तारूढ पक्षाचे दोन तृतियाश बहुमत होत नाही. वरिष्ठ सभागृहाने फेटाळलेले बिल कनिष्ठ सभागृहात दोन तृतियाश बहुमताने पास होऊ शकले नाही तर सरकारला राजीनामा देऊन नव्या निवडणुका घेणे भाग पडेल.

शिक्षणपद्धतीत सुधारणा घडवून आणण्याचे आश्वासन टनाकाच्या पक्षाने आपल्या निवडणूक जाहीरनाम्यात दिले होते. शालेय अभ्यासक्रमात नैतिक शिक्षणाचा अतर्भाव करण्याची त्याची योजना होती. समाजावर जुन्या नैतिक मूल्याचा अजून पगडा आहे. त्याच्या या भावनेस आवाहन करून निवडणुकीत त्याचा पाठिंबा मिळविणे हा त्या मागे मुख्य उद्देश होता. पण आता या सुधारणेबद्दल टनाका कितपत आग्रह धरतील याची शका आहे. कारण डाव्या पक्षाचा-विशेषत समाजवाद्याचा-या शैक्षणिक सुधारणेस तीव्र विरोध आहे आणि शिक्षक वर्गात समाजवाद्याचा प्रभाव बराच आहे. अशा परिस्थितीत आताच या योजनेचा आग्रह धरून पराभवाचा धोका पत्करण्यास टनाका तयार होतील असे वाटत नाही.

मत्रिमडळाची आपण एवढ्यात पुनर्घटना करणार नाही असे पंतप्रधान टनाकानी जाहीर केले होते, पण त्याची इच्छा नसतानाही त्याना पुनर्घटना करणे भाग पडणार आहे असे दिसते. कारण उपपतप्रधान टाकेओ मिकी आणि अर्थमंत्री टाकेओ फुकुडा यांनी मत्रिपदाचे राजीनामे दिले आहेत. हे दोघेही टनाकाच्या मत्रिमडळात असताना त्याच्या धोरणांना त्यानी तीव्र विरोध केला होता. त्यानी राजीनामे दिले नसते तरीही मत्रिमडळ पुनर्घटनेत त्याना वगळण्याचा टनाकाचा विचार होताच. फुकुडाचा तर टनाकाच्या नेतृत्वालाच विरोध असून स्वत पतप्रधान बनण्याची त्याची आकाक्षा आहे. सहा महिन्यापूर्वीपर्यंत बड्या उद्योगपतीचा पाठिंबा मिळविण्यातही ते यशस्वी झाले होते. पण उद्योगपतीनी पवित्रा बदलून टनाकांनाच पाठिंबा देण्याचे ठरविले. पण निवडणुकीत टनाकाच्या पक्षाला बसलेला हादरा लक्षात घेता टनाकाच्या नेतृत्वास त्याचा पाठिंबा कितपत टिकून राहील याची शका आहे.

सत्ता टिकविणे आणि नेतृत्व टिकविणे अशा दुहेरी आव्हानास टनाकाना तोड द्यावे लागणार आहे. त्यात ते कितपत यशस्वी होतात यावर त्यांच्या नेतृत्वाची कसोटी लागणार आहे. ☐

# दामखिंड, शहादे आणि सूत्रकार

## दामखिंड

मी (रमेश चौधे) ठाणे जिल्ह्यात मनोरपासून चार मैल अतरावरील दामखिड येथे भूमिपुत्र-प्रतिष्ठान नावाच्या ट्रस्टतर्फे काम पहातो. येथील शेतकऱ्याना शेतकरी मडळातर्फे बँकेतून आम्ही कर्ज मिळवून देतो. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी त्याना कर्जातील पैशातून खावटी वाटप केले. आदिवासी असो, कुणबी असो की कायोडी असो आपापली खावटी घेऊन नागरटीच्या कामास लागले होते.

लडक्या रामजी गोवारी हा आदिवासी तरुण (रहाणार मसरोली, ता. वाडा) देखील आपल्या शेतात नागर धरणार होता. त्याच्या खावटीचा वाटा त्याने उचलला असल्यामुळे त्याचा अनेक दिवसाचा उपास सपून तो कामाला लागणार होता. पण अन्यायी, जुलमी राजवटीत हे होणे नव्हते. दि. २३-६-७४ रोजी सकाळी तो उठला, पहातो तो त्याच्या झोपडीसमोर दहा-बारा माणसे उभी असलेली दिसली. त्या लोकानी लडक्या गोवारी यास दम देऊन त्याच्याच ओटीवर त्याला बसविले. त्यांच्यात परस्पर डोळ्यानी इशारे दिले गेले. सरपच, पोलीसपाटील त्याच्या पाड्यावर आले. व त्यानी, 'भडव्या, आम्हाला कुठे ज्वारी मिळत नाही आणि तुला एवढी खावटी कुठे मिळाली? साल्या, चोरी केलीस काय? मारा रे भडव्याला, कुत्रा, म्हणजे समज येईल – चोरी करतो लेकाचा...' असा लडक्यावर आरोप ठेवून त्याच्या दहा-बारा गुड साथीदाराकडून त्याला बेदम चोपून काढले. त्याच्याच घरातील दोरीने त्याचे हात पाठीवर बाधून त्यास गुलामाप्रमाणे बाबल्या मेघवले याच्या घरी नेऊन काठीने, चपलेने, हाताने, लाथेने तुडवीत बेशुद्ध केले. आसुरी आनंदात त्याला पाणी पाजून शुद्धीवर आणले गेले आणि पुन: माराचा दुसरा हप्ता सुरू केला 'घरातील मुद्देमाल दाखव' म्हणून हातधुवून लडक्या गोवारीच्या मागे लागले. लडक्याला त्याच्या घरात पुन्हा आणले गेले. लडक्याने चोरी केलीच नव्हती. तर तो माल कुठला देणार? परंतु त्याचे कुणीही ऐकून घेण्यास तयार नव्हते. लडक्या गुरासारखा ओरडत होता. पण त्याच्या पाड्यावरील मदतीस आलेल्या माणसाना देखील दम बसला. नतर लडक्याची वरात त्याला बुकलीत पोलीस पाटलाच्या घरात नेली गेली. आणि न्याय (?) केला गेला. शिक्षा म्हणून त्यास ७५ रु. दड केला. त्याच्या गरीब मामाने भाचा ह्या नरभक्षकाच्या हातून वाचावा म्हणून पाड्या पाड्यावर हिंडून जेमतेम वीस रुपये गोळा करून सरपच व गुडांच्या हवाली केले. बिचारा लडक्या धुगधुगणारा जीव मुठीत धरून पळत सुटला. त्याच्या मदतीला कुणीही येऊ शकले नाही – तो एकटा पळत होता.

हे जेव्हा आम्हाला कळले तेव्हा आम्ही तिथे धावून गेलो. परिस्थितीचा अदाज घेतला आणि पोलीसस्टेशनात गुन्हा नोदवला. परतु साक्षीदार फिरवून प्रकरण दडपून टाकण्याचा प्रयत्न झाला आणि त्याना खुनाच्या धमक्या आरोपीकडून दिल्या गेल्या. फौजदाराकडूनही आम्हाला पैशाचे अमीष दाखवून प्रकरण दाबण्याचा प्रयत्न केला गेला. ह्या दडपशाहीच्या निषेधार्थ अडीचशे आदिवासीनी मसरोली गावात मोर्चा काढला. परतु ह्या गोष्टीची दखल घेतली जाईल का? न्याय मिळेलच अशी शाश्वती ह्या राज्यात देता येईल का?

ह्या देशात फक्त अन्याय होतो. एका वाली नसलेल्या समाजावर झालेला हा एक अन्यायच आहे. ह्या अत्याचाराविरुद्ध आम्ही दाद मागतोय. ही एकट्या लडक्याचीच कहाणी नव्हे. ह्या गाजलेल्या पिडलेल्या आणि प्रचड शोषणामुळे पिचलेल्या आणि अनेक जुलूम सहन करणाऱ्या समाजातील कित्येक तरुणाची शोककथा आहे. सागता येण्यासारखे असे अनेक प्रसग आहेत.

कोढाणचा लडका भुतखेड. पालघरच्या एका गवत व्यापाऱ्याकडून याने किरकोळ रक्कम घेतली होती. पैशाची परतफेड होणे न्याय्य होते. परतु ही परतफेड भुतखेडला बेदम मारून व त्याची बैलगाडी जप्त करून केली गेली. हा भयानक अत्याचार होता. गवत व्यापाऱ्याच्या हाती चाबूक आणि जीपगाडी व निराधार, निशस्त्र अडाणी भुतखेड. तो लाचार बनला. अशा अडाणी लोकाच्या नशिबी चामडीची लक्तरे निघेपर्यंत चाबकाचे फटकारे खाणे, थोड्याशा कर्जापोटी आयुष्यभराची गुलामगिरी पत्करणे हेच आहे का? या निशस्त्र, निराधार लोकाना सरक्षण कोण देणार? ◻

## शहादे

[शहादे, तळोदे, नदुरबार तालुक्यातील ग्राम स्वराज्य समिती व श्रमिक सघटना याच्या कार्याविषयी व परस्परसबधाविषयी गेले दोन महिने वृत्तपत्रातून बरीच उलट सुलट टीकाटिपणी आली. शहाद्याजवळील नाधा येथे जून महिन्यात आलेल्या कार्यकर्त्यांच्या बैठकीत या टीकाटिपणीची दखल घेतली गेली व यासबधी एक अधिकृत निवेदन तयार केले गेले. या चळवळीशी सबधित असणाऱ्या सर्वांच्या माहितीसाठी हे निवेदन जसेच्या तसे पुढे दिले आहे–]

शहादे तालुक्यातील पाडळदे गावचे एक तरुण श्री. अबरसिंग

सुरतवंती यांना लहानपणापासूनच भजनाची आवड. गावागावात हिंडायचे, भजन म्हणायचे, लोकाना चार उपदेशाच्या गोष्टी सागायच्या व परिस्थिती समजावून घ्यायची. हायस्कूलचे शिक्षण सपल्यानतर त्यांनी सातपुड्याच्या वडगाव भागामध्ये चाललेल्या सातपुडा सर्वोदय मडळाच्या कामामध्ये लक्ष घालायला सुरुवात केली. कधी शिक्षक, कधी विक्रेता, कधी ड्रायव्हर, कधी टायपिस्ट, कधी प्रचारक अशा विविध भूमिकेमध्ये त्यानी तेथे काम केले. त्यामुळे सर्वच कामाचा त्यांना अनुभव येऊन गेला. सातपुड्यामध्ये काम करीत असताना शहादे, तळोदे भागामध्ये मोठ्या जमीनदारांकडून, सावकाराकडून गरीब जनतेवर जे अन्याय होत होते–पोलीस व सरकारी अधिकारीही त्यात सामील–त्याच्या हकीकती त्याना ऐकायला मिळत होत्या. काय करावे, कसे पुढे जावे याचा ते विचार करीत होते. त्याच्या पाडळदे गावातच भीषण अत्याचार झाले. तेथील भिल्लाना आपली भिलाटी सोडून शहादे गावाजवळच्या गोमाई नदीवर जाऊन वस्ती करावी लागली. इतके भयभीत वातावरण निर्माण झाले असा प्रसग आपल्या गावावरच आला असताना आपण स्वस्थ बसणे बरोबर होणार नाही असे त्यांनी मनाशी ठरविले व त्यानी खाली शहादे भागात यायचा निर्णय घेतला. आपल्या पाडळदे गावची परिस्थिती पाहिली. लोकांना सघटित केले. सरकारी अधिकाऱ्याच्यापर्यंत सर्व दुःख पोचविले. कुणी काही दाद घेत नव्हते. शेवटी जनशक्तीच सघटित करायला पाहिजे हे त्यानी जाणले. स्वत गावागावात जाऊन, भजने म्हणून, आपल्यावर होणारे अत्याचार दूर करण्यासाठी सर्वांनी एकत्र यायला पाहिजे, आपली दारूसारखी व्यसने सोडली पाहिजेत वगैरे सांगू लागले प्रामुख्याने या भागामध्ये भिल्ल लोकाचीच वस्ती आहे व त्याच्यावरच अन्याय होत आहेत. काहीतरी सघटित स्वरूप यायला पाहिजे म्हणून भिल्ल सेवा मडळ त्यानी स्थापन केले व त्या मडळाच्या वतीने गरिबावर होणाऱ्या अन्यायाची, अत्याचाराची दाद लावून घेण्याचा त्यानी प्रयत्न केला. आपसातील भाडणे मिटविण्यासाठी त्यानी जनता कोर्ट सुरू केले. अशा प्रकारचे काम तेथे चाललेले असताना जी परिस्थिती उद्भवली त्यातून म्हसावद येथे जमीनदारानी गोळीबार केला. एक भिल्ल ठार झाला.

या घटनेमुळे अनेकाचे लक्ष तिकडे गेले. अबरसिंग आपल्या सर्वोदय मित्राना परिस्थिती कळवीत होते, लिहीत होते. या घटनेनतर प्रमुख सर्वोदयी नेत्यानी तिकडे यावे असे त्यानी आग्रहाने सागितले. या प्रकरणी जमीनदारानी व पोलिसानीही फार अत्याचार केले. जी सघटना त्यानी उभी केली ती दडपून टाकण्याचा पद्धतशीर प्रयत्न त्या वेळी झाला. सर्वोदय नेते श्री. आर. के.पाटील, गोविंदराव शिंदे त्या भागातली परिस्थिती पाहून आले. 'माणूस' साप्ताहिकाचे सपादक श्री. ग. माजगावकर हे येऊन गेले. त्यानी येथील सर्व परिस्थिती १५ ऑगस्टच्या (१९७१) माणूसच्या अकामध्ये विस्ताराने दिली. त्यामुळे येथील भीषण परिस्थिती सवध महाराष्ट्राच्या लक्षात आली. आदिवासीवर होणाऱ्या अन्यायासबधी, अत्याचारासबधी अबरसिगाना किती चीड होती हेही माणूसच्या अकावरून सर्वांच्या लक्षात आले. त्यानी आपल्या मोजक्या सहकाऱ्यानिशी धडाक्याने कामाला सुरुवात केली होती. ते स्वतः कष्टकरी कुटुंबातील, मातीला जागणारे स्वयंभू कार्यकर्ते असल्यामुळे त्यानी प्रत्यक्ष चळवळीत स्वतःला झोकून घेतले व कामाला प्रारभ केला. पूर्वी त्यानी सातपुडा सर्वोदय मडळात काम केले होते. त्यामुळे सातपुडा सर्वोदय मडळाचे अध्यक्ष श्री. दामोदरदास मुदडा याच्याशी त्याचा निकटचा सबध आला होता. भाऊनी (दामोदरदासजीनी) अबरसिगाच्यावर खोलवर रुजतील असे सस्कार केले होते. हे सस्कार सामाजिक जाणिवा निर्माण करून मनाचा जिवतपणा कायम टिकवणारे असेच होते. व्यक्तीला व्यक्तीजीवनापासून अलग करून समाज जीवनाशी समरस होण्यासाठी बाहेरची अस्वस्थ करणारी परिस्थिती जशी कारण होते तसेच भाऊच्यासारख्या व्यक्तींनी मनावर उमटवलेले त्यागी समाजसेवेचे आलेख हेही कारण होते. याचा प्रत्यय त्याच्या कामातून येत होता. शहादे भागातली परिस्थिती पाहिल्यानतर सर्वोदय मडळाने अबरसिगाच्या सहाय्याने हे काम करण्याचा निर्णय घेतला. महाराष्ट्रातील काही निवडक मडळी तेथे आली. १९७१ च्या नोव्हेंबरमध्ये बुढीगव्हाण या गावी गावोगावच्या गरिबाचे दोन दिवसाचे एक शिबिर आयोजित करण्यात आले. त्या शिबिरात गावोगावच्या लोकानी जी माहिती दिली त्यावरून परिस्थितीचे सूक्ष्म अवलोकन करण्याचे ठरले. अबरसिग, त्याचे सहकारी व सर्वोदयाचे काही कार्यकर्ते यानी या भागात पायी हिंडून ७० गावची माहिती जमा केली. आदिवासीवर होणाऱ्या अन्याय–अत्याचाराचे क्रूर आणि नागडे दर्शन या माहितीवरून मिळाले १९७१ च्या मे महिन्याच्या सुरुवातीला घडलेल्या पाटीलवाडी–म्हसावदच्या निर्घृण प्रकरणाने या भागाकडे अनेक सवेदनशील राजकीय, सामाजिक नेत्याचे लक्ष वेधले गेले. लाल निशाण गटाची मडळी सातपुड्याच्या पहाडाजवळ खेड्यात फिरली. परिस्थितीच्या भयानक दारुणतेचा अदाज जेव्हा त्याना आला त्या वेळी त्यानी असलेल्या कार्यकर्त्यांच्या बळावर पाटीलवाडी नतर येथल्या कामात भाग घेण्याचे ठरविले. काही मदत पाटीलवाडी प्रकरणातील आदिवासीवर पडणाऱ्या आर्थिक बोजाचा भार कमी करण्यासाठी देण्यात आली. शेतमजुरांची एक परिषद त्यानी भरविली.

## भू मुक्ती मेळावा

सर्वोदय कार्यकर्त्यांनी यात लक्ष घातले. गावागावात ते हिंडले. आता प्रत्यक्ष कार्यक्रमाला सुरुवात केली पाहिजे यासाठी ३० जानेवारी १९७२ ला शहादे येथे भू मुक्ती मेळावा भरविण्यात आला. याच सुमारास सर्व सेवा सघाचे अध्यक्ष श्री. एस. जगन्नाथन व सेक्रेटरी श्री. ठाकुरदास बग यानी या भागात दौरा करून प्रत्यक्ष परिस्थिती समजून घेतली व सर्वोदय कार्यकर्त्यांनी या भागात सतत काम करीत रहावे असे सुचविले. वरील परिस्थिती बाबत सर्वोदय मडळाने एक चौकशी समितीही नेमली. त्यामध्ये श्री. एस. एम. जोशी, आर. के. पाटील, गोविंदराव शिंदे, नानासाहेब देवरे आदि मडळी होती. त्यानी सर्वत्र दौरा करून परिस्थितीचे एक निवेदन समाजासाठी व सरकारसाठी तयार केले. गरिबाच्या जमिनी कशा गेल्या आहेत व त्या परत मिळविण्यासाठी काय केले पाहिजे हे या समितीने प्रामुख्याने सुचविले. येथील परिस्थितीसबधी वर्तमानपत्रात लेख लिहून जनमानस तयार करण्यात आले. ही परिस्थिती सर्वोदय

कार्यकर्तेच फक्त हाताळू शकतील असे नाही. ज्यांना ज्याना हे आव्हान आहे असे वाटते त्यानी यावे व येथील कामात मदत करावी म्हणून सर्व राजकीय पक्षाच्या नेत्याना, तरुणाना या ३० जानेवारीच्या मेळाव्याचे निमित्ताने बोलावण्यात आले. या मेळाव्याच्या पूर्व प्रचाराच्या निमित्ताने श्री. बाबा आमटे याच्या सोमनाथ येथील श्रमिक कार्यकर्ता विद्यापीठातील चार तरुण आले होते. प्रचाराच्या वेळी पाहिलेल्या आदिवासीवरील अत्याचाराने या कार्यकर्त्यांना अस्वस्थ करून सोडले. प्रत्यक्ष मेळाव्याला सामाजिक समस्याचा विचार करणारे काही इतर तरुणही आले होते. हा मेळावा अपूर्व असा झाला सात-आठ हजार लोक भर उन्हात दुपारी १२ वाजेपासून सायकाळी ५ वाजेपर्यंत बसले होते. त्या मेळाव्यात बेकायदेशीरपणे गेलेल्या जमिनी सर्वांनी परत घ्याव्यात, मजुरी कमी आहे ती वाढवून घ्यावी असा निर्णय घेण्यात आला. मेळाव्यानतर शहाद्यात काम करणारे कार्यकर्ते व बाहेरून आलेले तरुण यांची बैठक रात्री शहाद्याला झाली. सर्वोदय कार्यकर्त्यांनी सर्वांनी येथे कामाला यावे असे आवाहन केले. सोमनाथहून आलेल्या तरुणानी व मुबई-पुण्याच्या काही तरुणानी या बैठकीत येथील परिस्थितीचे आवाहन स्वीकारले व त्यासाठी काम करण्याचे मान्य केले. त्या तरुणांनी सुचविले, की आम्ही सर्वोदयाची माणसे म्हणून येथे काम करणार नाही आम्ही स्वतत्रपणे कष्टकऱ्याची बाजू घेऊन या कामात उडी घेऊ. सर्वोदयाच्या मडळीनी त्याचे स्वागत केले सर्वांनी मिळून काम करायचे तर काही पथ्ये पाळली पाहिजेत म्हणून तीन पथ्ये पाळण्याचा निर्णय घेण्यात आला. १, येथील काम शाततेच्या मार्गाने, त्या मार्गावर निष्ठा ठेवून चालवायचे. २. कुणीही पक्षीय राजकारण या कामात आणायचे नाही. ३. जे काम करणारे आहेत त्यानी मिळून चर्चा करून निर्णय घेऊन कार्यक्रम ठरवायचा व त्याची अमलबजावणी करायची. अबरसिंगानी भिल्ल सेवा मडळ स्थापन केले होते, व काम सुरू केले होते सर्वोदयाची मंडळी कामाला आल्यानतर त्याचे थोडे व्यापक स्वरूप झाले व ग्रामस्वराज्य समिती या नावाखाली कामाला सुरुवात झाली. नवीन येणाऱ्या तरुणानी ग्रामस्वराज्य समिती या सस्थेच्या नावाखाली शहाद्यातील काम करण्याची तयारी दाखविली. ग्रामस्वराज्य या शब्दात आक्षेपार्ह असे काहीच नाही. भारतातील ग्रामीण भागातील कष्टकरी समाज अजूनही गुलामगिरीच्या अवस्थेतच पिचून निघत आहे. त्याचे स्वराज्य येणे व आणणे हा त्या चळवळीचा प्राण असला पाहिजे. या आधारावर ग्रामस्वराज्य उभे राहिले पाहिजे. हे तरुण मित्र कामाला लागल्यामुळे या भागात चाललेल्या कामाला चागले बळ मिळाले. येथील चळवळ जोमाने पुढे सरकू लागली.

भू मुक्ती आदोलनाने शहाद्याच्या कामाला नवी दिशा मिळाली. या आदोलनातून शहाद्याच्या आदिवासीच्या कधीही न मिळविण्यासाठी हरवून गेलेल्या गहाण जमिनी सावकारी पाशातून मुक्त झाल्या. आजपर्यंतचे जमीनदाराचे, सावकाराचे, सरकारी अधिकाऱ्यांचे मुक्त सचार व अत्याचार रोखले गेले. मुक्त जमिनी स्वकष्टाने कसण्याची सुप्त आकाक्षा जागली. एकदा ग्रामीण भागात आदोलन सुरू झाले की त्याची लाट सर्वव्यापी होऊन जाते. भू मुक्ती आदोलनाने सचेतन झालेला गरीब कष्टकरी अत्याचाराचे जू सर्वस्वी फेकून देण्यासाठी चेतून उठला. समितीच्या तरुण मित्रानी अबरसिगाच्या नेतृत्वाखाली एकेक प्रश्न धसास लावण्यासाठी सुरुवात केली. सालदाराला केलेली अमानुष मारहाण, स्त्रियावरील बलात्कार, पोलीस अधिकाऱ्याचे उद्दाम वर्तन, पीक सरक्षण सोसायटचाचा अन्याय, गरिबी आणि वाईट परपरा यामुळे होणारे आपापसातील झगडे या सर्व गोष्टी ग्रामस्वराज्य समितीचे कार्यकर्ते हाताळू लागले. गरीब कष्टकऱ्याना ग्रामस्वराज्य समितीचा फार मोठा आधार वाटू लागला.

## शेतमजुरांची संघटना

१९७२ च्या मे मध्ये आदोलनाचे पुढचे पाऊल म्हणून शेतमजुराचे प्रश्न हाती घेण्याचे ठरले. गावागावात मजुरी फार कमी होती. १२ आण्याच्या वर मजुरी द्यायची नाही असेच मोठ्या शेतकऱ्यानी ठरविले होते. सालदार आहेत त्याचीही मजुरी फार कमी होती गावगावच्या लोकानी एकत्र जमून आमचे साल वाढले पाहिजे म्हणून प्रयत्न करायला सुरुवात केली होती, याच सुमारास सर्वोदय नेते श्री अण्णासाहेब सहस्रबुद्धे याचाही दौरा या भागात झाला. १ मे १९७२ रोजी भूमिहीन शेतमजुराचे प्रश्न हाती घेऊन त्याची दाद लावण्यासाठी जनतेची लढाऊ आघाडी उघडण्यासाठी एकता परिषद सघटित करण्याचे ठरले त्या परिषदेला श्री. बाबा आमटे आले होते. शहाद्याच्या अबराईत श्री. बाबा आमटे याच्या भाषणाने एकता परिषद गाजली परिषदेला दहा हजारावर गरीब कष्टकरी व छोटे शेतकरी जमले होते. या कष्टकऱ्याचा प्रश्न किती महत्त्वाचा आहे हे या परिषदेने दाखवून दिले. भूमिहीनाना जगल जमीन मिळाली पाहिजे अशी मागणी पहाडा शेजारच्या भूमिहीनाच्याकडून होऊ लागली. गरीब कष्टकरी जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी झगडा करावा लागणार हे स्पष्ट होऊ लागले. या एकता परिषदेनतर तोरणमाळला कार्यकर्त्यांची सभा झाली. त्या सभेत विविध समस्यावर विचार करावा लागला तेव्हा सर्वांनाच प्रकर्षाने हे जाणवले, की शेतमजुराचे प्रश्न सोडविण्याकरता त्याची अशी सघटना असावी. लवकरच शेतमजुराचा किमान वेतन कायदा होईल त्याची अमलबजावणी होण्यासाठी शेतमजुराची अशी सघटना व्हायला पाहिजे असे सर्वांनी आग्रहाने मांडले. ग्रामस्वराज्य समितीच्या वतीने तर काम चाललेच होते. परतु शेतमजुरासाठी त्याची स्वतत्र सघटना स्थापन करावी असे सर्वांना वाटू लागले. नाव कोणते द्यावे, कसे असावे याबाबत बराच विचार झाला अखेर 'श्रमिक' शब्द या नावात असावा हे मान्य करण्यात आले. ८ जून १९७२ ला श्रमिक सघटना स्थापन करण्याचा औपचारिक समारभ पार पडला. शहादे-तळोदे तालुक्यातील गावोगावच्या मजूर समितीचे प्रतिनिधी या प्रसगी उपस्थित होते. आपली सभासद फी काय असावी याचीही चर्चा या सभेमध्ये झाली. श्री. विक्रम कान्हेरे याना या समितीचे निमत्रक म्हणून निश्चित करण्यात आले व सभासद जास्तीत जास्त वाढवून सघटनेला मूर्त स्वरूप द्यावे असे ठरविण्यात आले. सर्वांच्या मनात आलेली सघटनेची कल्पना अशा रितीने प्रत्यक्ष साकारली गेली. आतापर्यंत सर्वोदयाचे लोक, भूदानाचे लोक असे ग्रामस्वराज्य समितीच्या कार्यकर्त्यांना खेड्यातील जनता सबोधायची. ते आता त्याना आपल्या श्रमिक सघटनेचे कार्यकर्ते म्हणून ओळखू लागली.

ग्रामस्वराज्य समिती ही कल्पना तशी फार जुनी आहे. महात्मा गांधीनी सामाजिक-राजकीय विचाराचा व त्याच्या ध्येय स्वप्नातील समाजचित्रांच्या कल्पनाचा जो अपूर्व असा पसारा मांडला त्यात 'ग्रामस्वराज्या' सबधीचा उल्लेख अतिशय महत्त्वाचा आहे. अर्थात गांधीजीनी शब्द द्यायचे आणि इतरानी त्याचा साचीव अर्थ आपल्याला हव्या त्या मुशीत त्या शब्दाना घालून काढायचा हा जणुकाही विधीसकेतच होता. ग्रामस्वराज्याचा मूळ मतितार्थ स्पष्ट आहे. ग्रामस्वराज्याचे मूलसूत्र आमच्या मते ग्रामीण भागातील सर्व कष्टकऱ्याची गुलामगिरी सपुष्टात येणे व त्याच्या कष्टमय जीवनाला अग्रहक्क प्राप्त होणे असा आहे. खऱ्या अर्थाने अत्यज्योदय होणे. गावातील सर्व जमीन आणि इतर उत्पन्नाची साधने ही सर्वांची होतील या जमिनीवर आणि उत्पादन साधनावर काम करणाऱ्याचे उत्पादनावरं व त्याच्या वितरणावर नियत्रण राहील. हे ग्रामस्वराज्याचे ध्येय्य साध्य करण्यासाठी काही पथ्ये पाळणे आवश्यक आहे. ग्रामस्वराज्य समितीच्या वतीने काम करीत असताना कोणत्याही राजकीय पक्षाशी मतलबी हात मिळवणी करून राजकीय पक्षाच्या आदेशी नेतृत्त्वाखाली स्वत.ला बांधून घेऊ नये. आणि या सस्थेच्या कार्यकर्त्यांनी कधीही आपण होऊन हिंसात्मक दगलीत भाग घेऊ नये. किंवा इतराना प्रवृत्तही करू नये असे ठरविण्यात आले आजपर्यंत शहाद्यातील काम काही पथ्ये पाळून चालले आहे.

कै. अबरसिंगाच्या दु खद निधनानतर त्यांनी सुरू केलेले काम पुढे जोमाने चालू ठेवायचे असे सर्वांनी ठरविले. आपल्यावर आता अधिक जबाबदारी पडली आहे या भावनेने सर्व लोक कामाला लागले. शेतमजुरांसाठी श्रमिक सघटना सुरू झाली व तिचेच नाव पुढे येऊ लागले. अबरसिंगाच्यानतर ग्रामस्वराज्य समितीचे अस्तित्व सपवावे व श्रमिक सघटनाच चालू ठेवावी अशी सूचना श्री. गोविंदराव शिंदे यानी केली. त्यावर कार्यकर्त्यांच्या बैठकीत चर्चा झाली. सर्व कार्यकर्त्यांनी ग्रामस्वराज्य समितीची आवश्यकता कशी आहे हे सागितले. आम्हा सर्वांना ग्रामस्वराज्याच्या दिशेने जायचे आहे. आमची चळवळ ग्रामस्वराज्याच्या दिशेने न्यावयाची आहे. आता त्याकडे आम्ही अधिक लक्ष देऊ असे सर्वांनी ठरवून ग्रामस्वराज्य समितीचे काम अधिक जोमाने पुढे चालवायचा निर्णय घेतला.

श्रमिक सघटनेचे ध्येय ग्रामस्वराज्याच्या वर सागितलेल्या मूलसूत्रात अतर्भूत आहे धोरणाविषयी सागायचे तर वर उद्धृत केलेल्या पथ्यासह जनतेची, राजकीय सामाजिक जाणीवेने परिपुष्ट झालेले सचेतन आदोलने उठवणे व कष्टकऱ्याच्यावर केल्या जाणाऱ्या अन्याय-अत्याचाराविरुद्ध सातत्याने झगडत रहात त्याच्या दु खी समस्या प्रचलित समाज व्यवस्थेला क्रांतिकारी पद्धतीने सदलून टाकून सोडवणे, असे सागावे लागेल.

वरील विस्तृत निवेदन येथील चळवळीवर व त्या चळवळीत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांवर प्रेम करणाऱ्याना व मदत करणाऱ्याना जवळीक निर्माण करण्यास मदत करील असा आम्हाला विश्वास वाटतो. ◻

# सूत्रकार

कुठलाही राजकीय हेतू वा आर्थिक स्वार्थ मनात न ठेवता केवळ ठाणे जिल्ह्यातील आदिवासीच्या सर्वांगीण आर्थिक सामाजिक आणि शैक्षणिक उन्नतीसाठी महाराष्ट्र गोपालन समितीची स्थापना मुबईच्या काही समाजसेवकानी सन १९६९ च्या ऑगस्ट महिन्यात केली. आधुनिक पद्धतीने शास्त्रीय शेती करणे आणि शेतीला पूरक असे पशुसवर्धनासारखे पूरक व्यवसाय आदिवासीमध्ये उभारणे हा पण एक उद्देश सस्था निर्माण करण्यामागे आहे. आमच्या समाजातील सगळयात दुबळा घटक म्हणजे जो आदिवासी त्याना अन्यायाच्या विरुद्ध अहिंसेच्या आणि शाततेच्या मार्गाने प्रतिकार करण्याचे पण त्याला आम्हास शिकवावयाचे आहे. गरिबीने पोळलेल्या आणि अन्नाच्या कणासाठी वखवखलेल्या पोटानी दारोदार फिरणाऱ्या आदिवासीला केवळ चारपैशाची मदत करणे हेच केवळ समितीचे उद्दिष्ट नाही, तर ह्या आदिवासीला स्वत च्या पायावर उभे करावयाचे आहे. त्याच्या मानेवर सावकार आणि दहशतवादी कम्युनिस्ट ह्याचे वसलेले जू भिरकावून देऊन त्याला आर्थिक दृष्टया शक्तीशाली बनवावयाचे आहे त्याचे शारिरिक आणि मानसिक परिवर्तन घडवून आणावयाचे आहे. गोपालन समितीने हे कार्य हाती घेतलेले असून आदिवासीचे आमूलाग्र परिवर्तन हे तिचे ध्येय आहे.

ह्या समितीचे कार्य महाराष्ट्रात हळूहळू वाढवावयाचे आहे. परतु कामाचा प्रारभ तळासरी तालुक्यातील 'सूत्रकार' ह्या आदिवासी खेडयात तीन वर्षापूर्वी करण्यात आला. सूत्रकार गावी श्री. लक्ष्मी शकर जोशी आणि त्याच्या आठ वेगवेगळया खातेदार नातेवाईकाकडून समितीने सुमारे ४८० एकर जमीन विकत घेतली. सुरवातीला समितीला सुमारे ७०० एकर जमीन दाखवण्यात आली होती व समितीने त्या जमिनीचा सारापण भरला होता. परतु दप्तरावरून आणि प्रत्यक्ष पाहणीत सुमारे २००-२५० एकर जमीन आदिवासीच्या ताब्यात अथवा त्याच्या लागवडीखाली आहे असे आढळताच समितीने आपण होऊन त्या जमिनी सोडून दिल्या. ह्या जमिनीच्या विक्री करणारामध्ये एकही आदिवासी नाही आणि आदिवासीची एक इचपण जमीन समितीने घेतली नाही हे यावरून दिसून येईल. तशात मुळातली ही गवती जमीन, पाण्यासारखा पैसा ओतून तिला लागवडीखाली आणणे ही सामान्य शेतकऱ्याच्यापण आवाक्याबाहेरची गोष्ट, तेथे आदिवासी तिची लागवड कशी करणार ? पण केवळ कर्तव्यबुद्धीने समितीने यात्रिक अवजारे व मनुष्यबळ ह्यांच्या साह्याने ही जमीन लागवडीखाली आणण्याचा निर्धार केला आहे. सध्या १०० एकर जमिनीत गाईसाठी हिरवाचारा, धान्य आणि कडधान्ये व भाजीपाला ह्याचे पीक काढण्यात येते. बाकीची जमीन सुधारण्याचे प्रयत्न चालू आहेत. उत्तम जातीच्या गाई ठेवून दूधउत्पादन करण्यात येते व ते दूध तळासरी गावात माफक भावात विकण्यात येते.

## कम्युनिस्टांचा विरोध

- या मानवतावादी कार्यास मार्क्सवादी कम्युनिस्टांचा फार तीव्र विरोध होत आहे. ह्याला कारणे दोनतीन आहेत. ठाणे जिल्ह्यातील

आदिवासींच्या ह्या विभागात मार्क्सवादी कम्युनिस्टांचे पूर्वी फार मोठे वर्चस्व होते. ते आता ओसरू लागले आहे. डहाणू तालुक्यात तर त्यांचा साफ धुव्वाच उडाला पण तलासरी तालुक्यातील एकमेव पंचायत समिती त्यांच्या ताब्यात आहे कम्युनिस्ट नीती सर्वत्र मशहूर आहे. कम्युनिस्टंचे कार्य केवळ हिंसा, अन्याचार, विध्वस आणि दहशत ह्याच मार्गावर आधारलेले आहे. कुठलेही विधायक कार्य त्याना ठाऊकच नाही. शिक्षणासारखे पवित्र आणि पक्षनिरपेक्ष कार्य, पण शाळा निघून आदिवासी शिकले तर आपल्या पखाखाली राहणार नाहीत म्हणून शाळा काढण्याससुद्धा कम्युनिस्टाचा विरोध! कोणी विधायक कार्याला सुरवात केली की त्याच्यावर तुटून पडायचे हेच त्याना ठाऊक आणि म्हणूनच कम्युनिस्ट समितीच्या विरोधाला उभे ठाकले आहेत. कम्युनिस्ट कार्यकर्ते श्री. नार्वेवर ह्यानातर इतराचे कार्य अथवा विरोध सहनच होत नाही.

गोपालन समितीने फार मोठे कार्य केले आहे असा आमचा दावा नाही. पण गेल्या दोनतीन वर्षात अनेक लोकाना उपजीविकेचे साधन उपलब्ध करून देऊन त्याच्या रोजच्या मजुरीची सोय केली आहे. आदिवासींच्या औषधोपचाराची सोय समितीने केली असून पावसाळ्यात रोपणीच्या हगामात अनेकाना धान्याची मदत केली आहे ह्या प्रत्यक्ष मदतीमुळे व समितीचे अनेक कार्यकर्ते आदिवासींच्या दैनदिन जीवनात समरस झाले आहेत त्यामुळे आदिवासी कम्युनिस्टाचा कळप सोडून समितीकडे आकर्षित झाले आहेत.

परतु विध्वसक प्रवृत्तीच्या कम्युनिस्टाच्या कार्याला ह्याचा जबरदस्त तडाखा बसला. कम्युनिस्टाबद्दलची दहशत आणि प्रीती कमी होऊ लागून आदिवासी निर्भय बनू लागले. त्याना सत्य कळू लागले. कम्युनिस्टाचे पितळ उघडे पडले आणि त्याच्या पायाखालची जमीन घसरू लागली आपले खरे उद्धारकर्ते आपणच आहोत हे आदिवासीना कळू लागल्यामुळे तळासरी येथील आदिवासी जनतेचे आपणच एकमेव उद्धारकर्ते आहोत ह्या भ्रामक कल्पनेखाली वावरणारे श्री. बी. एम. नार्वेकर चिडले त्यानी लोकाची दिशाभूल करण्यास सुरूवात केली इतकेच नव्हे तर रविवार दिनाक ७ जुलै १९७४ रोजी सुमारे ३०० कम्युनिस्ट कार्यकर्त्यांनी आमच्या सूत्रकार येथील केंद्रावर हल्ला चढवला. पोलिसाना मारहाण झाली. त्याचे कपडे फाडण्यात आले. बदुका हिसकावून घेण्याचा प्रयत्न झाला. श्री. कमळाकर जोशी ह्या समितीच्या कार्यकर्त्याचे डोके फुटले आणि प्रकरण हातघाईवर आल्यानतर केवळ प्रतिकार म्हणून पोलिसाना गोळीबार करावा लागला. ह्या प्रसगात मृत्युमुखी पडलेल्या आदिवासीबद्दल आम्हास दु.ख होते. पण त्याच्या विधवा पत्नीस आणि मुलाबाळास धान्य आणि पैसे ह्याची मदत समितीने त्वरित केली असून मा. कलेक्टर साहेबाकडे तिची दाद लावण्यास समितीनेच पुढाकार घेतला आहे. यापूर्वीपण २–३ वेळा असे प्राणघातकी हल्ले झाले होते व त्या हल्ल्यात आमचा रखवालदार जखमी झाला होता.

## समितीचे कार्य

समितीने घेतलेल्या ४८० एकर जमिनीपैकी जास्तीत जास्त जमीन कृषीउत्पादन शास्त्रातील सर्वांगीण कृषीविकासाचा आराखडा समोर ठेवून लागवडीखाली आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत. अनुभवी कृषीतज्ञ श्री. राम पाडणकर ह्याच्या मार्गदर्शनाखाली तेथील दहा-पधरा तरुण व होतकरू मुले कृषीप्रशिक्षण घेत असून त्यांना प्रत्येक सप्ताहात आधुनिक कृषीउत्पादन शास्त्राचे धडे देण्यात येतात. आय. आर. आठ तारा, आय, ई. टी. १९९१, सत्या, सूर्या आदि बहुउत्पादक भाताच्या जातीची लागवड ह्याच प्रशिक्षत आदिवासी तरुणाच्या मदतीने करून जेथे एकरी सरासरी २००-३०० किलो भाताचे उत्पन्न येत असे तेथे ह्याच आदिवासीनी एकरी १६०० किलो उत्पादन केले आहे नव्या पद्धतीची लागवड ते आपल्या शेतात करीत आहेत. गेल्या वर्षी तीन महिन्याच्या भातशेतीच्या प्रशिक्षण वर्गातील १० प्रशिक्षित आदीवासीना पालघर, कर्जत व खोपोली येथील महाराष्ट्र शासनाच्या कृषीकेंद्रावर नेण्यात आले व तेथील तज्ज्ञाशी झालेल्या प्रश्नोत्तरातून आदिवासीशी खूपच माहिती गोळा केली.

पावसाळ्यात भरपूर पीक काढून जमिनीची उत्पादनक्षमता जागृत केल्यावर हिवाळ्यात पडित राहाणाऱ्या ह्या जमिनीतून टोमॅटो, वागी, मिरची, कोबी, दुधी, कार्ली, फ्लॉवर आदि भाजीपाला व पपया, आबे, केळी आदि फळाची लागवड करून ही भूमी खरोखरच कशी सुजला आणि सुफला आहे हे आदिवासी शिकले. गेल्यावर्षी रब्बी हगामात रा. स्व. सघाच्या दुष्काळ विमोचन समितीने एक डिझेल पपसेट सूत्रकार गावात दिला. त्याचा उपयोग करून गेल्या २५-३० वर्षात ज्या जमिनीतून कधीच कुठलेच दुबार पीक घेतले नव्हते अशा जमितीतून तेथील आदिवासीनी भाजीपाला उत्पादन केला. तेथील डोगर उतारावर अननसची लागवड सुरू असून नदीच्या पाण्यावरील उपसा जलसिंचन योजनेद्वारे उसाची लागवड करून सगाली कोल्हापूर प्रमाणे प्रती एकर उसाचे उत्पादन आदिवासीकडून सहकारी तत्वावर करण्याच्या योजनेची पाऊलवाट बरीचशी पूर्ण होत आली आहे.

सूत्रकार गावातील आदिवासी शेतकऱ्याना तात्रिक आणि आर्थिक साहाय्य देऊन त्याना स्वावलबी बनण्यास समिती प्रेरणा देत आहे. गतवर्षी ६०० किलो रासायनिक खत उपलब्ध करून देण्यात आले. यदापण धान्य व खताची मदत देण्यात आली असून समितीच्या धान्य बँकेचा गावातील आदिवासी लाभ उठवीत आहेत

गोपालन, शालेय शिक्षण सामाजिक उद्बोधन इत्यादी अनेक कार्ये समिती प्रामुख्याने पार पाडीत आहे आदिवासीच्या कल्याणासाठी कार्य करणारी आणि त्याच्याच सहकार्याने त्याना पुढे नेणारी समिती आदिवासीना त्याच्या जमिनीवरून बेकायदेशीर दडेली करून हुसकावून लावीत आहे हे कोण खरे मानील? समिती ही एक निवधित धर्मादाय सार्वजनिक विश्वस्तनिधी असून केवळ समाजकल्याण हे तिचे ध्येय आहे. अशा सस्थेला असा बेकायदेशीर कारभार करताच येत नाही. 'गरिबी हटाव'चा नारा लावून गरिबी दूर होत नाही. त्यासाठी प्रत्यक्ष खपावे लागते. सूत्रकार गावातच ५०० माणसे नाहीत तर म्हणे ५०० कुटुबाना समितीच्या कार्यामुळे झळ पोहोचणार आहे! ह्यापेक्षा असत्य आणखी काय असू शकेल?

समितीला आपल्या कार्यापुरती भरपूर जमीन आहे. आदिवासीची म्हणून मानली गेलेली जमीन समितीने घेतली नाही. समितीला आदिवासींची एक इचपण जमीन नको. पण म्हणे शासकीय अधि-

कारी आणि समिती ह्यांच्या दरम्यान असा करार झाला होता की, आदिवासीची जमीन त्याना देण्यात यावी. आम्हास असे जाहीरपणे निवेदन करावयाचे आहे, की प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष लेखी वा तोंडी, व्यक्तिशः वा समितीद्वारे असा कोणताही करार कधी झाला असेल तर त्याचा पुरावा असा दावा करणारांनी दाखल करावा अथवा समितीची जाहीरपणे क्षमा मागावी.

समितीला एवढी जमीन काय करावयाची असा आणखी एक प्रश्न. पण शेती आणि गोपालन ह्याचे शिक्षण देणारी एक शाळा येथे उभी करावयाची असून शेतीविषयक उच्च शिक्षण देणारे व सशोधन कार्य करणारे एक महाविद्यालयपण उभे करण्याचा समितीचा मानस आहे गोपालन, भातशेती, भाजीपाला याच्या संकरित जाती त्याचे सशोधन आणि प्रयोगशाळा याना एवढी जागा हवीच आदिवासी विद्यार्थ्यांना एक वसतीगृह बाधून त्याना शिक्षण द्यावे व त्यामधून उत्कृष्ट गोसेवक आणि कृषीसेवक निर्माण व्हावेत अशी समितीची अपेक्षा आहे.

हवामानखात्याचे एक उपकेंद्र स्थापन करून स्थानिक हवामानाचा शेती उत्पादनाच्या दृष्टीने कसा उपयोग करता येईल हे शेतकऱ्याना शिक्षण द्यावयाचे आहे तर छोटया शेतकऱ्यांना उत्तम बियाणे, तांत्रिक सल्ला, उत्तम खते याबाबत मार्गदर्शन करून, भरपूर भाजीपाला उत्पादन करून, शहराना पुरवून स्वत ची आर्थिक उन्नती स्वत.च कशी करून घ्यावी हे शिकवण्यात सहाय्य करण्यात येणार आहे.

### भाई (!) नार्वेकर

भोळ्याभावड्या आणि अशिक्षित जनतेची दिशाभूल करून तिला चिथावणी देऊन त्यावर स्वत च्या स्वार्थाची पोळी भाजून घेणारे कम्युनिस्ट कार्यकर्ते भाई नार्वेकर हे एक भाडवलदार आहेत हा एक विनोदच आहे. त्याची स्वत ची ६०–७० म्हशीची एक डेअरी असून ते गवताचा व्यापार पण करतात. शेकडो आदिवासीची जगल तोडीची आणि गवत कापणीची मजुरी वेळेवर श्री. नार्वेकरानी दिली नाही, त्याबद्दलचा भरभक्कम पुरावा आमच्याकडे आहे. व्यक्तिगत सपत्ती वाढविण्याच्या विरुद्ध असलेले कम्युनिस्ट स्वत ची सपत्ती, मालकी वाढवण्याच्या मागे लागले आहेत. खरे तर स्वत ला कम्युनिस्ट म्हणून घ्यावयास त्याना लाज वाटायला हवी. कारण व्यक्तिगत सपत्तीचा विकास हे साम्यवादाच्या चौकटीत बसत नाही. स्वत चा स्वार्थ साधण्यासाठी ते अनेक आदिवासीना पिळतात हे आश्चर्यच आहे. जेथे गरिबी आहे, पिळवणूक आहे तेथे तिच्या विरुद्ध लढण्यास कम्युनिस्ट धावून जातात पण येथे श्री. नार्वेकर आणि त्याचे साथीदार तर आदिवासीची मजुरी बुडवून, खातेदाराशी हातमिळवणी करून आणि व्यापार करून आदिवासीना लुबाडण्यासाठी आणि पिळण्यासाठीच आलेले आहेत. समितीने आदिवासीकडून एक पै पण जमा केली नाही. उलट पार्टीच्या नावाखाली श्री. नार्वेकरानी आदिवासीकडून दरवर्षी फार मोठी रक्कम गोळा केली आहे त्याचा हिशोब त्यानी द्यावा अशी आदिवासींनी मागणी केली. आपल्या डेअरीतील दूध महागडया भावाने विकतात तर समिती आपले निर्भेळ ताजे दूध केवळ २ रु. लिटर भावाने विकते. त्यामुळे श्री. नार्वेकराचा व्यक्तिगत स्वार्थ बुडतो म्हणून आपल्या स्वार्थाआड येत असलेल्या समितीच्या कार्यावर श्री. 'नार्वेकर पिसाळले आहेत.

श्री. नार्वेकराना आदिवासीचा उद्धारच करावयाचा असेल तर त्याना अत्यत आत्मीयतेने आम्ही आदरपूर्वक असे आवाहन करतो की आपले कार्य-उद्दिष्ट एकच आहे. तेव्हा आपण आम्हास उदारपणे सहकार्य देऊन समितीच्या कार्याला पूरक आणि पोषक असे विधायक कार्य करण्यास आम्हास उदारपणे मदत करावी. नाहीतरी समिती कटिबद्ध होऊन कार्याला लागलीच आहे. ती आपले कार्य नि स्वार्थ पणे, निरपेक्षतेने आणि निर्भयतेने तडीस नेणारच नेणार !

**विनोद गुप्ता**
महाराष्ट्र गोपालन समिती, मुबई

---


# श्रीग्रामायन

**प्रसिद्ध झाले**
**मूल्य पंधरा रुपये**

**लेखक**
**श्री. ग. माजगावकर**

**राजहंस प्रकाशन**
**पुणे ३०**



महंमद करीम छगला
यांच्या आत्मचरित्राचा
धावता परिचय

अनुवाद : विनय धुमाळे
लेखांक : सात

# ROSES IN DECEMBER
# रोझेस इन डिसेंबर

## एम. सी. छगला

एके दिवशी सकाळी मी आपल्या शिक्षणमंत्रालयात माझ्या काही अधिकाऱ्यांसमवेत चर्चा करीत बसलो असताना अचानक टी. टी. के. आत आले. ताबडतोब मी कान्फरन्स अर्धवट टाकली व टी. टीं. के. ना घेऊन बाजूला गेलो. व त्याना येण्याचं कारण विचारलं. त्यांनी मला सांगितले, की मी युनोत काश्मीरप्रश्नावर भारताची बाजू मांडायला जावं अशी पंतप्रधानांची इच्छा आहे. माझी काही या गोष्टीला तयारी नव्हती. कारण तसा काही तो प्रश्न माझ्या मंत्रालयाच्या कक्षेत नव्हता. पण पंतप्रधानांची इच्छा मी आजवर सदैव मानीत आलो होतो व पंतप्रधानांनी माझ्यावर हा जो विश्वास टाकला होता त्याबद्दल सहाजिकच मला अभिमान वाटला. व त्याबद्दल मी माझी कृतज्ञता टी. टी. कें. ना नेहरूंना कळवायला सांगितली.

हा वाद सेक्युरिटी कौन्सिलमध्ये उपस्थित झाला तो पाकिस्तानच्या तक्रारीमुळे. पाकिस्तानने सेक्युरिटी कौन्सिलमध्ये अशी तक्रार केली होती की, काश्मीरमध्ये उघड उघड बंड झालं होतं. आणि काश्मीरला भारतात सामावून घ्यायच्या प्रयत्नामुळेच ते बंड झालं अशी पाकिस्तानची भूमिका होती.

त्याउलट आपली भूमिका अत्यंत स्पष्ट व निःसंदिग्ध होती. राजकीय व कायदेशीर दृष्टया काश्मीर हा भारताचा एक अविभाज्य भाग होता. सामिलीकरणाच्या तहनाम्यावर काश्मीरच्या महाराजांनी सही करता क्षणीच काश्मीर हे भारताचं एक अवि-

भाज्य अंग बनलं होतं. फक्त स्थित्यंतर सोयीस्कर व्हाव म्हणून काश्मीरला इतर राज्यापेक्षा काही वेगळया तरतुदी करून दिल्या होत्या. पाकिस्तानने स्वत च कबूल केलं होत, की पाकिस्तानने काश्मीरवर व पर्यायाने भारतावर आक्रमण केलं होत. व बेकायदेशीर रीत्या काश्मीरचा काही भाग बळकावला होता. आम्हीच त्यावेळेला सेक्युरिटी कौन्सिलकडे तक्रार केली होती व युद्धबदी प्रस्थापित झाली होती. पाकिस्तान वा इतर कुठल्याही राष्ट्राला त्यामुळे भारताच्या अतर्गत कारभारात व व्यवस्थेत ढवळा ढवळ करण्याची जरूर नव्हती.

बर, त्यावेळी भारताने पाकिस्तानला वचन दिल होत की काश्मीरमध्ये सार्वमत घेण्यात येईल. पण तेही काही अटीवरच. त्या अटी म्हणजे एक तर काश्मीरव्याप्त प्रदेश पाकने खाली करून द्यायला हवा होता. जो पाकिस्तानने आजमितीसही केला नव्हता. त्यामुळे हे वचन बाद ठरले. दुसरे म्हणजे आज त्या घटनेला अनेक वर्षे लोटली आहेत. तेव्हाची परिस्थिती व आताची परिस्थिती यात पुष्कळच फरक पडला आहे सपूर्ण परिस्थितीच पालटली आहे. त्याचप्रमाणे वेळोवेळी झालेल्या सार्वजनिक निवडणुकाद्वारा भारतातच रहायची निसदिग्ध इच्छा काश्मीरवासीयानी व्यक्त केली होतीच. मग त्यात परत सार्वमत अजमावायचा प्रश्न येतो कुठे? सेक्युरिटी कौन्सिलमध्ये मला तोड द्यायच होत. त्यावेळचे पाकचे परराष्ट्र मंत्री श्री. भुत्तोसारखा उच्चपदी असणारा माणूस इतक्या बेजबाबदाररीतीने भाषण करू शकतो हे मी भुत्तोवरूनच पहिल्यांदा पाहिले. हाइड पार्कमधल्या जमावासमोर केलेल्या भाषणाप्रमाणे त्याचे सिक्युरिटी कौन्सिलमधले भाषण असे.

भाषेवरती, शब्दावरची त्याच विलक्षण प्रभुत्व होत. पण दुर्दैवाने या दोन शक्तीचा उपयोग त्यांनी योग्य रितीने केलाच नाही. अनेक वेळेला त्याच्या शब्दाला काही खास अर्थ नसे. कित्येक वेळेला ते आवेशात आपल्या भाषणात कशावरही बोलत व मूळ मुद्दा बाजूलाच राही. सारखे ते असबद्ध बोलत. त्याच बोलण हे अविश्वनीयच मानल पाहिजे. एखाद्या ठिकाणी आपण पकडले जात आहोत असं त्याना वाटल, की दुसऱ्याच कशाचातरी उल्लेख करून तिसऱ्याच प्रश्नावर बोलून मुद्द्याला बेमालूम हुलकावणी देत असत.

सेक्युरिटी कौन्सिलमध्ये प्रत्येक राष्ट्राचे सभासद साधारणत: आपआपल्यात चागले सबंध ठेवून असत. पण भुत्तो माझ्याकडे एखाद्या प्राणघातक वैऱ्याकडे बघावे तसे बघत. त्यामुळे मी ही त्यांच्याशी सपर्क ठेवला नाही. आमच्या काही अधिकाऱ्यानी मी त्याना भेटायला जावं म्हणून सुचवल. पण मी ते साफ नाकारलं. जर त्याच्या प्रतिष्ठेच्या कल्पना एवढ्या ऊच होत्या तर मीच कमीपणा कशाला घ्यावा? त्यामुळे सेक्युरिटी कौन्सिलच्या साऱ्या बैठकीवर माझ व त्याच एका अक्षराने बोलणं झाल नाही.

सुरुवातीच्या माझ्या भाषणात मी म्हणालो की, मुसलमान हे काही त्या अर्थाने भारतात अल्पसख्य नाही आहेत. आज पाच कोटी मुसलमान हिंदुस्थानला आपला देश मानतात आज त्यांच्यासाठी भारतातल प्रत्येक ऑफीस खुल आहे. प्रत्येक नोकरी खुली आहे. त्यांना समान हक्क आहेत. आमची सस्कृती ही अनेक सस्कृत्याच्या मिलाफातून विणली गेलेली आहे. पाकिस्तानबरोबरचे आमचे बरेचसे सघर्ष याचमुळे येत आहेत. आमचा देश धर्मनिरपेक्षतेवर आधारित आहे. तर पाकिस्तान हे धर्माधिष्ठित राष्ट्र आहे. अनेक धर्मीय, विविध जातीय व बहुभाषिक सस्कृत्यावर आमचा विश्वास आहे व आम्हाला असं वाटत की, साऱ्या जगाची शातता यावरच अवलबून रहाणार आहे. आज अनेक आफ्रिकी राष्ट्रात हाच प्रयोग चालला आहे अनेक पश्चिम आशियी राष्ट्रातदेखील हेच चालल आहे व खुद्द अमेरिकेतदेखील भिन्न सस्कृत्या एकत्र आणण्याचा धाडसी प्रयोग चालला आहे

भारताने तहनाम्यावर काश्मीरच्या महाराजाची सही जबरदस्तीने घेतली, या आरोपाला उत्तर देताना मी म्हणालो की, जेव्हा प्रथम भारताची विमाने काश्मिरी जनतेला दिसू लागली तेव्हा त्याच्या डोळ्यातील दु खाश्रूचे आनदाश्रूत रुपांतर झाले. मुसलमान, हिंदू, शीख नि सर्व जमातीनी भारतीय फौजाच स्वागत केलं. कारण त्याना आता खात्री पटली होती की, आपली हरवलेली प्रतिष्ठा पुन्हा आपल्याला लाभणार आहे. मी पुढे म्हणालो की, सार्वमताच्या प्रश्नावरून पाकिस्तान नक्राश्रू गाळीत आहे. पण कुठलाही उपदेश हा सर्वप्रथम स्वत ला लागू असतो. त्याप्रमाणे पाकिस्तानमध्ये का नाही आजवर खुल्या निवडणुका घतल्या? लोकाच्या इच्छा कशा अजमावायच्या हे, लोकशाही भारताला पाकिस्तानने—ज्यांच्या देशात आजपर्यंत एकदाही लोकशाही निवडणुका झाल्या नाहीत त्याने—शिकवायची गरज नाही.

पाकिस्तानला मूलत च असं वाटतं की, हिंदू म्हणजे मुसलमानांचा द्वेष करणारे व मुसलमान हिंदूचा द्वेष करणारे. दोघेही सलोख्याने राहू शकतील हे पाकिस्तानच्या आकलनाच्या मर्यादेत दिसत नाही.

त्यानतर मी सार्वमताविषयी बोललो. त्यात शेवटी मी म्हणालो की, सार्वमताने जर लोकाचे विभाजन होणार असेल अथवा राष्ट्राचे विभाजन होणार असेल तर ते तत्त्व लागू करता येत नाही. येथे मी म्हणालो की, आपल्या दक्षिण भागाला साभाळून ठेवण्याकरता अमेरिकेला रक्तलाछित युद्धसुद्धा कराव लागलं होत.

त्यानतर भुत्तोच भाषण मी ऐकल.

त्याच्या भाषणाला उत्तर देताना मी म्हणालो की, भुत्तोच भाषण ऐकल्यावर राग येण्याऐवजी मला दु ख झाल आहे. एखाद्याला स्वत चा राग आवरता येतो पण दु खाला आवर घालण कठीण. आजवर शांतता व प्रगतीच्या मार्गावर सतत पुढे चाललेल्या आमच्या देशाची भुत्तोनी बदनामी करावी याचा मला खेद होतोय. त्याच्या भाषणाचा सूर एकच : जर काश्मीर प्रश्न सुटला नाही तर भारतात जातीय तणाव सतत रहातील. माझ्या मते आमच्या देशाला ती एकप्रकारे पाकिस्तानने दिलेली धमकीच आहे. अध्यक्षमहाराज, दुरान्वयाने पाकिस्तानी परराष्ट्रमत्री सुचवू इच्छितात की, जर काश्मीर प्रश्न सुटणार नसेल तर युद्ध व रक्तपात अटळ आहे, ही सभागृहासमोर दिलेली धमकी आहे.

अल्पसख्याकाना पाकने जी वागणूक दिली ती मोठी गमतीशीर आहे. पाकिस्तानने सर्वांत परिणामकारक पद्धत अनुसरलीय. त्यानी नावालासुद्धा पाकिस्तानमध्ये हिंदू ठेवला नाही. एकजात साऱ्याना भारतात हाकलून लावले आहे. आम्ही मुसलमानांकडे एक अल्प-

सख्याक जात म्हणून बघत नसून राष्ट्राचं एक महत्त्वाचं अंग म्हणून बघत असतो.

शेवटी मी म्हणालो, की माझ्यापासची सर्व ताकद पणाला लावून मी पाकिस्तानला आश्वासन देऊ इच्छितो, की भारताची पाकिस्तान-वर आक्रमण करायची मुळीसुद्धा इच्छा नाही. शेजाऱ्याशी सदैव सलोखा असावा हीच एक आमची तृष्णा. त्यामुळे हा प्रश्न भारत व पाकिस्तान यांनीच मिळून सोडवायचा आहे. बाहेरील राष्ट्रे वा इतर सस्थाचा यात फारसा काही उपयोग होणार नाही. मी शेवटी म्हणालो, की भिन्न सस्कृत्याचा एक सुरेखसा सास्कृतिक गोफ विणायचा हा महत्त्वाचा प्रयोग भारतात चालला आहे. पाकिस्तान त्यापासून कृपया लाब राहिल व हस्तक्षेप न केला तर ठीक. कारण या आजच्या आमच्या प्रयोगावर उद्याच्या जगाच भविष्य अवलबून रहाणार आहे.

सिक्युरीटी कौन्सिलच्या सदस्यानी आपापसात कॉनसेन्सस घ्यावा म्हणून टूम निघाली. त्याला रशिया व झेकोस्लोवाकिया यानी विरोध केला. त्यामुळे काश्मीर प्रश्न भारत व पाकिस्तान याच्यात सोडवला गेला पाहिजे असा कौन्सिलचा निर्णय ठरला. मी जेव्हा भारतात परत आलो तेव्हा पार्लमेंट सपूर्ण माझ्यापाठी आहे अस दिसल. सारा देश सहाजिकच काश्मीर प्रश्नावरती एक झाला होता.

मला सप्टेंबर १९६५ मध्ये परत सेक्युरिटी कौन्सिलमध्ये जाव लागल. कारण पाकिस्तानने त्यावेळी भारतात हल्लेखोर बेकायदेशीर पणे पाठवले होते. व त्यापाठोपाठ सैन्यही पाठवलं होत.

त्याला अनुलक्षून सेक्युरिटी कौन्सिलने ठराव केले होते व भारत पाकिस्तान या दोघानी युद्धबदी पाळावी व आपापली सैन्ये मागे घ्यावीत अस त्या ठरावात म्हटल होत. वा ! आक्रमण केल होत पाकिस्तानने व सैन्य मागे घ्यायला भारताला सागण्यात आल. हा न्याय काही मला कळेचना. या उलटया न्यायाविरूद्धच मला तेथे झगडायच होतं.

मी म्हणालो 'सेक्रेटरी जनरल आपल्या समोर युनो फौजाने जनरल निम्मो याचा अहवाल आहे व त्या अहवालात निसदिग्धपणे सागण्यात आले आहे, की पाकिस्तानी हल्लेखोर भारतात घुसवले गेले त्यामुळे ६ सप्टेंबरचा ठराव हा अत्यत अन्यायकारक आहे. त्यात आक्रमक व ज्यांच्यावर आक्रमण झाले आहेत ते अस दोघांनाही एकाच मापाने तोलण्यात येत आहे.'

मी पुढे म्हणालो, जर आक्रमकाला सरळरित्या आक्रमक म्हणून त्याचा धिक्कार करता येत नसेल तर काय उपयोग आहे त्या सेक्युरिटी कौन्सलचा ? अशा रीतीने आतराष्ट्रीय कायदा जगू शकणार नाही की आतरराष्ट्रीय समाज विस्तारणार नाही. अध्यक्ष महाराज, मी परत कळकळीची विनती करतो, की कृपया आक्रमक व आक्रमित याची तुलना एकाच पारड्यातून करू नका त्याच्याकडे एकाच दृष्टिकोनातून बघू नका व आक्रमकाचा नि:सदिग्ध भाषेत धिक्कार करायला मागेपुढे पाहू नका.

भुत्तो आज म्हणतात याना १००० वर्षे भारताशी युद्ध करायच आहे. उद्या ते इदिरा गाधीना आपली बहीण मानतात तिकडे युरोपिअन वृत्तपत्रात परत भारताला पाकिस्तानच्या अमलाखाली आणण्याचे मनसुबे रचतात. अशा या व्यक्तीवर कोण विश्वास ठेवील ?

ज्या प्रमाणे आत्ताच मलेशिअन प्रतिनिधीनी म्हटले त्याप्रमाणे, जर बदुकीची नळी व सगिनी दाखवून पाकिस्तानला काश्मीरमध्ये सार्वमत घेता आल तर ती एक महान दुर्घटना होईल. याला मी ब्लॅकमेल म्हणतो. एखाद्या देशाच्या प्रातात घुसायच. देश उजाड करायचा, त्यावर बॉबची वृष्टी करायची व नतर म्हणायच की तुम्ही काश्मीरमध्ये सार्वमत घेत असल्यास आम्ही काश्मीरमधील युद्ध थाबवतो. हे ब्लॅकमेलिंग नाही तर काय ? ही पाकिस्तानची नीती चालू दिली तर त्यासारख दुर्भाग्य दुसर नसेल.

या वादाच्या वेळी ब्रिटिश सरकारची नीती मात्र अत्यत निंद्य होती. हॅरॉल्ड विल्सन यानी मोठीच चूक केली. त्याबद्दल नतर त्यानी माफीही मागितली पण त्या वेळच त्याच वागण हे न्याय्य नव्हत.

भारत युद्धबदीला सदैवच तयार होता, पण भुत्तोनी मोठे नाटक करून रात्री बारा वाजता सेक्रेटरी जनरलना उठवून युद्धबदी स्वीकारली. यावेळी आपल्याला झेकोस्लावाकिया व रशिया यानी जी मदत दिली त्याला तोड नाही. दुसऱ्या राष्ट्राचे आपल्याला कोडीत पकडण्याचे प्रत्येक प्रयत्न त्यांनी विफल केले. त्या बद्दल भारत त्यांना सदैव ऋणी राहील.

[ क्रमशः ]


## साप्ताहिक माणूस : वर्गणीचे नवे दर

वार्षिक : छत्तीस रुपये

सहामाही : वीस रुपये

परदेश : (जलमार्गे)

पंचावन रुपये

वसन्त डोळस

# आणि दुसऱ्या महायुद्धाचा भडका उडाला!



दोन महायुद्धांनी सारं जग चांगलंच होरपळून निघालं आहे. लाखो माणसे प्राणास मुकली. कोटयवधी डॉलर्सचा चुराडा झाला. पहिल्या महायुद्धानंतरच खरं पाहाता सर्व जगानं काहीतरी बोध घ्यायला हवा होता – पण शहाणपणा येण्याऐवजी ते त्यापासून दूरच राहिले.

आणि मग १ सप्टेंबर १९३९ या दिवशी हिटलरच्या तुफानी माऱ्यानं या दुसऱ्या महायुद्धाला सुरुवात झाली. ती हकिगत मोठी मनोरंजक अशीच आहे.

"मी दुसरं महायुद्ध सुरू केलं होतं. १९३९ मध्ये मीच साऱ्या युरोप खंडाला युद्धाच्या खाईत लोटलं होतं. परंतु मी जे काही त्यावेळी केलं त्याबद्दल मला काडीमात्रही पश्चात्ताप होत नाही. कारण मी कधी गत जीवनाविषयी फारसा विचारच करीत नाही !"

हे उद्गार पश्चिम जर्मनीतील ग्रोस फ्लोटबेकर या शहरातील 'डॉर्कफरूग रेस्टारंट'च्या अल्फ्रेड नाऊजोक्स या मालकाचे आहेत.

नाऊजोक्स वयाच्या सतराव्या वर्षीच नाझी पक्षाचा स्वयंसेवक बनला होता. आणि दोन वर्षांपर्यंत त्याने हिंसाचार आणि घातपात करण्याचे सूक्ष्म असे शिक्षण घेतले.

जानेवारी १९३३ मध्ये हिटलरच्या हाती सत्ता आली. त्यावेळी नाऊजोक्स बर्लीनला गेला. तेथे त्याचा एक विश्वासू नाझी सैनिक म्हणून सत्कार करण्यात आला.

१९३३ साली हिटलर आणि सैन्याचे प्रमुख सेनापती हेनरीक यांनी एका जहाल तुकडीची स्थापना केली. तिला एस. डी. या नावाने संबोधण्यात येई. आणि त्या संघटनेच्या अध्यक्षपदी रीझार्ट हायड्रीकची नेमणूक करण्यात आली. एस. डी. संघटनेकडे एकच काम होते. हिटलरला ज्याचा कायमचा काटा काढावयाचा असेल त्याचे नाव, वर्णन व फोटो एस. डी. या संघटनेकडे देण्यात येत असे. आदेश मिळताच एस. डी. चे लोक त्याचा काटा काढीत असत.

मोठमोठ्या अधिकारावरील अधिकाऱ्यांची चौकशी करणे आणि वरून आदेश मिळताच त्यांचा 'निकाल' लावणे असे व्यापक अधिकार या संघटनेकडे होते. या संघटनेतील सदस्यांना एखाद्याचा पाठलाग करणे, नासधूस करणे, व एखाद्याचा खून कसा करावा याचे पद्धतशीरपणे शिक्षण देण्यात येत असे. कॉन्सेन्ट्रेशन कॅम्पमधील यहुदींची मृत शरिरे त्यांना प्रशिक्षण देण्यासाठी आणण्यात येत.

नाऊजोक्स या संघटनेत सामील झाला. आणि त्याने आपले प्रशिक्षण पूर्ण केले. पुढे त्याची हुशारी पाहून हायड्रीकने त्याला आपला सेक्रेटरी बनविले. या साऱ्यात सव्वा वर्ष उलटले. पुढे एका विशेष कामगिरीसाठी नाऊजोक्सला पाचारण करण्यात आलं.

१० जानेवारी १९३५ ला नाऊजोक्स हायड्रीक पुढे हजर झाला. हायड्रीकने सांगितले, 'तुम्हाला दोन आठवडयाची रजा देण्यात येत आहे. आपण उद्यापासून रजेवर जावे. तुम्हाला रजा घालविण्यासाठी चेकोस्लोव्हाकियात पाठविण्यात येत आहे. तिथे आपण ओझरे पर्वतावर स्केटिंग (बर्फावरील खेळ) कराल. त्या प्रदेशात एक गुप्त ट्रान्समीटर बसविण्यात आला आहे. तो हिटलरच्या विरूद्ध रात्रंदिवस टीकेची झोड

उठवित आहे. अनाऊन्सरचे नाव रूडाल्फ फोरमीस अस आहे. तो या अगोदर स्टटगार्ट रेडिओ स्टेशनच्या टेक्निकल विभागाचा प्रमुख होता. तुमच्यावर त्याला व त्याच्या रेडियो स्टेशनला शोधून काढायचे काम आहे. या संदर्भात आपण मला एकही प्रश्न विचारू नका. तुम्हाला त्याचा एक फोटो देतो. तेवढा जवळ ठेवा !"

दुसऱ्या दिवशी नाऊजोक्स आय्. पी. ४८२५९ या नंबरच्या एका काळ्या रंगाच्या मर्सिडीज कारमधून चेकोस्लोव्हाकियाकडे निघाला. डेसिन नामक ठिकाणी सीमा ओलांडून चेकोस्लोव्हाकियात प्रवेश करताच आता तो पहिला नाऊजोक्स राहिला नव्हता. आता तो ड्रेसडेनमधील एक व्यापारी अल्फ्रेड गर्बर बनला होता. त्याच्या कार वरच्या डेकवर स्केटिंगच्या खेळासाठी आवश्यक असलेले साहित्य बांधण्यात आलं होत. सीमेवरच्या चौकीदारान वरील सामान पाहून त्याची विशेष अशी झडती घेतली नाही. नाऊजोक्स आणि आताचा गर्बर ओइरे नदीच्या काठी असलेल्या एका हॉटेलात थांबला. मात्र तेथून त्याने फोरमिसच्या शोधासाठी निकराने प्रयत्न चालविले. त्याच चालण, वागण, बोलण सुटी घालविण्यासाठी आलेल्या एखाद्या सर्वसामान्य प्रवाशासारखच होतं. त्यामुळे हॉटेल मालकालादेखील त्याच्याविषयी काडीमात्र सशय आला नाही.

दिवस येत होते, जात होते. पण फोरमिसचा ठावठिकाणा काही केल्या त्याला लागेना.

२४ जानेवारीला त्याची कार ओइरे नदीच्या काठी असलेल्या एका दुमजली घराजवळ थांबली. दरवाजावर पाटी होती. त्यावर लिहिल होत, "हॉटेल जोहरी."

नाऊजोक्स जिना चढून वर गेला आणि त्याने दार ठोठावले. आतून आवाज आला–

"कोण आहे ?" तो फोरमिसचा आवाज होता. नाऊजोक्स पाहिजे त्या ठिकाणी अगदी बिनचूकपणे जाऊन पोहचला होता. नाऊजोक्स खोटाच आव आणून मोठ्याने म्हणाला,

"फोरमिस दरवाजा लवकर उघड. गेस्टापोच्या लोकाना तुझे हे ठिकाण माहीत झाले आहे !"

ते ऐकून फोरमिस चागलाच गागरून गेला. त्याने प्रथम किंचितसा दरवाजा उघडला त्या फटीतून नाऊजोक्सने फोरमिसचा चेहरा पाहिला. फोरमिसने विचारले,

"तुम्ही कोण आहात ?"

नाऊजोक्सने झाडलेली गोळी फोरमिसच्या गळ्यातून आरपार गेली होती. नतर दरवाजा उघडून नाऊजोक्स आत घुसला. तेथे पडलेला ट्रान्समीटर उचलून त्याने कारच्या चोरकप्प्यात तो टाकला

नाऊजोक्स गर्बर नामक व्यापाऱ्याच्या वेशात चेकोस्लोव्हाकियात शिरला होता. त्याच वेशात तो परतला.

एक आठवड्यानतर हायड्रीकने त्याला बोलाविले आणि सागितले,

"हिटलर, तुमच्या कामगिरीवर फार खूश झाले आहेत आणि त्यांनी तुम्हाला होप्टस्ट फ्यूररचे पद बहाल केले आहे."

परतु नाऊजोक्सच्या जीवनातील सर्वात महत्त्वपूर्ण क्षण अजून पुढेच होता.

पुढे नाझी सैन्याने सपूर्ण चेकोस्लोव्हाकियावर कबजा केला होता. त्यांनतर दोन महिने उलटले.

२३ मे, १९३९ या दिवशी हिटलरने एक गुप्त बैठक बोलाविली. या बैठकीत नाझी सेनाध्यक्ष हरमन गोरिंग, प्रधान सेनापती विलियम कीटल आणि जर्मन नौसेनाध्यक्ष अॅड्मिरलर रोडरने भाग घेतला.

बैठकीत ठरले की, जर्मन सेनेने पोलडच्या रोखाने आगेकूच करावी. परतु यासाठी काहीतरी कारस्थान घडवून आणणे आवश्यक आहे. हिटलरच अस स्पष्ट मत होत की, पोलडनेच जर्मनीवर प्रथम हल्ला केला आणि बदला घेण्यासाठीच नतर जर्मनीने पोलंडवर हल्ला केला असा जगाचा समज झाला पाहिजे.

१० ऑगस्ट, १९३९, ओबरग्रपेन फ्यूरर हाइड्रीकने होप्टस्टर्म–फ्यूरर नाऊजोक्सला बोलावून घेतले. आणि त्याला म्हणाला,

"मी आपणाला हिटलरच्या अतिम आदेशाच्या सदर्भात माहिती देण्यासाठी बोलाविले आहे आपणाला जर्मन सरकारच्या अत्यत गुप्त कामकाजाची माहिती देण्यासाठी बोलाविले आहे आपण आपल्याला कळलेली माहिती जर दुसऱ्याजवळ सांगण्याचा प्रयत्न कराल तर त्याच क्षणी आपल्याला गोळी घालण्यात येईल."

हायड्रीकने बॅग उघडली आणि त्यातील गुप्त कागदपत्र काढून नाऊजोक्सपुढे वाचन सुरू केले.

"१ सप्टेंबर १९३९ या दिवसापर्यंत आपणाला कोणत ना कोणतं कारण पोलडशी युद्ध करण्याच्या कामी शोधून काढलेच पाहिजे आणि ते कारण असच असल पाहिजे की, पोलंडनेच प्रथम जर्मनीवर आक्रमण केलं असं भासाव. या कारस्थानाचे नाव असेल, 'हिटलरचे कारस्थान.' आणि ते कार्यान्वित करण्याची अतिम जबाबदारी हायड्रीकवर सोपविण्यात येत आहे"

हिटलरचा आदेश वाचून दाखविल्यावर हायड्रीक नाऊजोक्सला म्हणाला, "परदेशी वृत्तसस्थांना आणि त्याबरोबरच जर्मनीच्या प्रचार विभागालादेखील हे कारण पटल पाहिजे की, खरोखरच प्रथम पोलडनेच जर्मनीवर स्वारी केली

सीमेवर अस तग वातावरण निर्माण झाल पाहिजे की, भित्र्यात भित्र्या जर्मन माणसाला देखील अशी प्रेरणा झाली पाहिजे की, आपण जर्मनीसाठी पोलडशी दोन हात करायलाच हवेत.

नाऊजोक्स आतापर्यंत कोणत्याही कामगिरीसाठी एका पायावर तयार असे. पण यावेळी हा आदेश ऐकून तोही पुरता भांबावून गेला. हायड्रीकला देखील नाऊजोक्स पुढील कठीण कामगिरीची कल्पना होती. परतु तरी देखील त्याने सारी योजना त्याला समजावून सागितली. शेवटी तो नाऊजोक्सला म्हणाला,

"तुम्हाला पोलडच्या सीमेवरील ग्लाइविलजच्या रेडिओ स्टेशनवर हल्ला करावा लागेल व हे निदर्शनास आणून द्यावे लागेल की, सीमेवरील जर्मन रेडिओ स्टेशनवर पोलडच्या आक्रमणकारी सैनिकानीच हल्ला चढविला होता. तुमच्याबरोबर एक दुभाषा असेल, तो पोलीश भाषेत त्या केंद्रावरून जर्मन विरोधी प्रचार करील–हे भाषण ब्रेसला येथे सहक्षेपित करून सर्व जर्मन केंद्रावरून जर्मनीत प्रसारीत करण्यात येईल. ब्रेसला येथील कार्य इतर लोक पार पाडतील, आपण फक्त ग्लाइविलजचीच कामगिरी पार पाडावी."

नाऊजोक्सने आपल्यावर सोपविलेले कार्य यशस्वीपणे पार पाडण्यासाठी एक योजनापूर्वक

आराखडा तयार केला. आणि १५ ऑगस्टला आपल्या सात विश्वासू साथीदारासह तो ग्लाइविल्जकडे रवाना झाला.

धूळ माखलेल्या दोन कार ओवरश्लेसिशर हॉटेलच्या बाहेर थाबल्या. हॉटेलमध्ये नाऊजोक्सने आपले नाव इंजिनियर हरमन कोइलर अस सागितल. त्याने हॉटेलच्या रजिस्टरमध्ये आम्ही भूगर्भ सर्वेक्षण करण्यासाठी आलो आहोत अस लिहिलं. त्या प्रदेशाची त्याने अगदी सूक्ष्म माहिती मिळविली कारण तिचा त्याला पुढे उपयोग होणार होता.

सर्व तयारी झाल्यावर नाऊजोक्सने हायड्रीकला कळविल की, सर्व तयारी झाली आहे. मला अतिम सदेश मिळण्यासाठी बर्लिनला येण्याची परवानगी मिळावी. परंतु हायड्रीकने त्याला स्पष्ट नकार दिला. आणि कळविले की, शेजारच्या ओपेल शहरी जाऊन तेथील मुल्लर नामक गेस्टापोच्या अधिकाऱ्याला जाऊन भेटावे. तिथेच आपण हिटलरच्या अतिम आदेशाची वाट पहावी.

न्यूरेंबर्ग खटल्याच्या वेळी नाऊजोक्सने या मुलाखतीचे वर्णन करताना सांगितले की, २५ ते ३१ ऑगस्टच्या दरम्यान एके दिवशी मी गेस्टापोचे अधिकारी हेन्रीक मुल्लर याना भेटावयास गेलो होतो. त्याने सांगितले की, आपल्याला असे वातावरण निर्माण करावयाचे आहे की, जणू हे आक्रमण पोलडनेच केले आहे. माझ्याजवळ १२–१३ फाशी दिलेल्या अपराधी लोकांची शवे आहेत. त्याना पोलीश सैनिकाचा पोशाख चढवा आणि सीमेवर ठेवून त्यांच्यावर योग्य वेळी गोळ्या झाडा. लोकाना वाटेल की, आक्रमण करताना ते बळी पडले. त्या मृत देहाना अगोदर विषाची इजेक्शन्स देण्यात येतील या कामगिरीसाठी हायड्रीकने अगोदरच एका डॉक्टराची नेमणूक केली आहे.

मात्र या विषारी इंजेक्शनावरोबरच त्या माणसाच्या अगावर गोळयाच्याही खुणा पाहिजेत. या घटनेनतर परदेशी वार्ताहराना तेथे नेण्यात येऊन माहिती देण्यात येईल. पोलीस रिपोर्ट पण तयार करावा लागेल. या कैद्याना साकेतिक भाषेत 'डबा-बद मटन' या नावाने सबोधण्यात येईल.

सर्व तयारी पूर्ण झाली. १३ ऑगस्टला दुपारी हायड्रीकने फोनवरून नाऊजोक्सला आदेश दिला की की, आपल्या कार्यासाठी 'रात्रीची आठ' ही वेळ निश्चित करण्यात आली आहे. फोनवरून त्याने साकेतिक भाषेत असेही सागितले की, हे कार्य पूर्ण करण्यासाठी मुल्लरकडून आपण 'डबाबद मटनाची मागणी करावी. नाऊजोक्सने वचनाचे पालन करण्याचे हाहड्रीकला वचन दिले. आणि त्याने मुललरला कळविले, की 'आपण डबाबद मटन रेडिओ स्टेशनच्या दरवाजावर ठेवावे!'

चार वाजता सातजण एकत्र जमले. आणि सात वाजण्याची वाट पाहू लागले. सात वाजता नाऊजोक्स बाहेर पडला. मागोमाग त्याचे साथीदार होतेच.

त्यांच्या मोटारी रस्ता सोडून जगलाच्या रोखाने निघाल्या. अर्धा किलोमीटरवर त्या थांबल्या. नाऊजोक्सने दोन पेटघा काढल्या. त्यात पोलिश सैनिक वापरीत त्या प्रकारचे कपडे होते. सर्वांनी तो वेष परिधान केला. त्यांच्याजवळ पोलडमध्ये तयार झालेल्या सिगारेटची पाकिटे होती. आणि पोलीश पासपोर्ट होता.

आता आठ वाजायला काही मिनिटेच बाकी होती. तेवढ्यात ग्लासविल्त रेडिओ स्टेशनच्या पुढे दोन कार थाबल्या. सशस्त्र सैनिक त्याच्यातून उतरले व दरवाजाच्या रोखाने निघाले. उजव्या बाजूकडील एका रूममध्ये प्रकाश होता. त्यात निळा वेष धारण केलेली एक व्यक्ती बसली होती त्याने दरवाजा उघडून बाहेर पडण्याचा प्रयत्न केला. त्याचवेळी गेस्टापोच्या एका सैनिकाने त्याच डोक समोरच्या भिंतीवर आपटून त्याला यमसदनाला पाठविले. त्याचवेळी नाऊजोक्स रूममध्ये घुसला आणि त्याने फाईलमध्ये डोके खुपसून बसलेल्या एका माणसाचे डोके रायफलच्या बुध्याने ठेचून काढले. सगळीकडे गोघळ उडाला. आणि त्याबरोबरच चोहोबाजूनी गोळ्याचा वर्षाव सुरू झाला.

नाऊजोक्स स्टुडिओत घुसला तेव्हा तेथे त्याला दुभाषा दिसला. तो मायक्रोफोनच्या समोरच होता. आणि त्याच्या हातात भाषणाची प्रत होती. रेडिओ ऑपरेटरने बटन दाबले. आणि त्याचे भाषण प्रसारित करण्याचे काम सुरू झाले. दुभाषाने सागितले की, ही पोलीश घोषणा आहे. घोषणात त्याने सागितले की, आता वेळ आली आहे, पोलडने जर्मनीबरोबर युद्ध करायलाच हवे. पोलडच्या सर्व नागरिकानी सघटित झाले पाहिजे. आणि विरोध करणाऱ्या सर्व जर्मनाना यमसदनास पाठविले पाहिजे.

माईकवरून गोळ्याचा आवाजही लोकांना ऐकू जावा म्हणून नाऊजोक्सने काही गोळ्या स्टुडिओच्या छातावरच झाडल्या. द्वितीय महायुद्धातील पहिली गोळी रात्री आठ वाजून पधरा मिनिटानी झाडली गेली.

१ सप्टेंबर १९३९ ला पहाटे चार वाजून पंचेचाळीस मिनिटानी हिटलरचा आदेश मिळताच जर्मन सैन्याने पोलडची सीमा ओलाडून आत प्रवेश केला आणि दुसऱ्या महायुद्धाचा भडका उडाला.

☐ ☐


# फिडेल, चे आणि क्रांती

लेखक : अरुण साधू

किमत : सात रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे



# और एक गार्बो

## एलकुंचवारचे–दुबेचे ?

कोणत्याही नाटचसहितेचे दृश्यश्राव्य सकल्पन दिग्दर्शकाचे असते. म्हणूनच महेश एलकुचवाराच्या 'गार्बो' या नाटकाचा प्रथम प्रयोग (मराठी) डॉ. लागूचा होता तर 'और एक गार्बो' हा हिंदी प्रयोग सत्यदेव दुबेचा आहे असे म्हटले तर त्यात गैर काही नाही. किंबहुना नाटककाराने लिहिलेला प्रत्येक शब्द पवित्र मानून दिग्दर्शकाने केवळ नाटक 'बसविण्याचे' काम करावे असे आज आपण मानीत नाही. परतु दिग्दर्शकाने केलेला बदल जर नाटचानुभवच बदलीत असेल तर ते नाटक नाटककाराचे मानायचे का ? असा एक प्रश्न 'और एक गार्वो' हा नाट्यप्रयोग पहाताना मनी आला. 'गार्बो'च्या मराठी नाट्यप्रयोगातही, डॉ. लागूनी, मुळातला नाटककाराने योजलेला अत बदलला होता. परतु अत बदलणे आणि सपूर्ण नाटकाचे अनुभवसूत्र पालटणे यात बराच फरक आहे.

एकतर सत्यदेव दुबेने, 'और एक गार्बो' तारस्वरात बसवायला घेतले आहे मूळ 'गार्बोमधील उद्रेक हे, इतर सथ, कंटाळवाण्या, कधी आशकावादी, सथपणाच्या विरोधाने येतात; भावकाव्याच्या विरोधाने अर्थपूर्ण होतात परतु 'और एक गार्बो' सपूर्णपणे आक्रमक शैलीत बसविल्यामुळे त्यातील उद्रेक, हिसा अर्थहीन होतात. हिंदी प्रयोग पाहाताना प्रथमदर्शनीच जाणवले ते हे की दिग्दर्शक, इन्टुक, पॅन्झी, श्रीमत, गार्बो साऱ्याकडे व्यक्ती म्हणून पाहतो आहे. डॉ. लागूनी मराठी प्रयोगात, तीन व्यक्ती म्हणजे एका व्यक्तीच्या तीन प्रवृत्ती मानल्या होत्या. मला स्वत ला 'गार्बो'तला अनुभव हा अमूर्त प्रवृत्तीचाच आहे असे वाटते. याची विस्तारपूर्वक चर्चा मागे या सदरात झालेली असल्यामुळे पुनरावृत्ती टाळून एवढेच म्हणता येईल की व्यक्ती म्हणून पात्रांकडे पाहिल्यामुळेच हिंदी 'गार्बो'तील भूमिका फार बटबटीत झाल्या. आणि नाटकाच्या अती गार्बो आत्महत्त्या करते असे दर्शवून दिग्दर्शकाने मूलअनुभवालाच छेद दिला. कारण गार्बोचे अस्तित्व वा अत इन्टुक, पॅन्झी, श्रीमत याच्याच सदर्भातील असू शकतो.

हिंदी 'गार्बो'मध्ये इन्टुकची भूमिका स्वत: सत्यदेव दुबे करतात. दिग्दर्शक म्हणून दुबे मोठे असले तरी अजूनतरी नट म्हणून त्याना काही विश्वासाने स्वीकारावे अशी त्याची भूमिका मी अजून पाहिलेली नाही. त्याचे आवाज फेकणे आणि काव्यगत शब्दोच्चार ही वैशिष्टचे मान्य करूनही मी वरील विधान करीत आहे. एक व्यक्ती म्हणून दुब्याचे जे उद्रेकी आक्रमक असे व्यक्तिमत्त्व आहे त्यापासून दूर जाऊन एखादी भूमिका उभी करणे त्याना अवघड जात असावे इन्टुकची भूमिका उभी करतानाही त्या भूमिकेतील कडवट सिनिकपेक्षा त्यानी अस्वस्थ चिडचिडलेल्या माणसाला प्राधान्य दिले. इन्टुकला एवढ्या हालचाली देणे हेही 'गार्बो च्या एकूण रचनेचा विचार करता अप्रयोजक वाटते. अगदी प्रारभीच्या प्रवेशात इन्टुक नुसता बसलेला आहे, त्यावेळी त्याच्या बुटाच्या आवाजाची कटाळवाणी लय दिग्दर्शकाने वापरली होती. स्वत सिद्धपणे रंगमचभाषा वापरण्याची ही चागली युक्ती असली तरी इन्टुक या पात्राच्या व्यक्तिरेखेशी ती जुळत नाही किंबहुना पहिल्या प्रवेशातील इन्टुक-पॅन्झी या दोन वृत्तीचे नातेही त्यामुळे प्रस्थापित होऊ शकत नाही. तसेच श्रीमंतला (अमरीश पुरी) खोटे मोठे पोट लावून त्याचे व्यगचित्रात्मक प्रक्षेपण दिग्दर्शकाने कसे केले उमजत नाही अमरीश पुरी या नटाने इतक्या असमजसपणे केलेली भूमिका मी तरी अजून पाहिली नव्हती ! त्याच्या आवाजातील स्वाभाविक हुकमतसुद्धा दिग्दर्शकाने व स्वत. त्याने वापरली नव्हती. सुनील शानभाग हा नवा तरुण नट पॅन्झी दिसत होता. परतु नाटकातील वयाच्या उल्लेखाबरहुकूम नट शोधण्याचा अलीकडचा खटाटोप मला अप्रयोजक वाटतो. कारण कलावत म्हणून प्रगल्भता असणे अनेक गुतागुतीच्या भूमिकाना आवश्यक असते : ती इतक्या नाशिक्या नटाकडून अपेक्षायची का ? गार्बो ही सुदर असली पाहिजे अशी एक सर्वमान्य अपेक्षा दिसते; त्याचाही मला नेमका उलगडा झालेला नाही. सुनीला प्रधान यानी गार्बोची भूमिका दिग्दर्शकाच्या कल्पनेप्रमाणे आणि त्या कल्पनेच्या मर्यादेत चागली केली. पण पराभूत गार्बो मात्र त्या उभी करू शकल्या नाहीत. सुनीला प्रधान व सत्यदेव दुबे या दोघानीही 'गार्बो'तील काव्यात्म भाग निष्प्रभ केले. या सर्व गोष्टींमुळे हिंदी प्रयोग पाहताना 'गार्बो' हे फार उथळ नाटक आहे असे वाटू लागले पण तेव्हा ते 'गार्बो' महेश एलकुचवाराचे नसून दुबे याचे होते.

सत्यदेव दुबे याचा 'दिग्दर्शनक्षेत्रातील अनुभव इतका मोठा आहे की वरील मर्यादा लक्षात घेऊनही काही जागा त्यानी चागल्या घेतल्या यात नवल काही नाही. परतु त्याचा उल्लेख आवश्यक आहे. उदा. मुलाची वाट पाहू शकणाऱ्या साऱ्याची मनोवृत्ती दर्शविण्यासाठी पॅन्झीलाच श्रीमत लहान मुलासारखे खेळवतो, त्याच्याकडे पाहण्याची विकृत दृष्टि विसरतो, हा तपशील अर्थपूर्ण होता.

या नाटकाचे नेपथ्यही विनाकारण दिखाऊ आणि प्रत्यक्ष प्रयोगात वापरले न जाणारे वाटले.

मराठी 'गार्बो'च्या प्रयोगानेही पूर्ण समाधान दिले नव्हते. या हिंदी प्रयोगाने तर मूळ नाटकाची बदनामी केली आहे. खरे तर 'गार्बो 'चा निकटवर्ती रगमचावर प्रयोग झाल्यास त्यातील काठ्य आणि विद्रुपता (grotesque) यांचा अर्थपूर्ण अन्वय रसिकांपर्यंत पोहोचेल असे वाटते.

—पुष्पा भावे

कलोपासक–जुलै

# ॲडमिशन

वि. भा. देशपांडे

महाराष्ट्रीय कलोपासकानी जुलैमध्ये माधव आचवल यांची 'ॲडमिशन' एकांकिका सादर केली जूनमधील 'लगी शर्त' आणि जुलैमधील 'ॲडमिशन' या एका पाठोपाठच्या महिन्यात झाल्याने आचवलाच्या या दोन एकांकिका विषय परिचित असूनही नाटयाच्या दृष्टीने काहीशा निराळ्या भासणाऱ्या अशा आहेत किंबहुना एरवी सर्व सामान्य अशा घटना प्रसगान्न नाटयकार लाभेल किंवा नाही अशी शकाही निर्माण व्हावी इतकी नाटयप्रसगाच्या विषयाची निवड साधी वाटते. साकेतिकापासून दूर असलेली अकृत्रिम अशी त्याची सवाद लेखन पद्धती साध्या विषयाला नाटयरूप देण्यास समर्थ आहे परतु या दोन्ही एकांकिकेतील नाटयानुभव हा एकाच पातळीवरून प्रवास करणारा आहे. एकदेशीय आहे अनुभवाची व्यामिश्रता त्यामध्ये जाणवत नाही. एकापेक्षा अधिक ताण निर्माण करून नाटयानुभावाची खोली वाढली जात नाही.

'ॲडमिशन'मध्ये आजच्या शिक्षण पद्धतीतील भ्रष्टाचार व्यक्त केला आहे. एखाद्या शिक्षण सस्थेत विद्यार्थ्याला प्रवेश मिळण्यासाठी जसे काही गुणवत्तेचे सरळ मार्ग आहेत, तसेच कमी गुणवत्तेच्या विद्यार्थ्याला अन्यही मार्ग आहेत. त्या अन्य मार्गांचे काहीसे चित्रण एकांकिकेत आहे. नियमाबाहेर एखाद्याला प्रवेश देणे आणि त्यासाठी काही देवाण-घेवाण करणे ही नित्याची गोष्ट आहे, यावर एकांकिकाकाराने भर दिला आहे. तसेच आणखी एक महत्त्वाचे सूत्र त्यात आहे, की यासबंधात गैरव्यवहार हा आता सहजतेचा आणि प्रतिष्ठेचा व्यवहार झालेला आहे. विशिष्ट जागेवरील माणसाला ते करावेच लागते. कारण त्या मोबदल्यात त्याचे अन्य ठिकाणचे काम होत असते विषयाचे वास्तवरूप जितके लक्षवेधी होते तितकेच त्याच्या रचनेतील मर्यादा स्पष्टतेने जाणवत होत्या. शिक्षण सस्थेतील एका डीनच्या खोलीत एकांकिका घडते त्यामुळे स्थळकाळाच्या मर्यादा पडल्याच. एकांकिकेला उत्तरार्धात चर्चेचे, भाषणाचे रूप आले.

या एकांकिकेचे दिग्दर्शन आणि डीनची प्रमुख भूमिका वासुदेव पाळदे यानी केली होती. त्यानी आपल्या भूमिकेचा तोल अखेरपर्यंत उत्तम रीतीने साभाळला. विशेषत डीनपदी असणाऱ्या माणसाच्या बोलण्यातला दिसण्यातला नेमकेपणा त्यानी यथार्थपणे अभिनित केला. अन्य दोन महत्त्वाच्या भूमिका श्याम जोशी आणि धनजय गोळे यानी केलेली एका प्राध्यापकाची भूमिका छोटी होती. ती त्यानी ठीक केली. श्याम जोशी याना अधिक काम होते एकूण वेळापैकी निम्मा अधिक वेळ ते टेबलावरच्या फाइली पाहाण्यात गुतल्याचा अभिनय करीत होते. त्यामुळे त्याचा मुद्राभिनय कळू शकत नव्हता. ज्यावेळी ते अन्य पात्राकडे पाहून बोलले तेव्हा तीन-चार वेळा तरी असे लक्षात आले की शब्द सवादावर त्याची पकड घट्ट नव्हती. कदाचित नतरच्या प्रयोगात तो दोष नाहीसा झाला असेल. मी दुसऱ्या बुधवारचा प्रयोग पाहिला. हे दोष आवर्जून साागण्याचे कारण असे की एकांकिकेचा उत्तरार्ध श्याम जोशी आणि पाळदे याच्या सवादावरच अवलबीत आहे पाळदे यानी दिग्दर्शक म्हणून स्वत:-बरोबरच इतराच्याही सवादफेकीकडे अधिक काळजीपूर्वक लक्ष द्यायला हवे होते. कारण या एकांकिकेत कृतीपेक्षा सवादाला अधिक महत्त्व होते. शब्दोच्चार आणि सवादफेकीला अधिक वजन लाभते तर नाटयाशय व्यक्त होण्यास विशेष साह्य झाले असते. □ □


फुकट फुकट फुकट

**पांढरे डाग**

गौतम औषधाने जवळजवळ ३० वर्षे पांढरे डागाचे रोग्याना ६ दिवसात फायदा देऊन प्रसिद्धी मिळविली आहे. एक पॉकेट औषध फुकट मागवून फायदा मिळवा.

**गौतम आयुर्वेद भवन (SD-2)**


## नाटयशिक्षण केंद्र

रगभूमीवरील शिक्षण देण्यासाठी वरील सस्थेच्या वतीने तीन महिने मुदतीचा एक अभ्यासक्रम कीर्ती महाविद्यालयात आयोजित केला असून त्याची सुरुवात येत्या १५ ऑगस्ट ७४ पासून होणार आहे. या अभ्यासक्रमात नाटयसृष्टी, नाटयसहिता, अभिनय, आवाजाची जोपासना, तात्रिक अगे, दिग्दर्शन व समीक्षा इत्यादी अगाचे व्याख्याने व प्रात्यक्षिके याच्याद्वारे शिक्षण दिले जाईल. तीन महिन्याच्या अभ्यासक्रमाचे एकदर शुल्क रु. ५०।– आहे. वर्ग सायं. ६-३० ते ८ या वेळात होतील. अभ्यासक्रमाच्या अखेरीस परीक्षा घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे दिली जातील तसेच विद्यार्थ्यांचा नाटयविषयक कार्यक्रम रगभूमीदिनाच्या दिवशी (५ नोव्हें. रोजी) करण्यात येईल. या केंद्राचे सचालन प्रा. कृ. रा सावत, करणार असून रगभूमीवरील इतर काही तज्ज्ञाचे मार्गदर्शनही या अभ्यासक्रमासाठी लाभणार आहे. प्रवेश मिळविण्याची अखेरची तारीख १२ ऑगस्ट ७४. सपर्क साधण्याचा पत्ता, कीर्ती महाविद्यालय, दादर मुबई २८, सायं. ६ ते ८. फक्त चाळीस विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाईल.

# मराठवाडा आंदोलन : युक्रांद

## कुमार सप्तर्षी : सु. ल. सोमण

माननीय सपादक १८–७–७४
साप्ताहिक माणूस

मराठवाडा आदोलनाविषयीचे श्री. सु. ल. सोमण यानी लिहिलेले दोन लेख वाचले. याच लेखकाचा मराठवाड्यात जाने-फेब्रु. मध्ये झालेल्या दलित शिष्यवृत्ती वाढ आदोलनावावत यापूर्वी एक लेख आपल्या साप्ताहिकात प्रसिद्ध झाला आहे

श्री. सु. ल. सोमण यांच्या लिखाणात युक्राद सघटना व युक्रादचे कार्यकर्ते यांचेविषयी लिहिण्यात त्यानी खूपच भावनात्मक रस घेतलेला दिसतो. या त्यांच्या विशेष जवळीकीबद्दल आभार! मी आणि माझे सहकारी श्री विजय गव्हाणे याचेबद्दल श्री. सोमण यांनी व्यक्तिनिष्ठ मूल्यमापन करण्याचा खटाटोप केला आहे. वार्ताहराची आपली भूमिका सोडून त्यानी अन्य अनेक भूमिकामध्ये प्रवेश केलेला दिसून येतो. युक्राद, कुमार सप्तर्षी, विजय गव्हाणे याचेविषयी वाटणारी चिंता त्याचे समग्र मन व्यापून राहिल्यामुळे वार्ताहराची अलिप्तपणाची भूमिका सुटते. त्याबद्दल युक्रांदची वा माझी काही तक्रार नाही. पण मराठवाडा आदोलनाची वस्तुनिष्ठ माहिती गोळा करण्याचा व त्यावर आधारित मूल्यमापन करण्याच्या त्यानी स्वीकारलेल्या कार्याला युक्राद विषयीची चिंता बाध आणते. सपूर्ण विवेचनाचा घाट आणि तोल विघडतो. बाकी सघटना आणि त्याचे कार्य, त्यानी बजावलेल्या विशिष्ट भूमिका हातून निसटतात. असो!

युक्रादविषयी श्री. सु. ल. सोमण याना खूपच ममत्व असल्याबद्दल त्यानी स्वत: नमूद केले आहे युक्रादवर त्यांनी लेख लिहिला असता तर अधिक परखडपणे सोमण लिहू शकले असते. युक्रादवर, माझ्यावर वा विजय गव्हाणे याचेवर लिहिताना सोमण यानी लिहिलेली मते व्यक्तीसापेक्ष (Subjective) असल्यामुळे त्यांचा परामर्श मी घेणार नाही. राजकीय, सामाजिक जीवनातली माणसे क्षणाक्षणाला व्यक्तीनिष्ठ *मूल्यमापनाचे विषय बनलेले असतात.* तसे मूल्यमापन करण्याचा सोमण, औषध विक्रेते (पूर्वीचे युक्राद कार्यकर्ते म्हणविणारे) श्री. गभीर, अबेजोगाईचे डॉक्टर आणि जनतेतील कोणाही व्यक्तीचा तो लोकशाही अधिकार आहे. व्यक्त झालेल्या मताशी मी सहमत नसलो तरी अशी मते व्यक्त करण्याचा अधिकार अबाधित राहिला पाहिजे. लोकशाही मूल्यावर निष्ठा नसलेल्या विचारसरणीच्या कार्यकर्त्यांव्यतिरिक्त कोणीही हे मान्य करील. हरेक औषध विक्रेत्यागणिक, अबेजोगाईच्या हरेक डॉक्टर गणिक ही मते भिन्न आढळतील. या व्यक्तिनिष्ठ मताना वा टीकेला उत्तरे देण्याचा खटाटोप करणे राजकीय जीवनातल्या कार्यकर्त्यांना केवळ अशक्य आहे. विचारसरणीवर, तत्त्वावर वा भूमिकावर काही वैचारिक टीका झाल्यासच त्याची दखल घेणे आवश्यक असते.

श्री. सोमण याच्या विवेचनातील व्यक्तीसापेक्ष मताचा परामर्श वर व्यक्त केलेल्या कारणास्तव मी घेणार नाही. सदर लेखात कोणतीच वैचारिक टीका व वैचारिक मुद्दा नसल्यामुळे वैचारिक परामर्श घेण्याचे कारणच नाही. फक्त जी विधाने वास्तव नाहीत, जेथे प्रत्यक्ष वस्तुस्थितीपेक्षा भिन्न वस्तुस्थितीच नमूद केली आहे, न घडलेली घटना सत्याचा बळी देऊन कौशल्याने काल्पनिक रचना करून माडली आहे तेवढ्याच गोष्टीबद्दल मी उत्तर देणार आहे. अर्थात सर्वच कपोलकल्पित विधानाचा परामर्श घेणार नाही. फक्त नमुन्यादाखल काहीचा! नाहीतर श्री. सोमण याचे लिखाण या विषयावर प्रदीर्घ लेख तयार व्हायचा. *कागदटचाईच्या काळात लिखित* शब्दाचा अपव्यय टाळला पाहिजे. एवढा खटाटोप करायला सुदैवाने वा दुर्दैवाने तेवढा वेळही उपलब्ध नाही.

१ : 'विजय गव्हाणेवरील विद्यार्थ्यांच्या विश्वासाला बराच तडा गेला. ह्या मडळीना ३१ मे च्या मेळाव्यात अक्षरश: हूट आउट केले विद्यार्थ्यांनी!'

श्री. विजय गव्हाणे याच्या आत्मसयमी नेतृत्वामुळेच उलट कुलगुरू नाथ याच्यावर सकारण चिडलेल्या पधरा हजार विद्यार्थ्यांचा मेळावा सुनियत्रित राहिला श्री. विजय गव्हाणे नसते तर तेथे काय घडले असते याची माहिती त्या मेळाव्याला हजर असलेल्या कोणाही माणसाला सोमण यानी विचारावी–अगदी औषध विक्रेता वा डॉक्टरला देखील. 'श्री. विजय गव्हाणे याना परभणीच्या ३१ मेच्या मेळाव्यात हूट आउट केले,' असे म्हणणे म्हणजे सत्याशी प्रतारणा तर आहेच, पण त्याच्या चारित्र्यहननचा भाग असे म्हणावे लागेल.

२ : पुण्यात बसून आम्ही आदेश देत होतो अशा अर्थाचे अनेक कुत्सित उल्लेख श्री. सोमण यानी केले आहेत. वास्तविक सतत विचारविनिमय हा कोणत्याही सघटनेचा आत्मा असतो. एकचालकानुवर्ती, आदेशात्मक पद्धतीने कार्य करण्याशिवाय इतर अनेक निर्णयपद्धती असू शकतात, हे श्री. सोमण याना कदाचित विशिष्ट सघटनेशीच फक्त अधिक जवळीक असल्याने माहीत नसेल. 'पुण्यात बसून' असा उल्लेख करण्यावरोबरच युक्रादच्या पुण्यातील कार्यकर्त्यांवर मराठवाड्याच्या पाचही जिल्ह्यासाठी प्रवेशवदी लागू होती, याबद्दल ओझरता उल्लेख आला असता तर ते वार्ताहराच्या निपक्षपाती नीतीला शोभादायक ठरले असते.

अन्य विद्यार्थी सघटनाचे सूत्रधार-आमदार प्रत्यक्ष मुख्यमत्र्याच्या चर्चेच्या वेळी देखील सूत्र चालनासाठी हजर होते, हा अनुल्लेख लक्षात घेण्याजोगा आहे.

३ . 'औरगाबादला कुणी म्हातारीबाई आजारी होती. बघायला जाणे आवश्यक होते. रेल्वे, बस असूनही कुमारानी टॅक्सी केली. *जाऊन येऊन यजमानाना* २५० रु.चा भुर्दंड आणि यजमानाचा कोपरापासून नमस्कार! कुमार उतरले होते तिथून

जेमतेम फर्लांगावर कॉलेज होतं. पण तिथं जायला कुमारांनी जीपची मागणी केली. (बीड किंवा अंबेजोगाई)

या दोन्ही घटना धादात खोट्या आहेत. अशी म्हातारी बाई नाही, तिचा म्हातारा यजमानही नाही कधी मी टॅक्सीने २५० रु. खर्च करून पेशटकडे आयुष्यात गेलो नाही. हे जर सत्य ठरले तर मी राजकीय जीवनात जी मोठ्यातली मोठी शिक्षा असू शकेल ती जाहीरपणे स्वीकारायला तयार आहे. या प्रचाराच्या पद्धतीची मी दखल घेत आहे, याचे कारण जनतेनेदेखील हे प्रकार समजून घ्यावेत. जो राजकीय कार्यकर्ता प्रामाणिकपणे, त्याग करून, जिवाची बाजी लावून काम करतो त्याचे चारित्र्य ही जाता जाता टर उडविण्याची वस्तू मानून सैल जिभेने बोलत रहाणे हा निष्क्रीय सिनिक लोकांचा सतत उद्योग असतो. म्हणून प्रामाणिक कार्यकर्त्यांने त्याचे मनोधैर्य खचू देऊ नये. अर्थात अशा घाणेरड्या प्रचाराला तोंड देण्याइतके प्रत्येकाचे मानस टणक असणार नाही. काही वा बहुसंख्य लोक चारित्र्यहीन असतीलही. यासाठी जनतेने अशा वाह्यात टीकेची शहानिशा करावी आणि खोटेपणा बाहेर आल्यास त्यास शासन करावे. याच भूमिकेतून मी मागणी करतो की, श्री सोमण यांनी वरील गोष्ट सत्य आहे हे सिद्ध करून मला शिक्षा भोगावयास लावावे वा स्वतः जाहीरपणे माफी मागावी. मी त्यांना काय शिक्षा करणार ? माझी इच्छाही नाही पण अधिक जबाबदारीने त्यांनी लिहावे एवढी नम्र विनंती त्यांनी मान्य करावी.

४ : दलित शिष्यवृत्ती आंदोलनात युक्रादबद्दल लिहिताना श्री. सोमणांनी 'आयत्या बिळावर नागोबा' इ गोष्टी तर लिहिल्या होत्याच. पण एस्. एम्. जोशींना मुक्त विद्यापीठात आणायला युक्रादवाले यशस्वी झाले असेही एक विधान केले आहे. यात असे सूचित करावयाचे होते की, युक्रादने मागच्या दाराने समाजवादी मंडळींना चळवळीत आणले. संपूर्ण चळवळीच्या काळात एस्. एम्. जोशी औरंगाबादला आलेच नव्हते. आपल्या पूर्वग्रहानुसार श्री. सोमण आपल्या डोक्यात बातमी तयार करून लिहीत असतात, याचा एक नमुना.

हे पत्र संपविण्यापूर्वी श्री सोमण यांच्या कौशल्याबद्दल कौतुक केल्यावाचून रहावत नाही. त्यांना विजय गव्हाणे रात्रदिवस, राबलेला दिसला नाही सर्व प्रेशर्संना तोंड देऊन अखेरपर्यंत तो जनतेबरोबर राहिला हे लक्षात आले नाही. त्याला मुसाच्या पॉलीश्ड व्यक्तिमत्वाच्या नेत्याने सुरा दाखविला हे सोमणांना कळले नाही त्यांनी आधी तयार केलेली मतेच त्यांना भेटलेले लोक सांगत असतात हा विचित्र योगायोग म्हणावा लागेल असेच आपल्या पूर्वग्रहांना पुष्टी देणारे औषधविक्रेते आणि डॉक्टर्स सोमणांना वार्ताहरकी करताना भेटत राहोत ही सदिच्छा व्यक्त करून पत्र संपवितो ...आभार

आपला

**डॉ. कुमार सप्तर्षी**

□ डॉ. कुमार सप्तर्षींचे पत्र वाचायला मिळाले. ज्या गोष्टी ऐकायला मिळाल्या त्या तशा मांडणे एवढाच माझा उद्देश होता. त्यात अतिशयोक्ती असण्याची शक्यता आहे. तथापी श्री. कुमार व 'युक्राद' विषयी काय बोलले जाते हे जाणून घेणे ह्या दोघांनाही, त्याच्याच दृष्टीने योग्य आहे. 'युक्राद'च्या मूळ तात्त्विक भूमिकेशी विरोध नसताना, किंबहुना त्या दृष्टीनेच बहुसंख्य डावीकडे झुकलेले लोक विचार करीत असताना 'युक्राद' विषयी असे मत प्रवाह लोकात आहेत हे कितपत योग्य आहे ह्याचा अधिक विचार कुमारांनी करायला हवा होता. त्यातही कुमारांचे एकेकाळचे कार्यकर्तेच अशी मते मांडतांत हे विशेष लक्षात घेण्यासारखे आहे. माझ्या वार्ताहरकीवर उखडण्यापेक्षा (कारण मी प्रस्थापित नेत्याकार्यकर्त्या माणसापेक्षा, सामान्य लोक, इतर धडपडणारे सामान्य कार्यकर्ते ह्याच्याशी होणारे संपर्कच महत्वाचे मानतो. त्यामुळे घडलेल्या घटनांवर विचार करणारे व बोलणारे औषध विक्रेते, डॉक्टर्स सारखी मंडळी मला भेटत राहाणारच ! ) कुमारांनी अशी मते का व्यक्तविली जातात, त्याचा मागोवा घेतला असता तर ते बरे झाले असते.

असो हा वाद जास्त वाढवावा अशी माझी इच्छा नाही इतरांनी कुमारावर केलेले आरोप निराधार, निखालस खोटे असले तर ती आनंदाचीच बाब मला वाटेल.

**सु. ल. सोमण**

।। नजर ।। ह. शि. खरात ।।

थिएटर ग्रुपचे

# जिसस ख्राईस्ट सुपरस्टार

आधी काहीच नसतं. फक्त काळोख असतो सुरुवातीलाच त्या काळोखात आपण घुसमटतो त्या काळोखात काही शोधीत असतानाच संथ सुराची लय फुटते प्रकाशासारखी ती पसरत जाते. आणि मग लीड गिटार, बास गिटार आणि न्हिदम गिटार ही तीन कबुतरे घुमू लागतात. त्याला साथ करतात ड्रम्स. मग एकच गदारोळ होतो. त्या काळोखातून हळुहळू आकाश उमलू लागतं. शांत निळसर आकाशाच्या गाभाऱ्यात हे सारं रॉक संगीत आणि पॉप संगीत भरून घुमू लागत. आपण ताल धरतो. हळुहळू ती धून आपल्या रक्तात भिनू लागते. आपला देह घुमू लागतो. तोच एक व्यथाव्याकुळ वेदना आपल्या काळजात पात्यासारखी शिरते. पॉप संगीत वेदनामय होते. कारण त्या शांत आभाळाच्या खाली एक भव्य वेदी असते. त्या वेदीखालीच एक शुभ्रवस्त्रांकिता स्त्री त्या वेदनेचा हुंकार देते. ती वेदना आपल्या कापल्या काळजाला भिडते. आणि दोन हजार वर्षांपूर्वीच्या आजही घडत असलेल्या कहाणीला सुरुवात होते. त्या सूरमयी कहाणीच नाव जिसस ख्राईस्ट सुपर स्टार. पॉप किंवा रॉक संगीतही वेदना होऊन उसळत, ते काळजाला भिडत ह्याची साक्ष देणारा हा एक पॉप ऑपेरा.

आजच्या सारखाच २ हजार वर्षांपूर्वीही काळ कठीण होता सामान्य माणूस पिळला जात होता. मदांधसत्ताधारी आणि धर्ममार्तंड त्याला नाडीत होते. ह्या छळातून मुक्त होण्यासाठी त्याला कुणीतरी हवं असत. त्याला तारणार. वाट दाखविणार. आणि तसा माणूस जन्मतोही. क्षितिजावर तारा चमकावा तसा. अगदी साधा माणूस. तो घेऊन येतो ते मानवीप्रेम. लोक त्याच्या

भोवती गोळा होतात. त्यांना तो त्राता वाटतो काहीना तो वेडा वाटतो तर सत्ताधाऱ्याना तो प्रचड धोका वाटतो. कारण त्याचा मार्ग प्रेम, शाती आणि अहिंसेचा असतो. परतु काळ त्याला ओळखीत नाही. लोक त्याला जाणून घेत नाहीत. आणि हा साधा माणूस लोकाच्यासाठी नाहक बळी जातो. आणि चिरजीव राहतो तो त्याचा मार्ग.

*तो इथल्या लोकाच्या दुःखाने व्याकुळ* झाला. त्याची जन्मदात्री मेरी व्यथाव्याकुळ घरणीचा हुकार होऊन म्हणते, हे माझ्या मुला, आपण सत्यापासून, जीवनापासून फार दूर गेलो आहोत. आपण कधीच शिकलो नाही प्रेम करायाा! जिससलाही जाणवल होत की, आपण देवालाच क्रूसीफाय केलय. आम्ही देवाचा क्रॉस घेतला आणि त्याची तलवार केली. जेव्हा लोक जिससला देवपुत्र मानू लागले तेव्हा जूडास ह्या त्याच्या सोबत्याला ते पटले नाही. तो डोळस असतो. मातीतच पाय घट्ट रोवून तो म्हणतो तुम्ही जिससवर देवपण लादू नका. तोही माणूसच आहे, तुम्हाआम्हासारखा. तो जिससलाही सागतो की, लोकच तुझा नाश करतील. अनुयायात नेहमीच गोधळ असतो. जिसस सागतो, 'उद्या शिल्लक ठेवा उद्यासाठी.' जिसस थकतो. त्याला सुखवाया, शातवाया मेरी मॅग्डेलिन येते. मॅग्डेलिन एक वेश्या. जगाने लाथाडलेली. जिसस तिला जवळ करतो. ती जिससच्या कपाळीचा घाम पुसते त्याच्यापैकी तीच फक्त त्याला हव ते देते. जुडासला हे पटत नाही जुडास तिची निर्भर्त्सना करतो. जिसस सागतो, 'तिला तुच्छ लेखण्याचा तुम्हाला काय अधिकार. इफ युवर स्लेट इज क्लीन देन यू कॅन थ्रो स्टोन.'

जुडासला ते पटत नाही. तो तिला सागतो. तुझी ही उची रगरगोटी गरिबाच्या साठी वापर कारण,

'पिपल हू आर हग्री
पिपल हू आर स्टार्व्हींग
डोन्ट दे मॅटर मोर दॅन
युवर फीट ॲण्ड हेअर?

इकडे जिससच्या आगमनाने जेरुसलेम हादरते. धर्मांध आणि सत्तांध म्हणतात, 'धिस जिसस मस्ट डाय्' हा प्रस्थापित-अप्रस्थापितामधील अटळ सघर्ष असतो. एक साधा माणूस प्रस्थापितांना आव्हान देतो. तो जरी 'हिरो ऑफ फूल्स' असला तरी तो त्याच्या लोकाना सुपरस्टार वाटतो. मिरॅकल वडरमॅन वाटतो. लोकाची मने त्याच्याविरुद्ध चिथावली जातात. परतु त्याला माहीत असत, इथल्या लोकाचा आवाज दडपला तरी,

'द रॉक्स ॲण्ड स्टोन्स देम सेल्व्हज
वुड स्टार्ट टू सिंग'

फक्त लोकानी आत्म्यातून गायला हवे. कारण हे 'किंग्डम' कोणीही जिंकू शकेल. त्यासाठी मरणाला जिंकल पाहिजे, मरण पत्करून माझ मदिर प्रार्थनाघर हवय, तुम्ही त्याला चोराचा अड्डा केलत महारोग्याना पाहून तो गलबलतो. जुडास अधिकच गोधळतो. लास्ट सपरच्या वेळी जिससला आपल्या अताची चाहूल लागते. तो म्हणतो, अधिक थोडी वेदना मग हे मद्य माझ रक्त होईल. हा ब्रेड माझा देह कारण तुमच्यापैकीच एकजण माझा घात करणार आहे. जुडास चिडतो. त्याचा तिरस्कार करतो. कारण जिससला ठाऊक असूनही तो नाटक करतोय तो करता करविता असूनही नामानिराळा का होतो? तो मला त्याचा विश्वासघात करायला भाग का पाडतोय? तो माझा खून करतोय. त्याला खर म्हणजे तुरुगात टाकायला हव परतु जिससला ठाऊक असत की, 'एव्हरीथिंग इज फिक्स्ड ॲण्ड यू कान्ट चेन्ज इट!' जिससचीही आधी चलबिचल होते. माझा मृत्यू तर व्यर्थ जाणार नाही ना? अशी शकाही येते. पण जिसस शेवटी मृत्यूला सामोरा जातो. आपल्याला जिससचा केवळ त्याच्या इच्छेने विश्वासघात करावा लागला म्हणून जुडास आत्महत्या करतो. कायफाह हा धर्मगुरू राजद्रोहाचा व स्वतःला देवपुत्र म्हणाल्याचा जिससवर आरोप ठेवतो. ह्या ज्यूच्या राजाला त्याच किंग्डम कुठाय म्हणून विचारतात तो म्हणतो, किंग्डम इथे नाही. ते कुठेतरी दूर आहे. अशा ह्या ज्यूच्या राजाला, मूर्खांच्या हिरोला, मिरॅकल वडरमॅनला नव्हे सुपरस्टारला क्रूसावर खिळे ठोकून मारल जात. तेव्हा जिसस ख्राइस्ट सुपरस्टार एवढच म्हणतो,

'फादर फरगिव्ह देम — दे डोन्ट
नो व्हाट दे आर डूइंग!'

## प्रेक्षकातच प्रचंड क्रूस

अलेक पदमसी ह्यानी हा पॉप ऑपेरा अत्यत मेहनत घेऊन व अर्थपूर्ण कापोझिशन्स निर्माण करून बसविला आहे. जवळ जवळ ५५ पात्रे रगमचावर वावरत असतात. १३ मायक्रोफोनचा वापर करून प्रत्येकाच गाणं सुयोग्य हालचालीत बसवले गेले आहे. रगमचावर पुरुषभर उचीची वेदी उभारलेली असते. त्यापाठीमागे एका भव्य शुभ्र पडद्यावर *स्लाईडच्या साहाय्याने जिससचा सारा* इतिहास चित्रित केला जातो. लाईटच्या साह्याने भव्य आभाळ कधी निळ तर कधी रक्तलाछित तावड दाखवून हे महानाट्य इतक परिणामकारक केले आहे की आपण एखादा रगीत सिनेमास्कोप चित्रपट पाहिल्याचा भास होतो परतु सगळ्यात अफलातून कल्पना म्हणजे प्रत्यक्ष प्रेक्षकातच एक प्रचंड क्रूस बांधून तो रगमचाला जोडून जणू पुलासारखा उपयोग केला आहे ह्या भव्य क्रूसावर अनेक महत्त्वाच्या घटना घडतात आणि भूतकाळ आणि वर्तमानकाळ ह्याचा दुवा जोडला जातो. जिससला पकडणारे वर्तमानकालीन मिलटरी पोलिस दाखवून, तसेच जिससची मुलाखत घेण्यासाठी रिपोर्टर्स, फोटोग्राफर्स, फिल्मवाले येणे, मध्येच पडद्यावर गाधीचा फोटो दाखवून सध्याच्या वर्तमानकाळाचा उपहास करण्यात व हा ऑपेरा २ हजार वर्षापूर्वीचा नसून आजही तेच घडते आहे हे दाखविण्यात दिग्दर्शक यशस्वी झाला आहे. रगमचावर प्रचड क्रूस उभारून जिससला क्रूसीफाय करण्याचा प्रसग व त्याचवेळी आकाशात तारा चमकताना दाखविणे *ह्या गोष्टी परिणामकारक* झाल्या आहेत. जुडासचे स्पिरीट दाखविताना केलेला प्रकाशाचा प्रयोग बघण्याजोगा आहे. तसेच हेरॉड हात धुताना पाण्याचे रक्त होणे, हेरॉड जिससला मुगुट घालताना तो काटेरी मुगुट आहे असे भासविणे ही कल्पना चागली वाटते.

## पूर्णिमा भेंडे श्रवणीय

ह्या ऑपेरातील महत्त्वाची पात्रे म्हणजे जिसस, जुडास, मेरीमॅग्डेलिन, कायफाह, हेरॉड ही होत. मधुकरचद्रदास ह्याचे जिसासचे, नदू भेंडे ह्याचे जुडासचे व पूर्णिमा भेंडे हिचे मॅग्डेलिनचे काम चांगले झाले आहे.

पृष्ठ २९ वर

# साप्ताहिक भविष्य

**कृष्ण माईणकर**

**दि. ३ ते ९ ऑगस्ट ७४**

## मुंबई राजधानीत राजकीय धक्के

महाराष्ट्राची राजधानी मुंबई ही धनूरास धर्माखाली आहे. मंगळ सध्या भाग्यस्थानी सिंह राशीत आहे. हा मंगळ याच वेळी काँग्रेस, मुंबईनिवासस्थ महाराष्ट्र मंत्रीमंडळ व मंत्रीमंडळातील मुंबईचे मंत्री यांच्यावर खळबळजनक असा प्रकाश झोत टाकणार आहे. तो प्रतिकूल असेल असे मात्र समजू नका. बॅ. अंतुले यांच्याबाबतीत विश्वासार्ह वळण निर्माण झाले तर आश्चर्य नको. वसंतराव नाईक यांचे केंद्रस्थानी पुन्हा महत्त्व वाढेल. केंद्र मंत्रिमंडळात ललित नारायण मिश्रांचे 'लळीत' बरेच गाजेल.

### **मेष** : वाढते यश व प्रगती

पौर्णिमेच्या चंद्राने आठवड्याची सुरुवात होत आहे. हा एक अप्रतीम योगच म्हणावा लागेल. नोकरीत जन्माच्या अपेक्षा पूर्ण होणे, अडखळणाऱ्या उद्योगाला वेग येणे, सार्वजनिक कार्यातील उपेक्षा संपून तुमचा जयघोष होणे, व्यापारात झालेली कोंडी अचानक फुटणे असे काही तरी या आठवड्यात घडणार आहे. रेसमध्ये पैसा मिळून पैशाचे बळ वाढेल. सोमवार ते गुरुवार लाभदायक घटनांची मालिकाच लागेल **महिलांस** : मनातील संशय दूर सारा व कोणतेही काम करा. यश हाती लागेल.

### **वृषभ** : नोकरीत बढती

आता दुसऱ्या शनीची मुळीच काळजी करू नका. तो तुमचे काहीच वाईट करू शकणार नाही. शनिवार ते मंगळवार तुम्हाला दहावा व अकरावा चंद्र आहे. या चंद्रामुळे राजकारणात तुमच्या नावाला मोठे महत्त्व प्राप्त होईल. तुमच्या नावाभोवती मोठे वलय निर्माण होईल. नोकरी परिस्थिती खूपच सुधारेल तिरसट वरिष्ठाची बदली होऊन तुमचे आवडते वरिष्ठ त्या ठिकाणी येतील. बेकारी संपेल. कापडाचा व्यापार, सूत वा कापूस व्यापार व सिनेमा व्यवसाय लाभाचा ठरेल. **महिलांस** : मन प्रसन्न राहील. संसारात मुलांचे कौतुक होईल. धार्मिक कार्य होईल.

### **मिथून** : अडचणीतून सुटका

केतूचा त्रास व राहूची अडवणूक तुमच्या अंगीकृत कार्यात अडचणी आणीत आहेत; पण या आठवड्यात मात्र या त्रासातून तुमची उत्तम प्रकारे मुक्तता होणार आहे. मंगळवार ते शुक्रवार हे चार दिवस महत्त्वाचे ठरावेत. एखादा परदेशस्थ माणूस तुमच्या सहवासात येईल. व भावी काळात तुमचे व्यावसायिक जीवन अनेक प्रकारे उजळून टाकील. स्वतंत्र उद्योगाचे तुमचे स्वप्न साकार होण्यासारखी आर्थिक अनुकूलता निर्माण होईल. चालू नोकरीत चांगल्या ठिकाणी बदलीचा योग आहे. **महिलांस** : नोकरीत कामाचे कौतुक होईल. मात्र स्तुतीपासून सावध राहा.

### **कर्क** : व्यक्तिमत्त्व उंचावेल

पहिला रवी आणि दुसरा मंगळ हे दोन्ही ग्रह तुमचे व्यक्तीमत्त्व तेजाळून टाकणार आहेत. आठवड्यात चंद्र सातवा व आठवा आहे. संसारात आनंद आणि प्रसन्नता येईल. निराश मनाला टवटवी येईल. रविवार ते बुधवार व्यवसायात पत्नीचे उत्तम सहकार्य व मार्गदर्शन लाभेल. व्यापारात एखाद्या श्रीमंत विद्याविभूषीत स्त्रीचे मोठे सहकार्य लाभेल. नोकरीत त्रास होणार नाही. चालू कामात कल्पकता दाखवता येईल. वरिष्ठांची सहानुभूती लाभेल. **महिलांस** : अनेक कामात यश मिळवून देणारे ग्रहमान आहे. नोकरीत प्रभाव पडेल.

### **सिंह** : कर्तबगारीचे चीज

तुम्ही आजवर अनेक प्रकारच्या महत्त्वाच्या जबाबदाऱ्या पार पाडल्या आहेत. सध्या मंगळाचे तुम्हाला मोठे सहकार्य लाभले असल्यामुळे राजकारण व नोकरीत तुम्हाला महत्त्वाचे वरिष्ठ स्थान लाभणार आहे. रविवार ते बुधवार चंद्र इतका उत्तम आहे की तुमच्या कामावरच वरिष्ठांचे लक्ष सहानुभूतीने केंद्रीत होऊन तुम्हाला मोठे घबाडच मिळेल. यावेळी आर्थिक बाजू लॉटरीच्या बक्षिसाने बळकट होईल तर व्यापार उद्योगातील अस्थिरता संपून नवे पर्व सुरू होईल. तब्येत धडधाकट राहील. **महिलांस** : तुम्ही यावेळी इच्छित अशी दुर्मिळ वस्तू खरेदी करू शकाल. पैसा मिळेल.

### **कन्या** : नव्या पर्वाची नांदी

तब्येतीची कुरकूर व मनाची निराशा या दोन जात्यात भरडले जाणारे तुमचे जीवन याच आठवड्यापासून नव्या स्पर्शाने पुलकीत होईल. त्रास, अडचणी व निराशा कुठल्या कुठे विरून जाईल. नोकरीतील तुमचे स्थान उंचावेल. जुन्या कामाचे कर्तृत्व वरिष्ठांची समजूत काढील. शनिवार ते बुधवार अनेकांचे सहकार्य लाभेल. दुरावलेले नातेवाईक पुन्हा सहवासात येतील. त्यांना त्यांची चूक पटेल. आर्थिक स्थिती जरी चांगली सुधारली नसली तरी प्रतिष्ठेला तडा जाणार नाही. मित्रांचे व हितचिंतकांचे सहकार्य मिळेल. **महिलांस** : मनातील कुढण्याला आता रजा द्या. प्रसन्न परिस्थितीचा लाभ घ्या.

### **तूळ** : पैशाची वृद्धी

लाभस्थानी असलेला मंगळ एकटाच

तुमच्या जीवनाला समृद्धीची झळाळी व यशाची झालर देऊ शकेल. हर्शलाचे कार्यही याचवेळी सुरू होईल.' नोकरीत जुने वाद व गैरसमज आपोआप दूर होतील. यावेळी चालू नोकरीत बदल वा कामात बदल करायला मुळीच हरकत नाही, तुम्ही कलावत म्हणून या आठवड्यात लोकांच्या कौतुकाला पात्र ठरणार आहात. आकाशवाणीवर तुमचे नाव प्रथमच झळकेल. पैशाची यावेळी मोठी आवक होईल. जुने येणे वसूल होईल. बक्षिस मिळेल. **महिलांस** : गुरुकृपेने अनेक इच्छा पुऱ्या होतील. मनाला उत्साह लाभेल

**वृश्चिक : नोकरीत बदल**

राशीस्वामी इतका उत्तम आहे व याच वेळी त्याला चद्राची एवढी अनुकूलता लाभली आहे की नोकरी व व्यवसाय या दोन्ही क्षेत्रात यशाची, आकांक्षा पूर्तीची कीर्तीशिखरे गाठण्याचे भाग्य तुमच्या वाट्याला येणार आहे. प्रामुख्याने नोकरीक्षेत्रात मोठा लक्षणीय बदल होण्याची चिन्हे दिसतात. जमीन महसूल, खतउद्योग यात तुमच्या कर्तृत्त्वाला मोठा वाव मिळेल. चालू नोकरीत तुमचे स्थान एकदम उचावेल. वरिष्ठ जागी प्रमोशन मिळेल. बेकाराना शुभवार्ता. **महिलांस** : चालू नोकरीतील त्रास कमी होईल. वरिष्ठांची सहानुभूती लाभेल

**धनू : नव्या पर्वकाळाची चाहूल**

मंगळाचे अद्वितीय व असामान्य कर्तृत्व आता तुमच्यावर अनुकूलतेचा वर्षाव करीत असताना आता निराशा, उदासपणा व अगतिकता यातच मन का गुतवता ? त्या जुन्या आठवणी विस्मृतीच्या डोहात बुडवून टाका आणि नव्या पर्वकाळाच्या चाहुलीची जाग घ्या. नोकरीतील तो त्रासदायक काळ आता सपला आहे. वरिष्ठांच्या मनातील गैरसमज आपोआप दूर होत आहे. सोमवारच्या कुभचद्रापासून सारे कसे बदललेले उत्साहवर्धक वातावरण निर्माण होईल. आर्थिक प्रयत्नांना गती मिळेल. तब्येत सुधारेल. **महिलांस** : अपेक्षित बदल याचवेळी दिसू लागतील. नोकरीत अनुकूल स्थित्यतर.

**मकर : तब्येत सांभाळा**

मगळ तुमच्या राशीला जरी आठवा असला तरी तो तब्येतीला थोडाफार उपद्रव निर्माण करील एवढेच. पण इतर अनेक बाबतीत त्याचे मोठे सहकार्यच तुम्हाला लाभणार आहे. अनावश्यक विचार व धावपळ करू नका. शनिवार ते बुधवार चद्राची अनुकूलता आहे. नोकरीत कामाचा ताण कमी होईल. ज्याचा इटरव्ह्यू होऊन कॉल रेंगाळला आहे, ते रेंगाळणे या आठवड्यात एकदाचे सपेल. सशोधक, वाणिज्य पदवीधर, विज्ञान, तत्रज्ञ यांना चागले काम मिळेल. वकिलाचे 'जज्ज' बनण्याचा योग आहे. **महिलांस** : प्रशासक म्हणून पदवीधर महिलाना मोठी सधी मिळणार आहे. नोकरीत उत्तम काळ.

**कुंभ : सार्वजनिक सन्मान**

पहिला दोन तीन दिवसांचा काळ धावपळ व धांदल यातच जाईल. प्रवासाने थोडाफार थकवादेखील येईल. नतर मात्र प्रामुख्याने सार्वजनिक कार्यातील तुमच्या कर्तबगारीचा काळ आहे. सत्तारूढ पक्षात जर तुम्ही असाल तर उच्च पदस्थ व्यक्तीत तुमच्याबद्दल आंतरिक सहानुभूती निर्माण होईल. नोकरीची परिस्थिती कल्पनातीत अनुकूल होईल. आजवरचे त्रासदायक काम बदलले जाईल. पैशाचे कोणतेही प्रयत्न या वेळी यशस्वी होतील. शेतीचा व्यवसाय मुद्दाम करा. **महिलांस** : तुमच्या स्वभावाने कुटुबात तुमचे स्थान उचावेल. वृद्ध माणसांना आदर वाटेल.

**मीन : निष्कंटक यश**

तुम्हाला गुरु जरी बारावा असला तरी तो तुमच्या कल्याणातच मग्न असतो याची तुम्ही जाणीव ठेवा. या वेळी मगळ सहावा आहे. तो कोणत्याही क्षेत्रातील तुमच्या विरोधकाना दडपून टाकील. धाडस करण्याचे मोठे सामर्थ्य तुम्हाला देईल. स्थावर मिळकतीचा तटा तडजोडीने मिटेल व तुमचा अतिशय फायदाच होईल. सोमवार ते गुरुवार नोकरीत कामाचा ताण कमी होईल. विश्रातीसाठी रजा मिळेल. बेकाराची सोय होईल. प्रेसच्या क्षेत्रातील धदा मदीच्या त्रासातून तेजीत येईल. **महिलांस** : नोकरीत मोठे यश लाभेल. कोणत्याही धद्यात प्रगतीची चिन्हे.

## नजर : पृष्ठ २७ वरून

आलमेडाचा काय फाह व स्टिव्हन्सचा हेरॉड लक्षात राहतात. पण सर्वात छान गायली आहे ती पूर्णिमा भेडे. तिने जिससवरच प्रेम व स्वत:ची अगतिकता व्याकूळ सुरातून व्यक्त केली आहे तिचे गायन पुन्हा-पुन्हा ऐकावेसे वाटते. सगळ्यात कौतुकास्पद बाब म्हणजे हा धार्मिक विषय रॉक वा पॉप सगीतातून मांडल्याने व पॉप सगीत हे रक्तातून उसळणार असल्याने एका महा मानवाची ही शोकातिका सगीतकाराने ठणकत्या वेदना व्याकुळ सुरातून अशी काही पेश केली आहे की ती हृदयाला भिडल्याशिवाय राहात नाही, सगीतकार रेकस लोबोने हे काम चोख केले आहे. प्रकाश योजना व तांत्रिक बाबी डेरेक जेफरिस ह्यांनी साभाळून फार मोठी कामगिरी केली आहे. थिएटर ग्रुपने सादर केलेला जिसस ख्राईस्ट सुपरस्टार एक वेगळा प्रयोग म्हणून लक्षणीय असून इग्रजी रगमचावर तो यशस्वी झाला आहे. ह्याचे श्रेय अलेक पदमसी ह्यांना आहे. मी पाहिलेला प्रयोग रौप्यमहोत्सवी असल्याने म्हणा पण तो अत्यत सुबक व सफाईदार वाटला.

### जुडास हीरो ?

ब्रिटीश लेखक वेब्बर व राईस ह्या जोडीने हा ऑपेरा आधी लिहिला. त्याची सपूर्ण रेकॉर्ड गाजल्यावर तो नाटयस्वरूपात रगमचावर आला. ह्या ऑपेरातील जुडासचे रगविलेले स्वभावचित्रण, तसेच त्याने जिससवर खुनाचा आरोप करणे, जिससला माहित असूनही जुडासला तो वाचवू शकत नाही ह्या गोष्टीमुळे जुडासचे स्वभावचित्रण अत्यंत जिवत झाले असून तोच ह्या ऑपेराचा हिरो वाटतो व प्रेक्षकांची सहानुभूती मिळवतो. पुन्हा मृत्यूनतर जिसस जिवत होतो. जडासचे स्पिरीट दाखविण्यात लेखकाचा काय हेतू आहे हे कळत नाही. मूळ बायबलात नाही असे ऐकतो. ते काहीही असो सामान्य प्रेक्षकांवर पाहिजे तो परिणाम करण्यात जिसस ख्राईस्ट सुपरस्टार यशस्वी होतो हेच त्याचे मोठेपण. ☐



शशी-राखी-मा. अलंकार – जानवर और इन्सान मध्ये. राखी मा. अलंकारला शशीसारखा दणदणीत हीरो हो म्हणून सांगत्ये.

## चकनाचूर

भाऊ पाध्ये

# शशी

## दणकेबाज भूमिकेमागील दुखी हँसी

'आ गले लग जा' आणि 'चोर मचाए शोर' या पिक्चर्सच्या जबरदस्त कामयाबी नंतरही हिरो शशी कपूर दुःखी आत्मा राह्यला आहे. का तर म्हणे, त्याचे 'पाप और पुण्य' आणि 'मि. रोमियो' फ्लॉप गेले. हिंदी चित्रपटात 'भटकती आत्मा'ची स्टोरी कधी कधी पेश केली जाते. परंतु, जर हिंदी सिनेमाच्या इतिहासावर कोणी पिक्चर काढले तर शशीला त्या भटकत्या आत्म्याचा रोल द्यावा लागेल.

अर्थातच आपली फिल्म इंडस्ट्री तशी काही

शिस्त असलेली नाही. या फिल्म इंडस्ट्रीविषयी कुणालाही प्रामाणिक मत विचारले तर तो आपल्या हजार शिकायती सांगेल. शशी जरा इंटलेक्चुअल पोझ घेऊन सांगतो एवढेच. मला शशी 'जानवर और इन्सान'च्या शूटिंग वेळी मधुमलई सँक्चुअरी मध्ये भेटला होता. आजकाल राजकपूर, व्ही. शांताराम सारखे निर्माते फारसे नाहीत, त्यामुळे अनेक फिल्म अपुऱ्या रहातात आणि आपले पैसे बुडतात असे त्याचे म्हणणे होते. (जणू काही नॉर्मा शिअरच्या फिल्म अर्धवट पडल्याच नव्हत्या!) अर्थात हिंदी फिल्म इंडस्ट्री अशी आहे, की तिच्याविषयी तक्रारी करूनही कुणालाही ती सोडता येणार नाही. दुर्दैवाने शशी आणि गोल्डी यांच्या ते लक्षात येत नाही. ते एरवी फिल्म इंडस्ट्री फारच सिरिअसली घेतात. आणि फिल्म इंडस्ट्रीमध्ये भेटणाऱ्या भल्या बुऱ्या माणसांच्या अनुभवावर खुडकत बसतात.

अर्थातच आता शशीची दहा पंधरा वर्षापूर्वीची 'बॉईश इमेज' राहिलेली नाही. दहा पंधरा वर्षापूर्वी शशी आपला 'डार्लिंग अॅक्टर' होता. तो जमाना हिरोंचा नव्हता. महंमुदसारख्या दुय्यम भूमिकेत कॉमेडी करणारा माणूस, धर्मेंद्र, जितेंद्र, संजय, सुनीलदत्त, राजेंद्रकुमार, मनोज, जॉयमुखर्जी यांच्यासारख्या हिरोंना खिशात टाकून सारे पिक्चर स्वतःच्या कॉमेडीने गाजवायचा. प्राण सारखा व्हिलन काही लकबी आत्मसात करून आपल्या अदाकारीमध्ये अशी काही जान भरायचा की पब्लिक म्हणे, पिक्चरमध्ये प्राणची अदाकारी पाहायची, दुसरे काही नाही.' अशोक कुमारसारखा बुजुर्ग अॅक्टर पडद्यावर आला की सगळे सितारे त्याच्यासमोर फिके पडायचे. त्या जमान्यात हे कोवळं पोर सर्वांचे लक्ष वेधून घ्यायचे. त्याचे 'हसीना मान जाएगी' हे पिक्चर घ्या. 'प्यार किए जा' मध्ये या पोराने पडद्यावरील तीन जबरदस्त कॉमेडियन्स, महंमूद, किशोरकुमार व ओमप्रकाश यांच्याबरोबर मुकाबला केला. 'बिरादरी' मध्ये त्याचा पुन्हा महंमूदशी मुकाबला होता. 'जब जब फूल खिले' हे पिक्चर त्याच्याच अदाकारीमुळे हिट बनले, हिरोसाठी पिक्चर पाह्यला आपण जायचो, ते फक्त शशीचे पिक्चर्स. त्याच्या चेहऱ्यात एक ताजा आगळेपणा होता. मनोज, धर्मेंद्र सारखे त्याचे गाल गुबगुबीत नव्हते, पण तरीसुद्धा त्यांच्यापेक्षा तो हँडसम वाटायचा. त्याच्या अदाकारीची एक स्टाईल होती. तिला अशी काही ग्रेस होती की

शशी-शर्मिला '–आ गले लग जा' मध्ये.



या चांगल्या अदाकारांची 'सफर सुहानी' झाली.

दिलीपकुमारने त्याचा हेवा करावा. तो इतका ' स्लीक आणि निंबल ' होता की जितेंद्रच्या मुकाबल्यात त्याला कुणीही नृत्यासाठी अधिक पसत केले असते.

शशी आपल्याला आवडला परतु हिरो म्हणून नाही. तो कधीच हिरो म्हणून दिसला नाही. नंदाशी छेडछाड करून ' रूठा न करो ' म्हणून तिची समजूत काढण्यासाठी हिमालयाच्या बर्फिली पहाडात फिरणारा, तो चागला रोमिओ म्हणून आपल्याला पसंत होता. त्याने छेडछाड करावी आपली हिरॉइन मिळविण्यासाठी, बॅंड आणून ' रामलाल मुर्दाबाद ' म्हणून गात गात त्याने नाचावे आणि महंमूदबरोबर त्याने चौपाटीवर गळघात ढोलकं बांधून नाचाव ही त्याची अदाकारी होती. त्याच्या डायलॉगना स्टाईल नव्हती. तो जसबानी एक्स्प्रेशन देऊ शकत असे, पण प्राण, मदनपुरी किंवा शेट्टी यांच्यासारख्या तगडया व्हिमन्स बरोबर त्याचा मुकाबला शोभत नसे.
राजेशखन्नाबरोबर हिंदी चित्रपटात जो पुन्हा हिरोचा जमाना सुरू झाला, त्यामध्ये तो साहजिकच मागे पडला. शशीची पिक्चर्स फ्लॉप होत होती याचे फिल्म इंडस्ट्रीमध्ये सर्वांनाच वाईट वाटत होते. हिंदी फिल्म इडस्ट्रीबद्दल शशीचे काहीही मत असले तरी इडस्ट्रीमध्ये मात्र इज्जत होत असे.
' आमचा शशीकपूर आणि आमची वहिदा रेहमान अदाकारीमध्ये कुठच्याही फॉरीन सिताऱ्यांच्या मुकाबल्यात कमी पडणार नाहीत ' असे ते म्हणत. स्वाभाविकच आपले सिनेमावाले त्याला ' फॉरेन पिक्चर्ससाठी लायक ' असे मानीत असावेत. कदाचित त्याच्या पाश्चात्त्य पत्नीमुळे त्याची ते अशी इज्जत करीत असावेत. पण, फॉरेन पिक्चर्समध्येही तो मिसफिटच् ठरवा. जेम्स आयव्हरी आणि इस्लाइल मर्चंट यांचा तो आवडता हिरो होता. त्याच्या ' हाऊस होल्डर 'मध्ये लीला नायडूने शशीला फिका पाडला. ' शेक्सपिअरवाला, बॉंबे टॉकीज 'मध्ये त्याची भूमिका यथा तथाच होती. फक्त हेली मिल्सच्याबरोबर सिंगापूरमधला जिगोलो म्हणून त्याने एम् जी. एम्. चित्रात एक बरी भूमिका केली होती तेवढीच.

अर्थात शशीची पिक्चर्स पडत होती तरी शशीला निर्माते घेत होते, हे काही कमी नाही. ' शर्मिली 'मध्ये, निर्माते सुबोध मुखर्जींनी हिरो म्हणून त्याला घेतला होता. खरे म्हणजे ती स्टोरी होती राखीची. ते पिक्चर चाललेही राखीच्या अदाकारीमुळे आणि बर्मन दादांच्या म्युझिकमुळे. पण, ' हिट ' पिक्चरचा हिरो म्हणून पुन्हा जो तो त्याच्याविषयी बोलू लागला होता. एक गोष्ट म्हणजे नदा-शशीनंतर शशी-राखी ही जोडी प्रेक्षकाच्या पसंतीस आली होती. त्यानंतर ' जानवर और इन्सान 'मध्ये पुन्हा शशी-राखी एकत्र आले. ' जानवर और इन्सान 'मध्ये वाघ आणि सुजितकुमार या दोन जानवरांशी झुज खेळणारा म्हणून शशीची दणकेबाज हिरोची इमेज निर्माण झाली. त्या इमेजमुळे त्याचा ' चोर मचाये शोर ' हिट झाला.

शशी आता जून झाला आहे, त्याची ' बॉईश इमेज ' सपूर्ण नष्ट झाली आहे. ' ऑफ दी स्क्रीन ' तो हॅंडसम वाटला तरी पडद्यावर वाटतोच असे नाही. त्यामुळे टिंकु जयस्वाल सारख्या एकदम फ्रेश चेहऱ्यासमोर तो हिरो म्हणून शोभतही नाही. ' नयना 'सारखा अत्यत बकवास रोल कोणी मजूर करणार नाही. ' पाप और पुण्य ' हे चित्र तात्रिक दृष्टयाही भिकार होते. त्यामुळे ही पिक्चर्स फ्लॉप झाली तरी त्यात प्रेक्षकाचा दोष नाही. ' आ गले लग जा ' किंवा ' चोर मचाए शोर 'मध्ये शशीची जी इमेज पब्लिकने पसंत केली आहे, तीच त्याची खरी चांगली इमेज आहे. थोडासा लाईट रोल, त्यात थोडा मारामारीचा चांगला मसाला, जसबाती स्टोरी, चांगली गाणी आणि किशोरचा आवाज, हे पाहूनच शशीने भूमिकेची निवड केली पाहिजे. नाहीतरी हल्ली तो वितरक झाला आहे आणि वितरणासाठी ' आपण भूमिका धदेवाईक दृष्टीने निवडतो ' असे तो म्हणतो, मग हिरो म्हणून तो आपल्या भूमिका निवडीत नाही. म्हणजे त्याची फिल्मी धद्याविषयी कुरकुर कमी होईल आणि उगीच तो फिल्म इडस्ट्रीमध्ये इंटलेक्चुअल पोझ घेऊन फिरत असतो, तसे करणार नाही.

## नवी जोडी—अमिताभ-हेमा

'राजेश खन्नाला पडद्यावर आपण प्रथम आणले असे जो तो निर्माता म्हणतो. तसेच ' अमिताभ 'ला ब्रेक आपण दिला असे जो तो म्हणतो. पण दोघांनाही आपणच ब्रेक दिला असे निर्माता—दिग्दर्शक अरविंद सेन यांचे म्हणणे आहे. ' मर्यादा 'मध्ये त्यानी राजेशला ' ब्रेक ' दिला आणि आता ' कसौटी 'मध्ये त्यांनी अमिताभला ' ब्रेक ' दिला. आता त्याच्या पिक्चर्सना वितरक ब्रेक लावतात त्यामुळे ती वेळीच थिएटरमध्ये लागत नाहीत हे खरे.

' कसौटी 'मध्ये त्यानी हेमा आणि अमिताभला हिरो—हिरॉइनच्या भूमिकेत चमकविले आहे. यापूर्वी ही दोघे बहीण—भाऊ म्हणून एका पिक्चरमध्ये येऊन त्यांनी ते पिक्चर पाडले होते. पण ' कसौटी ' चालेल, कारण ही दोघे सध्या ' टॉप 'ला आहेत. दोघे बहीण-भाऊ शोभले नाहीत म्हणजेच दोघे दिसण्यात अलग पडले. हिरो-हिरॉइन म्हणूनही ते दिसण्यात अलग पडतील. हा. ते उचीने एकमेकाला शोभतील, हे मात्र खरे. ■ ■

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी ' माणूस ' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

राजहस प्रकाशन सस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक सस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील सस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. स. श्री. ग. माजगावकर